विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

वर्ष तिसरे । अंक दहावा । ऑक्टोबर २०२४




विवेक जागर संस्था
शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित (स्थापना - दि. ९ ऑगस्ट १९८९)
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती
विज्ञान निर्भयता नीती
आम्ही वारस विवेकाचे
स्त्री सन्मान संवाद यात्रा २०२४

स्त्री सन्मान प्रतिज्ञा

मी अतिशय गांभिर्यतापूर्वक प्रतिज्ञा करत आहे की,
एक संवेदनशील माणूस आणि देशाचा/देशाची जबाबदार नागरीक म्हणून मी भारतीय संविधानातील स्त्री - पुरुष समानता या मूल्याचा केवळ आदरच नव्हे तर काटेकोर आचरण देखील करीन.

मी स्त्री स्वातंत्र्याचा सन्मान राखतांना, माणूस म्हणून स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व, व्यक्तीमत्व, हक्क आणि अधिकार याचा कोठेही संकोच होणार नाही, याची काळजी घेईन.

तसेच माणूस म्हणून पुरुषांइतकेच मूक्त पर्यावरण स्त्रीला स्वतःच्या कुटुंबात व समाजात मिळण्यासाठी आग्रही राहीन.

यासाठी माझ्या पूर्व संस्कारातून आलेल्या धर्माधिष्ठित पुरुषसत्ताक विचारांचा निग्रहाने त्याग करीन.

मी स्वतः कोणत्याही स्त्रीचा बोलण्या व वागण्यातून अवमान होणार नाही याची काळजी घेईन.

कोणत्याही स्त्रीवर शारिरीक - मानसिक अत्याचार वा शोषण करणार नाही वा शोषणाचे समर्थन करणार नाही.

स्त्रियांच्या वर होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या अत्याचार,शोषण व हिंसेचा मी पूर्ण ताकदीनिशी विरोध करेन.

हीच माझी भूमिका पारलिंगी तसेच अन्य लिंगी व्यक्तींबाबत देखील असेल.

मी माणूस म्हणून प्रत्येकाच्या स्वातंत्र्याचा सन्मान व रक्षण करण्याची आणि माणूस म्हणून अधिक उन्नत होण्याची निष्ठापूर्वक प्रतिज्ञा करीत आहे.

## राज्यभरात महा. अंनिसचे स्त्री सन्मानासाठी पुरुषभान संवाद अभियान

# राज्य कार्यकारिणी बैठक : लातूर : क्षणचित्रे




उद्‌घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे सोबत राज्य कार्यकरिणी सदस्य




राज्य कार्यकारिणी बैठकीत उपस्थित मान्यवर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अरविंद भातांब्रे सोबत प्राचार्य सोमनाथ रोडे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे व साथी




राज्य कार्यकारिणी बैठकीत उपस्थित मान्यवर डॉ. अजित जगताप, कॉ. विहीरे सोबत राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे व साथी



संयोजक टीम लातूर




राज्यभरातून उपस्थित असलेले राज्य पदाधिकारी, जिल्हा कार्याध्यक्ष, प्रधान सचिव आणि प्रमुख कार्यकर्ते

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
संपादक मंडळ
- संपादक
डॉ. नितीन शिंदे
- कार्यकारी संपादक
उत्तम जोगदंड
- सहसंपादक
डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- व्यवस्थापकीय संपादक
अजय भालकर
- सदस्य
डॉ. मांतेश हिरेमठ
डॉ. बाळू दुगडूमवार
प्रल्हाद मिस्त्री
डॉ. सुशील मेश्राम
डॉ. अरुण शिंदे
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे
- सल्लागार मंडळ
किशोर बेडकिहाळ
डॉ. प्रदीप पाटकर
- प्रकाशक
संजय बनसोडे
- कार्यालयीन पत्ता
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव
पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
ता.वाळवा जि.सांगली ४१५४०९
मो. ९३५९०८०८२०
email : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in
- अंक वितरण
आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- मुखपृष्ठ
सचिन भोसले/कोल्हापूर
- स्वागतमूल्य : ₹ २०/-
- पृष्ठ संख्या : ४०

**वार्षिक वर्गणी**
४०० रू. (व्यक्तीसाठी) ५०० रू. (संस्थेसाठी)
**वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा :**
**विवेक जागर संस्था**
ICICI **बँक, धुळे**
**खाते नंबर** :646301002757
IFSC Code : ICIC0006463
Scan & Pay

विज्ञान निर्भयता नीती
विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
आम्ही वारस विवेकाचे
ISSN : 2584-0398
**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र**

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**R.N.I.No. MAHMAR/2022/83669**
**वर्ष तिसरे । अंक दहावा । ऑक्टोबर २०२४**

## अनुक्रमणिका

- **संपादकीय** ४
- **अभिवादन**
  महात्मा गांधी : माझ्या अनुभवातले/प्रा. डी. यु. पवार ५
- **प्रासंगिक**
  संत परंपरा आणि समतेची शिकवण / अनुज हुलके १०
  लैंगिक अत्याचार आणि लैंगिकता शिक्षण / सचिन थिटे १३
- **चिकित्सा**
  देव शोधायचा आहे / तेजस्विनी देसाई १६
  मृत्यू एक चिंतन / जगदीश काबरे १९
- **कविता**
  जय विज्ञान, जय विज्ञान / प्रदिप कासुर्डे २२
  कीव / कुसुमताई अलाम २२
- **पुस्तक परीक्षण**
  अंधश्रद्धेची वावटळ :
  विवेकनिष्ठ समाजानिर्मितीसाठी उपयुक्त / डॉ. सुनीलकुमार सरनाईक २३
- **वृतांत**
  चला डोळस होऊ या... / उत्तम जोगदंड २४
  स्त्री सन्मानासाठी पुरुषभान संवाद / रुपेश शोभा, पूजा पुहाल २६
  लेखक कार्यकर्ते घडावेत/प्रल्हाद मिस्त्री २९
  राज्य कार्यकारिणी बैठक / डॉ. टी. आर. गोराणे ३२
- **महा. अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३५

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

# ।। संपादकीय ।।

पश्चिम बंगालमधील एका रुग्णालयात काम करणाऱ्या महिला डॉक्टरवर बलात्कार करून खून, या बातमीची शाई वाळते न वाळते तोच ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे एका प्रतिष्ठित शाळेत अवघ्या तीन-चार वर्षांच्या मुलींचे लैंगिक शोषण झाल्याची बातमी देशभर पोहोचली आणि सर्वत्र संतापाची एकच लाट उसळली. आंदोलने, निदर्शने, निवेदने इत्यादी मार्गांनी निषेध केला गेला. बदलापूर येथील आंदोलकांनी रेल्वे रुळांवरच ठिय्या देऊन रेल्वे वाहतूक सात तास ठप्प केली. आंदोलकांची मागणी होती, 'ताबडतोब आरोपीला पकडून आणून आमच्यासमोर फासावर चढवा.' या प्रकरणी अन्यत्र झालेल्या आंदोलनांमध्येदेखील बलात्काऱ्यांना दहशत बसेल, अशी कठोर शिक्षा तात्काळ द्यावी, अशा मागण्या केल्या गेल्या. शाळेच्या व्यवस्थापनाने जवळपास एक आठवडाभर हे प्रकरण दडपायचा प्रयत्न केल्याच्या आरोपामुळे तर लोकांच्या संतापाचा भडकाच उडाला.

जनतेच्या अशा उद्रेकांमागील भावना योग्य वाटत असली, तरी त्यातील विवेकाच्या अभावी मूळ प्रश्न दुर्लक्षित राहातो. 'आमच्यासमोरच बलात्काऱ्याला लगेच फाशी द्या', ही मागणी थेट देशाच्या कायद्याला आणि न्यायप्रक्रियेलाच छेद देते. सात तास रेल्वे वाहतूक बंद पाडल्याने प्रवाशांची झालेली दैना, आर्थिक हानी, हे टाळण्याजोगे होते. परंतु प्रस्थापितांकडून न्याय मिळत नाही ही पूर्वानुभवातून झालेली भावनादेखील असंतोषाला कारणीभूत असते, हेही तेवढेच सत्य.

बलात्कारप्रकरणी बलात्काऱ्यास तत्काळ कठोरात कठोर शिक्षा केली जावी, अशी मागणी नेहमी सर्वांकडून केली जाते. म्हणजेच बलात्कार झाल्यावर काय केले पाहिजे, यावरच सर्वांचे लक्ष केंद्रित झालेले दिसते. परंतु मुळात बलात्कार होणार नाहीत असा समाज निर्माण करण्यासाठी कोणते उपाय करावेत, याबाबत राजकीय, सामाजिक, धार्मिक स्तरावर कोणीही फारसा गांभीर्याने विचार करताना दिसत नाहीत. याचा अर्थ, बलात्कार होणारच आहेत हे समाजाने मान्य केले आहे आणि त्यानंतर बलात्काऱ्यांना किती कठोर शिक्षा करायची या पलीकडे समाजाची मानसिकता सरकताना दिसत नाही. कठोर शिक्षेने बलात्कार कमी होत नाहीत हे गेल्या काही काळात दिसून आले आहे. ही स्थिती महिलांसाठी अत्यंत भयावह आणि चिंताजनक आहे.

पुरुषप्रधान संस्कृतीतून बनलेली समाजाची ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. बलात्कार करणारे पुरुष एका महिलेच्या पोटी जन्म घेतात. त्यांच्या मातेनेच त्यांचे संगोपन केलेले असते. ते करताना लहानपणापासूनच त्यांच्यावर महिलांचा सन्मान करण्याचे संस्कार केले जावेत. यासाठी कुटुंब, समाज, जात, धर्म या स्तरावर जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. या प्रयत्नांतून अशी पिढी घडवली पाहिजे की, त्यांच्यात बलात्कारासारखी विकृती निर्माण होणार नाही. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये बलात्काऱ्यांचा जाहीर सन्मान करणे, भिन्नधर्मीय महिलांच्या प्रेतावरदेखील बलात्कार करण्यासाठी चिथावणी देणे, पीडित महिलांची जात, धर्म तसेच बलात्काऱ्यांची राजकीय बांधिलकी, धर्म वगैरे पाहून निषेध करणे या कारणांनी बलात्कारासारखा घृणास्पद प्रकार जात-धर्म-पक्ष सापेक्ष झाला असून हे अत्याचार सत्र निरंतर वाढतच आहे. असे अत्याचार हा मानवतेवरील एक मोठा कलंक आहे.

महा. अंनिसने या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन लिंगसमभाव, वयात येताना (लैंगिक शिक्षण), जोडीदाराची विवेकी निवड अशा उपक्रमांतून नवी पिढी घडवण्याचे काम यापूर्वीच महाराष्ट्रभर सुरू केले आहे. बदलापूर प्रकरणानंतर महिला सहभाग विभागाने 'स्त्रीसन्मानासाठी पुरुषभान संवाद अभियान' संपूर्ण महाराष्ट्रात राबवून अजून एक पाऊल पुढे टाकले आहे. त्यास सर्वत्र उत्तम प्रतिसाद लाभला आहे. त्याचे वृत्त अंकात आले आहे.

आजचे भयावह चित्र बदलण्यासाठी सर्व धर्म, जाती, राजकीय पक्ष यांनी आपापसांतील मतभेद विसरून निदान या एका मुद्द्यावर तरी एकत्र येऊन अशा गुन्ह्यांचे राजकारण, धर्मकारण, समाजकारण न करता, महा. अंनिसच्या पावलावर पाऊल ठेवून गंभीरपणे काम केले पाहिजे. बलात्काराच्या विकृतीचे बळी होण्याच्या भयाखाली देशात सतत वावरणाऱ्या महिलांना त्यापासून मुक्त करण्यासाठी सर्वांची आणि विशेषतः 'हा देश विश्वगुरू आहे', अशी घोषणा करणाऱ्यांची जबाबदारी अधिक आहे.

**- उत्तम जोगदंड**
अतिथी संपादक

●


महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

# महात्मा गांधी : माझ्या अनुभवातले



**प्रा. डी. यु. पवार** । कोल्हापूर
९४२३८६०२३१

ऑक्टोबर महिन्यातील दुसरी तारीख, महात्मा गांधी यांचा जन्मदिन. आज आम्ही त्यांचा जन्मदिवस, जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करतो. कारण त्यांच्या जन्माचे सार्थक, त्यांच्या जीवनाचे मोठेपण आज आम्हाला कळते आहे. ते हयात नसले तरीही त्यांच्या मोठेपणाचा सुगंध आम्हाला आजही अनुभवाला येतो. परंतु जसे लहानपणी कळायला लागले तसा त्यांचा जन्मदिवस कधी साजरा झालेला अनुभवला नव्हता. मात्र कळत्या वयात गांधी प्रथमच प्रकर्षाने अनुभवाला आले ते त्यांच्या हत्येने.



महात्मा गांधीजींची हत्या झाली तेव्हा मी अजून शाळेतच जात होतो. तो दिवस मला आजही चांगला आठवतो. बातमी आली नि सगळीकडे सुन्न झाले होते. कित्येकांना अश्रू आवरत नव्हते. एवढा सन्नाटा मी कधीच पाहिला नाही. जणू प्रत्येकाला वाटत होते, आपल्या घरातीलच कोणी तरी गेले आहे. त्यातच रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांनी पेढे वाटल्याचे लोकांना कळले. त्यामुळे सामान्य भारतीयाला त्यांचा इतका राग आला होता की, दिसेल त्याला ठोकावे आणि लोकांनी सर्वत्र हेच केले असेल कदाचित. परंतु जाळपोळ झाल्याचे आमच्या कानावर तर कधीच आले नाही. सोलापुरात तरी नाही. अर्थात, त्यांच्या रागाचे बळी निष्पापसुद्धा झाले असतील. त्याचे समर्थन गांधीविचाराने बिलकुल केले जात नाही. आम्ही त्यात सहभागी नव्हतो. कारण आम्ही चाळीत राहात होतो आणि तेथे अनेक जातीधर्माचे लोक राहात होते. तसेच त्यात संघिष्ट कोणीच नव्हते. आम्ही सर्व सानेगुरुजींच्या सेवादलवाले, जातपात न मानणारे.

देशात महात्मा गांधींबद्दल प्रचंड आदर आणि प्रेम होते आणि आजही आहे. आमच्या लहानपणी गांधींच्याबद्दल जे कानावर पडे ते असे की, एवढे सामर्थ्यशाली ब्रिटिश राज्यकर्ते, पण गांधींना घाबरत होते; हेच आमच्या दृष्टीने फार मोठे होते. त्यातही अंगावर साधा सदराही नसलेला हा माणूस कोणत्याही शस्त्राशिवाय हे सामर्थ्य निर्माण करू शकतो, याची जाण आम्हाला आली होती. त्यामुळे त्यांचे शस्त्र असहकाराचे, अहिंसेचे आणि सत्याग्रहाचे होते, एवढेच आमच्या मनावर ठसले होते आणि आजही त्याचा प्रभाव आहे. आम्ही त्यांचे विचार समजून घेण्याइतपत मोठे नसलो तरी आचरणातून विचार कळतात, किमान याची जाणीव होत असायची हे मात्र नक्की! मारणाऱ्यांनी त्यांना का मारले याची कारणे तेव्हा आम्हाला कळली नाहीत; कारण संघाचे विष अजून समाजात पसरले नव्हते. तसा सोलापूरला हिंदू महासभेचा थोडा प्रभाव वि. रा. पाटील यांच्यामुळे होता. तरीही महात्म्याची हत्या हिंदूंच्या भल्यासाठी झाली आहे असे कधीच कोणालाही वाटले नाही. परंतु महात्मा गांधींच्या शत्रूचे हे कृत्य असून रा. स्व. संघ हाच त्यांचा शत्रू आहे हे मात्र कळायला लागले होते.

पुढे गांधीविचार वाचले. पेपर, मासिके वाचण्याची आवड होती; परंतु त्यात कोठेच गांधीहत्येचे समर्थन आले नव्हते. त्यांचा द्वेष करणारी माणसे खूप छोटी आणि दुर्लक्षित होती. परंतु याच छोट्या, मूठभर, दुलाक्षित लोकांनी नंतर हळूहळू भूमिगत (स्लीपर सेल म्हणतात त्याप्रमाणे) विषपेरणी चालू केली. प्रथम गांधीहत्या म्हणण्याऐवजी गांधीवध शब्द जाणीवपूर्वक वापरला जाऊ लागला, त्यामुळे या शब्दाआडून गांधींचे सगळे हत्यारे जणू दैवी असल्याचे जनमानसात बिंबवण्याचा प्रयत्न सुरु झाला. मग गांधींना खोटेखोटेच मुस्लीमधार्जिणे ठरविणे, पंचावन्न कोटी वगैरे आणि दुसऱ्या बाजूला त्यांची सत्य-अहिंसेची विचारसरणी अव्यवहार्य आहे, ते वर्णाश्रमाचे पुरस्कर्ते आहेत, दलितविरोधी आहेत,

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्याविरोधी आहेत वगैरे खोटी बाजू मुद्दाम कानोकानी, कुजबुज तंत्राने पसरवली जात होती. वास्तविक पाहाता, घटनासमितीमध्ये तज्ज्ञ म्हणून ब्रिटिश विचारवंत जिनिंग यांना बोलवावे असे पटेल आणि नेहरू यांना वाटत होते. पण गांधीजींनी डॉ. आंबेडकरांना घटनासमितीत घेण्याचे ठरविले आणि तसा सल्ला नेहरूंना दिला.

रा. स्व. संघाचा गांधीविरोधी पूर्ण असत्य गोष्टी सांगण्याचा सपाटा आजतागायत चालू आहे. आता तर गांधींच्याविषयी अनेक खोट्या गोष्टी पसरवण्यासाठी त्यांना सोशल मीडियाचे हत्यार वापरण्याची मोठीच संधी मिळाली आहे. मी गांधी आणि सर्व तत्कालीन इतिहास याचा अभ्यास केलेला असल्यामुळे त्यांचा खोटारडेपणा माहीत आहे. परंतु माझ्यासारखे गांधींचा पूर्ण अभ्यास करणारे किती असतील? सर्वसामान्य माणसे एवढे कुठे लक्ष देतात? त्यांच्या कानावर गांधींविषयीची विषारी कुजबुजच तेवढी पडते. एक संघाचा स्वयंसेवक खाजगी मीटिंगमध्ये ही विषपेरणी करू शकतो. तरीही गांधीजींची प्रतिमा त्यांना हवी त्या प्रमाणात जनमानसामध्ये मालिन होत नाही म्हणून मग मानभावीपणे पूजा करताना आणि आदर दाखविण्याचा दांभिकपणा करण्यात ते कमी पडत नाहीत.

समाजवादी नेते गांधी विचारसरणीचे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांनाही बदनाम करण्याचा प्रयत्न केला जातो. कारण संघ पूर्णपणे भांडवलशाहीचा पुरस्कर्ता असल्यामुळे समाजवादविरोधी अघोषित युद्धच त्याने पुकारले आहे. समाजवाद कसा अव्यवहार्य आहे, तसेच साम्यवादी देशांमध्ये कसे अत्याचार होतात याची रसभरीत वर्णने आणि रशियाविरोधी प्रचार करून संघाने अमेरिका व इस्रायलचा पुरस्कार केलेला आढळतो. बॉंड रसेलने गांधीजींना विसाव्या शतकाचा नायक म्हटले आहे आणि गांधी अपयशी ठरले तर माओशिवाय पर्याय नाही असेही रसेल यांनी म्हटले आहे. जगामध्ये गांधीविचारांचा प्रभाव फार मोठा असून त्यांच्या विचारांशिवाय विश्वात शांतता निर्माण होणार नाही असे त्यांना वाटते. पण संकुचित विचारांच्या लोकांचे आजही गांधींची हत्या करण्याचे प्रयत्न चालूच आहेत. सर्व भारतीय नागरिकांनी यापासून सावध राहिले पाहिजे; ज्यांना गांधीविचार कळतात त्यांनी इतरांना सावध केले पाहिजे.

गांधीजींबद्दल लिहिताना ते कर्मठ व प्रतिगामी हिंदू होते आणि समाजसुधारणेच्या विरोधी होते असे हेतुतः जे सांगितले जाते, तो अपप्रचार आहे. गांधीजी म्हणत, 'गांधीवाद नावाची अशी कोणतीही गोष्ट नसून आहेत ते केवळ माझे सत्याचे प्रयोग आहेत, ज्यांना योग्य वाटतील त्यांनी ते स्वीकारावेत'. गांधींचे 'सत्याचे प्रयोग' हे त्यांच्या जीवनप्रणालीचे प्रयोग होते आणि असे प्रयोग ते आपल्या आश्रमातील दैनंदिन व्यवहारातून करीत असत. ज्यांना हे प्रयोग पटतील त्यांनी आपापल्या जीवनप्रणालीत आचारांत आणावेत एवढेच त्यांचे साधे आवाहन होते. सानेगुरुजींपासून सर्व समाजवादी आणि सर्वोदयी विचारवंतांवर महात्मा गांधींच्या विचाराचा प्रभाव होता; त्यापैकी कोण कर्मठ, प्रतिगामी, धर्मांध हिंदुत्ववादी होते का? यातच खरेतर गांधींच्या विचारांचा, त्यांनी पुरस्कृत केलेल्या जीवनप्रणालीचा प्रभाव लक्षात यावा.

गांधी स्वतः रूढी, परंपरेचे समर्थन करणारे संत नव्हते; ते एक प्रयोगशील विचारवंत, मानव होते. ते रूढ अर्थाने, पारंपरिक अर्थाने धार्मिक कधीच नव्हते. त्यांनी कोणत्याही देवाची पूजाअर्चा, आरती कधीच केली नाही. या अर्थहीन गोष्टी आहेत, कारण त्यात मानवतेचा कोणताही विचार नाही. सहजीवनासाठी कुणाची आरती करण्याची गरज नाही, फार तर स्वतःसाठी प्रार्थना केली पाहिजे; माणसाला इतरांची पीडा जाणता आली पाहिजे. आपण जरा घरातच वाकून पहा आणि स्वतःला विचारा की, आपण घरातील लोकांच्या पीडा जाणतो का? तसा विचार कधी केला आहे का? वागताना त्यांना पीडा होऊ नये असे वागतो का? मग तरीही त्यांना आपण आपले म्हणतो ते केवळ स्वतःच्या सुखासाठी. ज्या घरात या पीडा जाणल्या जातात, ज्याला समजून घेणे असे म्हणता येईल, तेथेच सुख-शांती नांदेल. आपण देवाची आरती म्हणतो आणि गांधी प्रार्थना म्हणत. हे धर्माचा वापर करणाऱ्या लोकांना आवडणार नाही; कारण ते त्यांना अडचणीचे ठरते. गांधीजी 'सत्य हाच परमेश्वर आहे', असे म्हणत; परंतु त्याचबरोबर 'परमेश्वर सत्य आहे की नाही, हे माहीत नाही', असेही म्हणत. तसेच ईश्वराचा कोणताही धर्म नाही, ही त्यांची भूमिका वास्तव, तर्कशुद्ध आहे. कारण कोणताही धर्म अस्तित्वात येण्याआधी सर्व विश्व अस्तित्वात होते. तसेच प्रत्येक धर्माच्या प्रेषिताने काही वेगळे विश्व निर्माण केले नाही, हे सुद्धा वास्तव

आहे.

धर्मातील वाईट प्रथांच्या विरोधातच गांधीजींनी जीवन व्यतीत केले. म्हणून मंदिरांच्या पावित्र्याच्या नावाखाली अस्पृश्यता पाळणे आणि अस्पृश्यांना मंदिर प्रवेश नाकारणे अशा रूढींच्या ते विरोधी होते. १९२५ मध्ये त्यांना केरळमधील मंदिराची परिक्रमा करण्यास परवानगी दिली, परंतु मंदिर प्रवेश नाकारला. कारण ते इंग्लंडला जाऊन आले होते, समुद्र ओलांडून त्यांनी परदेशगमन केले होते म्हणून त्यांना मंदिरप्रवेश नाकारला होता. तसेच अस्पृश्यांना तर मंदिराच्या आवारातसुद्धा प्रवेश नव्हता, याचे गांधीजींना खूप वाईट वाटले होते. त्यानंतर तेथील राजा सी. टी. बी. वर्मा परदेशात जाऊन आल्यानंतर त्यांना हा बंदी आदेश आवडला नाही. म्हणून राजांनी १९३६ मध्ये अस्पृश्यांना मंदिरप्रवेशाचा आदेश काढला आणि खास गांधींना बोलावून आदेश जाहीर केला. राजांनी मंदिर प्रवेशावरील बंदी उठवली होती तसे लेखी आदेशही काढले होते. त्यानंतर भारतभर मंदिर प्रवेशाची चळवळच इथून सुरू झाली. गांधीजी लहानपणापासूनच अस्पृश्यता मानत नव्हते. हे तुम्हाला माहीत आहे का? ते मातृभक्त होते. आईच्या आज्ञांचे ते पालन करीत. तरीही भंग्याला न शिवण्याचा आईचा आदेश गांधींनी बालपणीच पाळला नव्हता. याच कारणावरून दक्षिण आफ्रिकेत स्वतःच्या बायकोला कस्तुरबांनासुद्धा घराबाहेर काढण्याची धमकी गांधींनी दिली होती.

गांधींनी दक्षिण आफ्रिकेतून आल्यानंतर अहमदाबाद येथे साबरमती नदीच्या किनारी आश्रम सुरू केला. त्या आश्रमात ठक्करबाप्पा यांनी पाठविलेल्या विणकर कुटुंबाला गांधींनी आश्रय दिला. त्याचवेळी एका अस्पृश्य कुटुंबालादेखील आश्रय दिला होता. म्हणून तेथील वैष्णव ब्राह्मणांनी आश्रमाला मदत देणे बंद केले होते. तेव्हा गांधींनी थेट हरिजन वस्तीतच जाऊन राहाण्याची घोषणा केली. या कुटुंबाबरोबर राहाण्यास नकार दिला म्हणून सख्ख्या बहिणीला त्यांनी आश्रमातून काढून टाकले होते. एवढेच नाही तर इतरांनी आश्रमावर बहिष्कार टाकल्यामुळे कस्तुरबादेखील विचलित झाल्या होत्या. तेव्हा गांधींनी कस्तुरबा यांनादेखील वाटत असेल तर आश्रम सोडून जाण्यास परवानगी दिली; परंतु अस्पृश्य कुटुंबाला आश्रमाबाहेर काढण्यास गांधींनी नकार दिला.

त्यानंतर गांधींनी अस्पृश्यता निवारणासाठी 'हरिजन सेवा संघ' स्थापन केला. 'हरिजन' हा शब्द त्यांनी 'देवाची मुले' या अर्थाने वापरला होता. तत्कालीन अस्पृश्यांना अस्पृश्य म्हणणे ही चुकीची गोष्ट का टिकवायची असे त्यांचे मत होते. 'अस्पृश्य' हा शब्दच बाद करण्यासाठी त्यांनी 'हरिजन' हा शब्द वापरण्यास सुरुवात केली. त्यातून हेच लोक अधिक पवित्र आहेत असा अर्थ ध्वनित होतो, तोच त्यांना सामान्य लोकांमध्ये रुजवायचा होता. अस्पृश्यता निवारणासाठी गांधीजींनी देशभर प्रवास केला होता. पुरीच्या जगन्नाथ मंदिरात तेथील पुजारी गांधीजींना एकट्याला प्रवेश देण्यास तयार होते. परंतु हरिजनांसह आपल्याला प्रवेश मिळावा यासाठी ते आग्रही होते. या त्यांच्या हट्टामुळे तेथे त्यांच्यावर हल्लेही झाले होते. गांधीजींवर जे हल्ले झाले त्यांची मुख्य कारणे त्यांनी तत्कालीन अस्पृश्यांना समानतेच्या वागणुकीचा, समाजात प्रत्येक ठिकाणी समानतेने त्यांना सामावून घेण्याचा आग्रह धरला हीच होती. एकदा त्यांच्या मोटारीवर बॉंब हल्लासुद्धा झाला होता; त्यातून ते बचावले. परंतु अशा कोणत्याही दहशतवादी कृत्यांनी ते कधीच डगमगले नाहीत.

गांधींनीच संविधान सभेसाठी डॉ.आंबेडकरांचे नाव सुचविले होते आणि डॉ.आंबेडकरांना निवडून आणण्यासाठी त्यानुसार प्रयत्न झाले व त्यांना संविधान सभेत स्थान मिळाले. अशा प्रकारे आपल्या संविधानाच्या कलम १७ नुसार अस्पृश्यता दूर करण्यात, दुर्बल समाजघटकांसाठी आरक्षणाच्या स्वरूपात प्रतिनिधित्व मिळण्यात महात्मा गांधी हेच कारण ठरले आहेत. परंतु कर्मठ हिंदूंकडून अजूनही पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना मंदिरप्रवेश दिला जात नाही. हा कर्मठ हिंदूंचा हट्टीपणा स्वतःचे श्रेष्ठत्व टिकविण्यासाठीच आहे आणि तरीही गांधींना दोष देताना मात्र तेच विचारतात, 'गांधींनी अस्पृश्यासाठी काय केले?' या दुटप्पीपणाला काय उत्तर द्यावे? पण अशा अनेक मार्गांनी गांधीविचारांच्या हत्येचे प्रयोग चालू आहेत. त्यांच्या अशा प्रयत्नांना थारा द्यायचा नसेल समतेच्या तत्त्वाचा स्वीकार घरात आणि बाहेर केला पाहिजे.

मुख्य म्हणजे आपल्या धर्मविषयक कल्पना काय आहेत हे एकदा आपण भारतीयांनी तपासून पाहायला हवे. रूढी, परंपरा, सण, उत्सव आणि जयंत्या, अशा दिवशी ठरलेले खाद्यपदार्थ बनवून खाणे म्हणजेच

आपापल्या धर्माचे पालन, असेच प्रत्येक धर्मातील व्यक्ती मानते. त्याचप्रमाणे जन्माधारीत जाती पाळणे आणि त्यावर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठता हासुद्धा आम्हाला धर्माचाच भाग वाटतो. खरे तर, हाच संघाला मान्य असलेला आणि मनुस्मृतीवर आधारित, तसेच विषमता आणि अन्यायावर आधारित त्यांचा सनातन धर्म आहे. अशा प्रतिगामी धार्मिक मूल्यांचे पालन सर्वच हिंदू न सांगताच करीत आहेत. अशा लोकांनी गांधींना सामाजिक सुधारणेच्याविरोधी मानावे हेच दुट्टपीपणाचे, दांभिकतेचे आहे, हेच आमच्या लक्षात येत नाही. हीच धर्मव्यवस्था सामाजिक सुधारणेविरुद्ध आणि सर्व बहुजनांना आणि स्त्रियांना शूद्र ठरविणारी आहे हे गांधींना शिव्या देणाऱ्या भक्तांना माहीत नाही. महात्मा गांधी सर्व धर्मांना समानतेने मानत होते. म्हणजे माणूस धर्माने चांगला हिंदू, चांगला मुस्लीम, चांगला ख्रिश्चन बनला पाहिजे असे त्यांचे धर्माविषयी मत होते. आता 'चांगला' याचा अर्थ तुम्ही काय घ्याल? विषमता मानणारा, दलित आणि सर्व जातीतील स्त्रियांना शूद्र मानणारा, अन्यायी विषमतेवर आधारित धर्म म्हणजे चांगला धर्म? असाच धर्म तर संघाला अपेक्षित आहे. महात्मा गांधींच्या मते, मानवता हाच खरा धर्म आहे आणि तीच मानवता सर्व मूळ धर्मांमध्ये सामावलेली आहे; मनुस्मृतीत नाही. स्वामी विवेकानंद मानत असलेला वेदान्त, भगवान बुद्धांचा धम्म, महावीरांचा आणि बसवेश्वरांचा धर्म. धर्माचा मूळ अर्थ नीतिमत्तेशी, नैतिक आचरणाशी निगडित आहे आणि मानवता हीच धार्मिकता आहे. महात्मा गांधींची धर्माकडे पाहाण्याची अशी दृष्टी होती. त्यामुळे धर्मांतराची कल्पना त्यांना मान्य नव्हती. कारण एकदा का धर्मांतराचे खूळ मान्य केले की, कोणत्याही धर्मातील मानवतेची मूल्ये हरवून धर्म नावाच्या संघटनांमधील सभासदसंख्या वाढविण्याच्या संख्येच्या खेळापलीकडे धर्म या संकल्पनेला महत्त्व उरत नाही. अन्याय करणारी, अनैतिक आचरण असणारी व्यक्ती धार्मिक कशी असेल? मग कुणाला समाजसुधारक म्हणणार? आरएसएसच्या स्वयंसेवकांना? अहिंसा हाच खऱ्या धार्मिकतेचा पाया आहे. हिंसा करणारे कधीच धार्मिक नसतात. मग ती हिंसा मानसिक स्तरावरील का असेना. खऱ्या प्रेमाची सुरुवात अहिंसेने होते. घरात बायकोला मारणारे, मुलगी होईल या भीतीने भ्रूणहत्या करणारे आणि मुलीने जातीबाहेर लग्न केले म्हणून दोघांची हत्या करणारे, स्त्रीला उपभोग्य वस्तू मानून बलात्कार करणारे आणि तरीही रोज मंदिर-मशिद-चर्चमध्ये जाणारे, पापविमोचन करणारे, भ्रष्टचार करून गंध लावणारे या सर्वांना धार्मिक म्हणता येईल? महात्मा गांधींच्या भाषेत हे हिंसक असून ते धार्मिक कसे असू शकतील? तो खरा हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन कसा होईल? गांधीजी म्हणतात, सत्य हाच ईश्वर आहे. पण त्यासाठी सत्य जाणून तर घेतले पाहिजे, त्यानुसार आचरण तर केले पाहिजे. संघाचे विषमतावादी विचार डोक्यात घेऊन सत्य कधीच कळणार नाही. ते समरसतावादी आहेत. पण गांधी समतावादी आहेत. जो आपल्याप्रमाणेच दुसऱ्याचा जीव जाणतो, पीडा जाणतो तोच तर खरा समतावादी, धार्मिक. आणि तो समतेची सुरुवात आपल्या घरातूनच करेल. महात्मा गांधींवर टीका करणाऱ्याच्या घरात समता आली आहे का? ते नीतिमान आहेत का? ते तपासून घ्या, म्हणजे सत्य जाणून घ्या. म्हणजे कळेल, समाजसुधारणेला कोणाचा विरोध आहे.

शेवटचा मुद्दा म्हणजे महात्मा गांधींच्या सर्वोदयाची चर्चा कधीच केली जात नाही; त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला जातो. तुम्हाआम्हाला खादीचे कपडे घालणारी व्यक्ती म्हणजे सर्वोदयवादी एवढेच माहीत असते. नव्हे, तर तो अनेकांना देखावा वाटतो. परंतु त्याचे अर्थशात्र हाच गांधीजींचा ब्रिटिशांच्या विरोधातील संघर्षाचा मूलमंत्र आहे, हे किती लोकांना माहीत आहे? खादीचा अर्थ माहीत नसेल. संघ आणि हिंदुमहासभा हे दोन्हीही आज कितीही देशभक्तीचा देखावा करीत असले तरी ते मुळात ब्रिटिशधार्जिणे होते. खादी वापरणे आणि चिमूटभर मीठ लुटून तुरुंगात जाणे हे ब्रिटिशांच्या आर्थिक आणि राजकीय सामर्थ्याविरोधात महात्मा गांधींनी उभे केलेले सर्वात मोठे आव्हान होते, हे किती लोकांना कळलेले आहे? ब्रिटनच्या कापड उद्योगामुळे आम्ही ब्रिटिशांच्या वसाहतवादाला बळी पडलो होतो. म्हणून स्वदेशी हेच शस्त्र खादी आणि स्वदेशीच्या रूपाने गांधींनी वापरले होते आणि दांडीयात्रेने तर ब्रिटिश संसदेलाच आव्हान दिले होते. स्वातंत्र्यानंतरचा भारतीय समाज कसा असेल याचे उत्तर ग्रामस्वराज्य आणि सर्वोदयामध्ये आहे. हे भांडवलशाहीला विरोध करणारे आणि समाजवादाशी जवळीक साधणारे आहे असे आम्हाला कुणीच सांगत नाही. परंतु संघ नेहमी समाजवादाची टिंगलटवाळी

करणारी चटपटीत उथळ वाक्ये आजच्या सवंग सोशल मीडियावरून प्रसारित करतो आणि ती कोणताही सामाजिक, राजकीय, आर्थिक अभ्यास नसणाऱ्या तरुणांच्या रिकाम्या मेंदूत चांगली घट्टपणे जाऊन बसतात. संविधानात तरतूद असलेली व समाजवादी समाजरचनेसाठी मार्गदर्शक तत्त्वांमधून निर्देश केलेली, त्यानुसार पंडित नेहरूंनी सुरू केलेली वाटचाल आज सत्ताधारी संघाने जवळपास मोडीत काढलेली आहे. त्यांचा ब्रिटिश साम्राज्यवाद आणि तत्कालीन भांडवलशाहीला पाठिंबा होता. त्यामुळेच आज सत्ता प्राप्त करून ते त्याच दिशेने वाटचाल करीत आहेत. म्हणून तर सर्वांना गांधी, गांधींची ग्रामस्वराज्याची, सर्वोदयाची, सत्य-अहिंसेची तत्त्वे कळूच नये यासाठी त्यांचे सातत्याने प्रयत्न चालू असतात. सामान्य भारतीयाच्या अस्तित्वाचाच बळी घेणाऱ्या या लोकांना यश मिळू द्यायचे की नाही हे तुमच्या आमच्या हातात आहे. त्यासाठी गांधी वाचा. गांधींचे व्यक्तिमत्त्व, गांधींचे विचार, गांधींचे कार्य नि कर्तृत्व जाणून घ्या. गांधींची सत्य-अहिंसा ही तत्त्वे जाणून घ्या; आणि गांधींना मनात ठेवा. तुमच्या आमच्यासारख्या सामान्य भारतीयांच्या मनातला गांधी मरत नाही हेच संघाचे मोठे दुःख आहे. गांधी ही व्यक्ती राहिली नसून तो एक वैश्विक विचार झाला आहे. त्यामुळे तो जेव्हा जेव्हा मांडला जाईल तेव्हा तेव्हा त्याच्या केवळ विरोधीच नव्हे तर त्याच्याशी शत्रूभाव राखणाऱ्या विचारांचासुद्धा परामर्श घेणे ओघाने येतेच आणि भारतीय परिप्रेक्ष्यात तर ते अनिवार्यदेखील ठरते.

महात्मा गांधींच्या स्वप्नात एक असा भारतीय समाज होता, ज्यात जात, धर्म, लिंग, भाषा, प्रांत यावर आधारित भेद व विषमता नसतील; गरीब-श्रीमंत भेद नसतील, शोषण नसेल. गांधीजी म्हणायचे, कोणीही कोणतेही बौद्धिक काम करो, त्याने दिवसातून किमान दोन तास शारीरिक कष्टाचे काम केलेच पाहिजे, तरच त्या व्यक्तीस एका वेळेच्या भोजनाचा अधिकार प्राप्त होतो. यानुसारच त्यांच्या आश्रमातील दैनंदिन कामकाज चाले. सर्व आश्रमवासियांना सर्व प्रकारची कामे करावी लागत. ज्या समाजात अनेक कायदेकानून यांची बंधने नसतील, जिथे केवळ नैतिकतेने व्यवहार होतील असा समाज घडविण्याचे आणि त्या समाजातील माणूस घडविण्याचे गांधींचे प्रयत्न होते. देशाची राज्यघटना लिहून झाल्यानंतर ती राज्यघटना समितीकडे सादर करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे भाषण केले त्यात त्यांनी आशा व्यक्त केली होती की, ही राज्यघटना प्रामाणिकपणे राबविणारी माणसे देशाच्या शासनात आली पाहिजेत. परंतु जे राज्यघटना प्रामाणिकपणे राबवतील अशी नीतिमान माणसे घडविण्याचे काम गांधीजींनी अनेक दशके आधीच सुरू केलेले होते. ती त्यांनी स्वतःच्या आचरणातून आदर्श घालून देऊन घडविली होती. त्यामुळे भारत स्वतंत्र झाल्यावर जातीधर्मांची इतकी विविधता असणाऱ्या या देशात लोकशाही कशी टिकेल, अशी जगभर शंका व्यक्त होत असताना गांधीजींच्यानंतर त्यांनीच घडविलेल्या माणसांनी या देशात लोकशाही स्थापित केली आणि प्रस्थापितदेखील केली.

गांधी जयंतीच्या सर्व भारतीयांना हार्दिक सदिच्छा!

●

## अभिनंदन



महा.अंनिसचे राज्य सरचिटणीस सुधाकर काशीद, मोहोळ, जि. सोलापूर यांची मुलगी स्नेहा आणि कैलास पाटील, नांदेड यांचा मुलगा विशाल या दोघांचा सत्यशोधक पद्धतीने विवाह संपन्न झाला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने काशीद आणि पाटील परिवारांचे मनःपूर्वक अभिनंदन!

## अभिवादन

**बी. प्रेमानंद स्मृतिदिन**

भारतातील बाबा-बुवांचे चमत्कार आणि त्याद्वारे होणारे शोषण, पिळकवणूक, फसवणूक याविरुद्ध अत्यंत शिस्तबद्ध, विवेकी पद्धतीने प्रखर लढा देणारे, चमत्कार-अंधश्रद्धाविरोधी आंदोलनाचे प्रतीक असलेले बी. प्रेमानंद (जन्म १७.०२.१९३०) यांचा मृत्यू दिनांक ४ ऑक्टोबर २००९ रोजी झाला. त्यांना विनम्र अभिवादन.

प्रासंगिक

# संतपरंपरा आणि समतेची शिकवण



**अनुज हुलके** । गडचिरोली
९८२३८८३५४१

अखिल मानव उद्धारक विचार हे कालजयी असतात. विचारांची मूल्ये काळानुरूप समाजाला उपयोगी पडतात हेच खरे! संतांनी समाजात रुजवलेले विचारही असेच मूल्याधिष्ठित असतात.

'माणूस द्या मज माणूस द्या हो,
भीक मागता प्रभू दिसला ।।'

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे हे कवन ऐकले की, भरकटलेला माणूस भानावर आल्याविना राहात नाही. तुकडोजी महाराज यांनी सुमारे साठ वर्षांपूर्वी विविध समाजोद्धारक विषयांवर चिंतन मांडले. त्यांची मराठी व हिंदी भाषेत असलेली लोकप्रबोधक भजने, ग्रामगीता, विवाहोपयोगी मंगलाष्टके, जेवणावळीत म्हणतात ते उद्‌बोधक श्लोक आणि द्वैभाषिक भाषणे अशी विपुल साहित्यसंपदा प्रसिद्ध आहे. त्यातून समाजोन्नतीचे विचार व मूल्ये त्यांनी प्रसृत केलीत. तथापि, त्यांच्या चिंतनाचा केंद्रबिंदू माणूसच राहिला आहे. असा माणूस जो माणसावर प्रेम करणारा असेल. अशा माणसात ते साधुत्व आणि संतत्व शोधत. अशा माणसात त्यांना ईश्वर दिसत असे आणि माणसाची सेवा करणे, माणसामाणसांमध्ये प्रेम निर्माण होणे हीच ईश्वरभक्ती आणि हीच मानवता होय. माणुसकीला जपणाऱ्या अशा समाजाला मग लबाडी, थोतांड, दांभिकता यापासून मुक्ती मिळून; सचोटीने वास्तवाला भिडण्याचे सामर्थ्य येते. प्रामाणिक माणसाला आपले काम करत असतानाच देवाचे दर्शन घडते, उलट बेईमान माणसाने कितीही टाळकुटेपणा केला आणि मूर्तीपुढे मस्तक घासले तरी त्याला देव दिसू शकत नाही आणि म्हणून ईश्वर हा इतरत्र कुठेही नसून साक्षात सज्जन माणसातच वास करतो, असे ते म्हणत.

'तीर्थी धोंडापाणी,
देव रोकडा सज्जनी।'

हे सूत्र संतांनी दीर्घकाळ मांडून लोकप्रबोधन केले. खरे म्हणजे संत तुकडोजी महाराजांनी मांडलेला हा विचार मानणारी संतांची दीर्घ परंपरा आहे. मानवनिर्मित विषमता ही माणसाच्या जीवावर उठणारी आहे. वर्णभेद, धर्मभेद, जातीभेद, लिंगभेद हे मानवाच्या विकासाच्या ज्या विविध ऐतिहासक टप्प्यावर निर्माण झाले, तेथे त्या टप्प्यांवर धूर्तांनी माणूसच दुय्यम ठरवला. तिथेच विषमताखोर विषवल्लीचे बीजारोपण होत गेले. उच्च-नीच भाव माणसाच्या मनात निर्माण करून उच्चजात स्वार्थी प्रवृत्तीने समाज पोखरून टाकला. प्राणीमात्रात मानव सर्वश्रेष्ठ आहे खरा; पण समाजमनावर कलम केलेली विषमता मानवतेसाठी कलंक ठरली आहे. त्यामुळे भेदभावाची पाळेमुळे खणून काढल्याशिवाय समाज प्रगत होणार नाही.

माणसाला उन्नत अवस्थेत पोहोचण्यासाठी संत माणसात देव शोधतात. माणसाबद्दल प्रेमभाव, हातात हात घेऊन समभाव, प्रतिष्ठेची वागणूक, घृणा नाही. द्वेष नाही. सामान्य माणसाच्या या निरलस भावछटा माणसाशी समतेच्यादृष्टीने उपयुक्त ठराव्यात. असा विवेकीविचार मानवी व्यवहारात यावा, म्हणून एखादा भीक मागणारा सर्वहारा माणूसही प्रभू वाटला पाहिजे, असे संतांचे वचन समाजाला अंतर्मुख करणारे आहे.

संतश्रेष्ठींनी समाजाला इतकी मौलिक शिकवण देऊन ठेवलेली असून आजही माणूस माणसाची हेळसांड करताना दिसतच आहे. अनेक ठिकाणी लहान मुलं, म्हातारे, अपंग अशी माणसं भीक मागताना दिसतात. त्यांना भीक मागणे आवडते किंवा ते फार आनंदाने भीक मागतात असं अजिबात असण्याची शक्यता नसते. भीक मागणाऱ्यांची कित्येकदा प्रचंड नाचक्की होते. तरीही अगतिकतेने, अपमान पचवत ते भीक मागत असतात. मानव सर्व प्राणिमात्रांत बुद्धिमान आहे, त्याला भाषेची असलेली इतर प्राण्यांपेक्षा अद्वितीय खास बात, यामुळे त्याचं वेगळेपण निसर्गसृष्टीमध्ये दिसून येते. तरीही भीक मागण्याची विशिष्ट व्यक्तीवर अनैच्छिक आफत येते. खरंतर, ही 'बला' विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेची देण होय. विषमतेमुळे निर्माण झालेले साधनसामग्रीचे असमान, अपुरे, कमी-अधिक वितरण, संधीची

असमानता यामुळे भिकारी (गरिबी-दारिद्र्यसुद्धा) ही समस्या निर्माण झाली. भिकारी हे समाजाला लागलेली कीड आहे. अशा भिकाऱ्यांना चक्क गोळ्या घालून संपवले पाहिजे, असे कधी कोणीतरी बरळत जातात. धडधाकट भिकारी दिसला की, काही कामधंदा का करत नाही असे फुकटचे सल्ले देणारेही काही कमी नाहीत. भीक मागणाऱ्या कच्च्या-बच्चांना तर टिंगलटवाळीने टोचून, टाकून बोलत त्यांची मस्करी करणे असे प्रकार अवतीभवती नित्याने नजरेत येत असतात. त्यांच्या पुनर्वसनाचा केवढा मोठा प्रश्न व्यवस्थेसमोर आ वासून उभा आहे? स्वातंत्र्यापश्चात पाऊणशे वर्षांच्या काळानंतरही आमच्या देशवासियांचा बंधुभावाने हातात हात घेऊन त्यांना समानतेच्या पातळीवर आणू शकलेलो नाही, असा याचा अर्थ निघू शकेल. संतांनी मात्र अशा रंजल्या-गांजल्यांना आपले मानून जनातच देव शोधला.

'जे का रंजले गांजले,
त्याशी म्हणे जो आपुले'

म्हणत विषमतेने ग्रस्त समाजमनावर मानवसेवेचे रोपण करण्याची केवढी अप्रतिम मानसोपचार पद्धती संतांनी अवलंबली म्हणावी!

वारकरी पंथ म्हणजे पंढरीची वारी-तीर्थयात्रा करणारा पंथ नसून तो प्रचलित व्यवस्थेवर (विषम वैदिक सूत्रांवर) वार करून लोकांना मुक्ती देणारा पंथ होता. वारकरी पंथ म्हणजे विचाराने वार करणारे, धर्मशास्त्रविरुद्ध पुकारलेले वैचारिक युद्ध होय. वारकरी पंथाला मानणाऱ्या प्रामाणिक खऱ्या संतांनी वैदिक धर्मातील पुरोहितशाही व ईश्वरशाहीवर वार केले. पंडित पुरोहितांनी जेव्हा लोकांना देवळात जाऊन पूजापाठ करण्यासाठी प्रवृत्त केले, तीर्थयात्रेला जाण्यासाठी प्रेरित केले, दक्षिणांच्या माध्यमातून लुबाडणे सुरू केले, तेव्हा वारकरी पंथाला मानणाऱ्या संतांनी अभंगातून लोकांना जागृत केले. संत नामदेवांनी -

'देव देव्हाऱ्यात नाही,
देव नाही तीर्थात।
तोचि वसतो कष्टात,
तोचि दिसतो परोपकारात।'

अशी दांभिक धर्ममार्तंडांची कानउघाडणी केली.

तर,

' तीर्थी धोंडा पाणी देव रोकड सज्जनी'

(प्रु.१३०-३१, सत्यशोधक समाज प्रबोधन-प्रबोधनकार अरविंद माळी) संत तुकारामांनी या अभंगातून सज्जनात ईश्वर वास करतो, अशी महती अधोरेखित केली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,

'मंदिरात नाही दिसला सावळा मुरारी...,
मंदिर मंदिर क्या घुमता है।
पहिले सेवा कर गरीबों की।'

अशाप्रकारे मूर्तिपूजा आणि देवळांपेक्षा मानवसेवेचा महिमा संतांनी वर्णिलेला दिसतो. मग ईश्वर आणि धर्म मानायचा की नाही असा पेच सामान्य माणसाच्या मनात निर्माण होतो. त्यावर वारकरी पंथातील आपल्या संतांनी ईश्वर कसा मिळणार व धर्म कशाला म्हणायचे हेही सांगितले आहे.

रंजल्या-गांजल्यांची सेवा करणे हे तुकोबांचे वचन जेवढे बोलके आहे तेवढेच परखड गाडगेबाबांचे खडे बोलही ऐकू येतात. भुकेल्यांना अन्नदान, तहानलेल्यांना पाणी, निरक्षरांना शिक्षण द्या, उघड्या-नागड्यांना कपडे द्या, हीच खरी पूजा आहे. संत नामदेवांनी तर,

'भजा आत्मदेवा।
अखंडित सेवा।
करा त्याची।
कोणाही जीवाचा
न घडो मत्सर।
मर्म परमेश्वर
पुजनाचे।'

अशा शब्दांत द्वेष करणाऱ्या विषमतावाद्यांना चांगल्याच कानपिचक्या दिल्या. संत सावता माळी,

'कांदा मुळा भाजी।
अवघी विठाई माझी।'

म्हणत आराध्य दैवताचे अपारंपरिक रूप सांगतात.

तर सानेगुरुजी,

'कुणा ना तुच्छ लेखावे,'
'सर्व हीन अतिपतीत,
दीन पददलित,
आर्त अतिविकल'

गांजलेल्यांना प्रेम अर्पण करणे म्हणजेच खरा धर्म होय, असे म्हणतात.

सामान्य माणूस प्रेमाने, बंधुप्रीतीने, जिव्हाळ्याने, आत्मीयतेने एकोप्याने, सहकार्याने, सहृदयतेने वागतो, हा खरं तर धर्माचा सार असला पाहिजे. The day we

find a great number of men and women with this psychology who cannot devote themselves to anything else than the suffering humanity, that day shall inaugurate the era of liberty. (p.11, Why I am Atheist- Bhagat Singh) अर्थात, भगतसिंगदेखील मानवसेवा करणाऱ्यांची संख्या वाढेल त्या दिवसाला स्वातंत्र्ययुगाची सुरुवात मानतात.

अर्थात, संत न् महामानवांनी मानवच केंद्रस्थानी मानून त्याचे दुःखनिवारण करणे, मानवाची सेवा करणे, हाच धर्म मानला, परोपकार, अस्पृश्यता उच्चाटन, जातीभेदाविरोधात एकोपा, सहभोजन, मानवसेवा, परमार्थ साधत माणसात देव शोधला. मनात उच्चनीच भेदाभेद न ठेवता सद्वर्तन, सदाचार करून सन्मार्गाने जगणे याला प्राधान्य दिले. मन परिवर्तनावर भर दिला.

मराठी संत आणि संतसाहित्य हे केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या अभ्युदयाचा व्यासंग व्हावा, अशा लाखमोलाचे आहे. मराठी संतांनी तेराव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत येथील जनजीवन व्यापून टाकले, भारून टाकले होते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक समृद्धीमध्ये मराठी संतांचे योगदान तर अनन्यसाधारण आहे.

संतपरंपरा मानत असलेल्या या विचारप्रवाहाला हजारो वर्षांची प्रदीर्घ अशी समृद्ध, ऐतिहासिक पार्श्वभूमी राहिलेली आहे. लोकायत, बौद्ध, जैन, लिंगायत, महानुभाव इ.अवैदिक धर्म-पंथ आपापल्या मताचा जोरदार पुरस्कार करीत असताना अनेकदा त्यांना वैदिक परंपरावाद्यांचा प्रतिहल्ला जिव्हारी लागणारा ठरला. हेमाद्री पंडितासारख्या उच्चपदस्थ व्यक्तीने पुराणधर्माचे पुनरुज्जीवन करून कर्मकांडांचे अवडंबर हिरिरीने माजवित असल्याच्या पार्श्वभूमीवर संत आणि संतसाहित्य महाराष्ट्राला ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी दीपस्तंभासारखे ठरते. सामाजिक, सांस्कृतिक जीवनाच्या पेचप्रसंगातही धीरोदात्तपणे तोंड देण्याची कार्यपद्धती फलदायी ठरते. सर्व सामाजिक सांस्कृतिक व्यवहार वर्णनातीत जटिल बनला आहे. या जटीलतेची हळुवारपणे उकल करून आक्रस्ताळेपणाऐवजी आस्थेने, प्रेमाने परंपराशील समाजमनाचं नव्या युगसंदर्भाला अनुरूप प्रबोधन घडवायला हवं. ज्यांच्या जीवनक्रमात परिवर्तन घडवायचंय त्यांची टिंगलटवाळी करून त्यांची टर उडवण्याची भूमिका घेऊन त्यांना परिवर्तन सन्मुख बनवणं अवघड आहे. अशा भूमिकेमुळे अनेकदा ती माणसं परिवर्तनाच्या बाबतीतील स्वागतशीलता गमावून बसतात. अन् अधिक कडवेपणाने त्याच परंपरेला चिकटतात. हे रा. चिं. ढेरे (पृष्ठ ७९, श्री आनंदनायकी) यांचं मत लक्षात घेता संतचळवळीची आजच्या संदर्भातील कालसुसंगता अधिक स्पष्ट होते.

अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात सामाजिक सुधारणांना संतचळवळीने मशागत भूमी फलदायी ठरली. संतांनी समाजमनाची प्रबोधनातून केलेली मशागत सामाजिक सुधारणांचे बीजारोपण करण्यास उपयुक्त ठरली. त्यामुळे पुढील काळात अस्पृश्यता निवारण, स्त्री-शिक्षण, जातीभेद विरोध, उच्चजात वर्णवर्चस्वविरोधी लढे, शेतकरी कष्टकऱ्यांची लढाई, आदिवासींचे संघर्ष, इ. धुमारे फुटू लागले. एकूणच वर्णजातीव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या विषमतेने होरपळून निघालेल्या दलित, आदिवासी, ओबीसी शेतकरी, कष्टकरी अठरापगड जातींमध्ये अन्यायाविरोधात चीड निर्माण होण्याची मानसिकता तयार होऊ लागली. सत्यशोधक चळवळीने तर तत्कालीन समाजमनाचा धागा पकडून या परिस्थितीला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवत महाराष्ट्रभर सत्यशोधक चळवळीचे जाळे विणले गेले. एका देदीप्यमान सामाजिक लढ्याचा हा काळ होता, ज्यामुळे महाराष्ट्राचे संपूर्ण जनजीवन प्रभावित होऊन गेले. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अंगाने महाराष्ट्राला पुरोगामी बिरुदावली लागली ती या घटनाक्रमातून. त्यादृष्टीने सांस्कृतिक, सामाजिक परिवर्तनवादी लढ्यातील धुरिणांनी पावलोपावली संतचळवळ आणि समतावादी शिकवण ध्यानात घेणे आवश्यक आहे. •

**अभिवादन**

**संत रविदास स्मृतिदिन**

अग्रणी समाजसुधारक आणि संत रविदास यांचा जन्म सुमारे इ.स. १३७७ मध्ये झाला असावा. इ.स. १५ ते १६ व्या शतका दरम्यानच्या भक्ती चळवळीचे एक रहस्यवादी कवी होते. रविदास यांनी सामाजिक भेदभाव हटविण्यासाठी कार्य केले. त्यांच्या 'गुरुग्रंथसाहेब'मध्ये असलेल्या रचना आजही लोकप्रिय आहेत.

# लैंगिक अत्याचार आणि लैंगिकता शिक्षण



**सचिन थिटे ।** मुंबई
८४२४०४११५९

भारतातील लैंगिक अत्याचारांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस खूप मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसते आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्यूरोच्या (NCRB) अहवालानुसार २०२२ साली भारतातील बलात्काराच्या नोंदवलेल्या घटनांचा दर हा एका दिवसात ८६ पेक्षा जास्त होता, जो २०२१ पेक्षा २०% ने जास्त होता. हा वाढता दर पाहाता आज २०२४ साली हे प्रमाण कुठपर्यंत गेलेले असेल याचा अंदाज आपण लावू शकतो. शिवाय हा आकडा फक्त नोंद झालेल्या बलात्कारांच्या प्रकरणांचा आहे. पण जवळपास ७५% प्रकरणांच्या नोंदी या होतच नाहीत. म्हणजे हा आकडा प्रत्यक्ष घडणाऱ्या बलात्काराच्या घटनांच्या फक्त २५% आहे हे लक्षात घेता बलात्काराशिवाय इतर लैंगिक अत्याचाराच्या घटनासुद्धा यात धरल्या तर हे प्रमाण खूप मोठे असेल. यात विवाहांतर्गत घडणाऱ्या बलात्कारांच्या घटनासुद्धा लक्षात घेतल्या तर ही परिस्थिती अधिकच गंभीर आहे, हे लक्षात येईल.

लैंगिक अत्याचारातील गुन्हेगारांना जरब बसेल अशा कठोर शिक्षा केल्या जाव्यात, कायद्यांत बदल केले जावेत, न्यायप्रक्रियेत बदल व्हावेत, न्यायप्रक्रिया जलद व्हावी, यावर बऱ्याच चर्चा झडत असतात. परंतु अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ का होते आहे यावर क्वचितच विचार होताना दिसतो. या लेखात काही कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांना दिला जाणारा दुय्यम दर्जा, लैंगिक भावनांचा होणारा कोंडमारा, लैंगिक भावना अधिकाधिक उद्दिपित होतील, अशी प्रसारमाध्यमांतून होणारी प्रसारणे, सहज हाताशी असणारे इंटरनेट, आजूबाजूची आर्थिक व सामाजिक परिस्थिती, शिक्षणाचा अभाव आणि गुन्हेगारांना कायद्याची भीती नसणे अशी स्थूल कारणे दिसतात.

पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या संस्कारांमध्ये तयार झालेल्या बहुतांशी पुरुषांच्या मनात नेहमी स्त्रियांना कमी दर्जाचे, दुय्यम स्थान असते. असे पुरुष स्त्रीचे माहेर, सासर, शाळा, कॉलेज, कामाची ठिकाणे अशा सर्वच ठिकाणी संपर्कात येत असतात आणि ते सगळेच स्त्रियांना कमी लेखत असतात. स्त्रिया कधीही पुरुषांची बरोबरी करूच शकत नाहीत आणि करू शकत असल्या तरी त्यांनी ती करू नये, अशीच त्यांची मानसिकता असते. याचेच शेवटचे टोक म्हणजे पुरुषांसोबत बरोबरी करू पाहाणाऱ्या स्त्रीला तिची 'लायकी', दुय्यम स्थान दाखवायचे असेल तर तिच्यावर बलात्कार किंवा लैंगिक अत्याचार करणे किंवा तसे करण्याची भीती दाखवणे हे मार्ग अनेक ठिकाणी अशा पुरुषांकडून वापरले जातात. पुण्यातील एका हॉस्पिटलमध्ये परिचारिकेवर बलात्कार करून खून करणाऱ्या तिथल्या कर्मचाऱ्याने तपासात हे कबूल केले होते की, एक स्त्री असून तिने सर्वांसमोर त्याचा अपमान केला, म्हणून त्याने बदला घेण्यासाठी आणि तिला तिची 'जागा' दाखवून देण्यासाठी हे केले होते. दिल्लीच्या निर्भया केसमध्ये त्यातील एका आरोपीचे मत होते की,' एक लडकी होके भी वो हमसे जुबान लडा रही थी, इसलिये गुस्सा आया था'. या थोड्याबहुत फरकाने लैंगिक गुन्हेगारांच्या प्रातिनिधिक मनोवृत्ती म्हणता येतील. परंतु या परिस्थितीला फक्त पुरुष जबाबदार आहेत असे नाही, तर पुरुषसत्ताक व्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या, कळत नकळतपणे तिचे पालन करणाऱ्या आणि वाहक असणाऱ्या व पुढच्या पिढीमध्येसुद्धा हेच संस्कार रुजवणाऱ्या स्त्रियासुद्धा या पुरुषांइतक्याच जबाबदार आहेत, हे लक्षात घ्यायला हवे.

लैंगिकतेच्याबाबतीत आपल्या समाजात आजही अतिशय बंदिस्त आणि नकारात्मक वातावरण आहे. एका ठरावीक वयात मुलेमुली वयात येऊन त्यांच्यामध्ये होणाऱ्या मानसिक, भावनिक कोलाहलाला समाज म्हणून आपण चक्क दुर्लक्षित करतो किंवा दाबून टाकण्याचा प्रयत्न करतो. त्याविषयी कुठेच निकोप संवादाला व त्यांच्या मनातील या भावना व्यक्त करण्याच्या जागाच ठेवत नाही. अशावेळी मुलेमुली या भावना आजूबाजूच्या उपलब्ध मित्र-मैत्रिणी किंवा इतर समूहात व्यक्त करतात

तेव्हा त्यांच्या लैंगिक भावविश्वाची जडणघडणच चुकीच्या दिशेने होत जाण्याची शक्यता अधिक असते. एकीकडे प्रसारमाध्यमांतून सतत लैंगिक भावनांचे अधिकाधिक उद्दीपन होत असते, तर दुसरीकडे वयात आलेल्या मुलांना मात्र त्यांच्या वाढत्या वयानुसार या वाढत्या लैंगिक भावनांचे व्यवस्थापन कसे करायचे याविषयी समुपदेशनाचे मार्ग उपलब्ध नसतात. मुलींना संस्कारांच्या नावाखाली दडपले जाते. पुढे हीच मुले किशोरवयातून तारुण्यात प्रवेश करत असताना आजूबाजूच्या मोठ्या मुलांचे अनुकरण करत, सिनेमात पाहिल्यानुसार त्यांना मुलींविषयी वाटणाऱ्या आकर्षणातून त्यांच्यामागे फिरणे, त्यांची छेड काढणे यांसारखे प्रकार सुरू करतात. सुरुवातीला हे प्रकार अगदीच नकळत आणि सौम्य प्रमाणात (शक्यतो शाब्दिक) असतात. पण पुढे जर वेळीच योग्य मार्गदर्शन मिळाले नाही व उलट चुकीच्या वैचारिकतेतून याच गोष्टी शारीरिक छेडछाडीपर्यंतसुद्धा पोहचतात. मग आवडणाऱ्या एखाद्या मुलीने नकार दिला तर तो पुरुषी मानसिकतेला सहन न होऊन तिच्याशी किंवा स्वतःशीच हिंसेचे प्रकार घडतात. अनेक मुलीसुद्धा प्रेमातील नकार पचवता न आल्याने स्वतःच्या किंवा समोरच्या व्यक्तीच्या आयुष्याचे नुकसान होईल असे वागताना दिसतात. लैंगिक संबंधांची तीव्र इच्छा, परंतु लैंगिक भावनांचे व्यवस्थापन न करता येणे, स्त्रियांबद्दल दुय्यम भाव, यातूनच महिलांवरील लैंगिक अत्याचारांच्या घटना घडण्याची शक्यता वाढत जाते.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या कुटुंबांमध्ये अनेक समस्या असतात. चाळीतील छोट्या घरांत आई-वडिलांचे शरीरसंबंध मुलांच्या नजरेस पडतात. अनेकदा अगदी लहान वयापासूनच स्त्रियांविषयी अर्वाच्य शिव्या, त्यांना मिळणारी तुच्छ वागणूक आणि लैंगिक गोष्टींविषयी अतिशय चुकीच्या पद्धतीने सतत कानावर पडणारे बोलणे यातूनही कमी वयात मुलांवर खूप चुकीचे परिणाम होत राहातात. मजुरीसाठी सतत बाहेरगावी राहावे लागणाऱ्या तरुणांचे व पुरुषांचे लैंगिक समाधान होत नसल्याने सतत लैंगिक सुखाच्या शोधात असणारे यातील अनेक पुरुष सातत्याने त्याच विचारात व शोधात असतात असे अनेक ठिकाणी निदर्शनास आले आहे. असे पुरुष मग गरीब, प्रतिकार करू शकणार नाहीत, वाच्यता करणार नाहीत अशा माहितीतल्याच अनेक बाजूंनी दुर्बल असलेल्या महिलांना आपले लक्ष्य करण्याची शक्यता अधिक वाढते.

हल्ली अगदी सहज सर्वांच्याच हातात उपलब्ध असणाऱ्या अँड्रॉइड फोनमुळे पॉर्न साईट्सवरून अगदी सहज अनेक वेगवेगळ्या प्रकारचे हवे तेवढे सेक्स व्हिडिओज पाहायला मिळतात. जास्त काळ एकटे किंवा मित्रांसोबत राहाणारे अनेक तरुण, पुरुष हे रोज तासन्‌तास हे व्हिडिओज पाहाण्यात व लैंगिक संबंधाविषयी विचार करण्यात घालवत असतात असे आढळून येते. पण आपल्याकडे कुठेही लैंगिक भावनांचे व्यवस्थापन करण्याचे किंवा त्यांचे योग्यरीत्या शमन करण्याचे समुपदेशन उपलब्ध नसल्याने त्यातून अनेकदा बलात्काराची मानसिकता वाढत जाते. घरात राहूनही एकटे असणारे आणि कामानिमित्त, शिक्षणासाठी किंवा इतर कारणांसाठी बाहेर एकटे किंवा मित्रांसोबत राहाणारे तरुण, पुरुष असे समूह यामध्ये येतात. लैंगिक संबंधांसाठी आसुसलेली आणि त्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची तयारी झालेले हे पुरुष मग आपल्या आजूबाजूला सहज मिळू शकणारी संधी (सॉफ्ट टार्गेट) शोधत असतात. ज्या फार कुणाकडे तक्रार करू शकणार नाहीत, ज्यांच्या तक्रारींकडे कुणी लक्ष देणार नाही, ज्यांना कोणत्या तरी गोष्टीची भीती किंवा आमिष दाखवून गप्प करता येईल असे त्यांचे सॉफ्ट टार्गेट असतात. यामध्ये अनेकदा त्यांच्या आसपास असणाऱ्या लहान मुली, तरुणी किंवा महिला त्यांच्या शिकार होत असतात. अर्थात, बाललैंगिक शोषणाच्या प्रकारात मनातील लैंगिक इच्छा पूर्ण न झालेले किंवा काही लैंगिक विकृती असणारे असे पुरुष आपल्या कुटुंबाचा भागसुद्धा असू शकतात. अगदी तरुणांपासून तर कुटुंबातील एखाद्या ज्येष्ठ म्हटल्या जाणाऱ्या पुरुषांपर्यंत कुणीही यामध्ये असू शकते. अगदी जवळपासचे कुणीही नातेवाईक किंवा शेजारीसुद्धा यात असू शकतात.

विवाहांतर्गत होणाऱ्या बलात्कारांमध्ये स्त्रीला बहुतांशी दुय्यम समजण्याची भावना असते. तसेच स्त्रीच्या लैंगिक इच्छा, भावना आणि आनंद यांच्याबाबत अज्ञान, त्याकडे दुर्लक्ष करणे आणि असे करणे हेच योग्य आहे असे समज आणि संस्कार यामागे असतात. पॉर्न किंवा इतर ठिकाणांवरून मिळालेल्या माहितीनुसार वेगवेगळ्या लैंगिक पद्धतींचा आग्रह धरणे आणि तो पूर्ण होत नसेल तर जबरदस्ती, प्रसंगी मारहाण करून ते

करायला लावणे हे प्रकार घडतात. अनेकदा स्त्रीची लैंगिक इच्छा जर पुरुषापेक्षा खूप कमी असेल तर अशा पुरुषांकडून नाईलाजानेसुद्धा स्त्रीवर जबरदस्ती केली जाते. असे करणे चुकीचे आहे हे त्यांना माहिती व मान्य असूनही अनेकदा त्यांच्याकडून हे घडते. कारण त्यांची लैंगिक इच्छा पूर्ण करण्यासाठीचा इतर योग्य आणि समाजमान्य पर्याय त्यांच्याकडे उपलब्ध नसतो. अर्थात, असे असले तरीही त्यांच्या या कृत्याचे समर्थन होऊ शकत नाही. कारण (पत्नीशी शरीरसंबंध) समाजमान्य असला तरीही हा त्यावरील योग्य उपाय नाही.

संघटित लैंगिक अत्याचारांच्या घटनांमध्ये अनेकदा एखाद्या समूहाला कमी लेखणे, त्यांचे मानसिक व नैतिक खच्चीकरण करणे, एखाद्या महिलेला अद्दल घडवणे, बदला घेणे किंवा आपली लैंगिक इच्छा पूर्ण करण्यासाठी सामूहिकरीत्या एखादी स्त्री-सावज शोधणे ही कारणे दिसतात.

लैंगिक गुन्हेगारी समाजात कशी निर्माण होते त्या काही कारणांची वर चर्चा केलेली आहे. ही कारणे काही प्रमाणात का होईना कशी निरस्त करता येतील यावर काही चर्चा करू या. बलात्कार किंवा लैंगिक अत्याचार केल्यानंतर तातडीने व कठोर शिक्षा दिली जात असेल, तर असे गुन्हे करू इच्छिणाऱ्यांवर जरब बसू शकते. अनेक देशांमध्ये अशा शिक्षा असल्याने तिथे अशा घटना नियंत्रणात दिसतात. भारतासारख्या देशात याबाबत असणारी कमालीची राजकीय व सामाजिक उदासिनता या गुन्हेगारी मानसिकतेला पोषक ठरते. राजकीय व आर्थिक पाठबळ असलेल्या कित्येकांना म्हणूनच बिनधास्तपणे राजरोस असे कृत्य करण्याचे बळ मिळते. अध्यात्माच्या नावाखाली अनेक बाबा-बुवासुद्धा यामुळेच स्त्रियांचे लैंगिक शोषण करताना कचरत नाहीत. यासाठी बलात्कार व लैंगिक अत्याचारांचे खटले जलदगतीने व अधिक गांभीर्याने चालवून गुन्हेगारांना अधिकाधिक कठोर शिक्षा तर व्हायलाच हवी; पण समाजात या विकृती निर्माण होऊच नयेत यासाठीची पूर्वतयारी व दक्षता म्हणून करावयाच्या उपाययोजनांवर अधिक भर द्यायला हवा. यामध्ये लैंगिकता शिक्षण हा सर्वांत प्रभावी उपाय ठरू शकतो.

लैंगिकता शिक्षणातून स्त्री-पुरुष समानतेचे विचार प्रामुख्याने समाजामध्ये रुजवता येऊ शकतात; ज्यामुळे पुरुषांच्या मनातील आणि एकूणच समाजमनातील स्त्रियांचा दर्जा उंचावला जाईल. स्त्री पुरुषांचे लैंगिक अवयव, त्यातील भिन्नता, त्यामधील खाजगीपणा व गुप्तता आणि धोके, वयात येताना होणारे संप्रेरकांमधील बदल (Harmonal changes), त्यानुसार मुलामुलींमधील शारीरिक व मानसिक बदल, लैंगिक भावना व त्यांचे व्यवस्थापन, लैंगिक संबंधांतील काळजी, जबाबदारी व धोके, तसेच भिन्नलिंगी व्यक्तींचा सन्मान व आदर, परस्परांच्या लैंगिक इच्छा व अनिच्छांचा आदर या सर्व गोष्टी आपण लैंगिकता शिक्षणातून मुलामुलींपर्यंत, त्यांच्या पालकांपर्यंत आणि शिक्षकांपर्यंत पोहोचवू शकतो. मुलांना योग्य वयात त्यांच्या मनातील लैंगिक भावनांचे व्यवस्थापन शिकवणे आणि त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध करून देणे, यातून त्यांच्या मनातील गोंधळ कमी होऊन त्यांना योग्य निर्णय घेण्यास मदत होईल. विकृत अशा लैंगिक मानसिकता निर्माण होणार नाहीत यासाठी कार्यशाळांचादेखील समाजसेवेच्या कार्यांमध्ये समावेश केला जाऊ शकतो. त्यामुळे त्यांच्याकडून पुढील आयुष्यात घडू शकणारे अनेक गैरप्रकार टळू शकतात. याचबरोबर मुलींनासुद्धा योग्य त्यावेळी या सर्व गोष्टींची माहिती दिल्याने त्या अधिक सजग राहू शकतात. लहानपणापासूनच मुलांना लैंगिकता शिक्षण दिलेले असेल तर बाललैंगिक शोषणासारख्या घटनांपासून आपल्या मुलामुलींना वाचवता येऊ शकते.

पुरुषांच्या मनात गुन्हेगारी मानसिकता तयार होण्याआधीच त्यांना योग्य ते समुपदेशन उपलब्ध करून दिल्यास यापासून परावृत्त करता येऊ शकते. स्त्रियांसाठी लैंगिकता शिक्षण हे अधिक सजगता, सक्षमता व सतर्कता निर्माण करणारे असून अशा घटनांपासून त्या स्वतःला वाचवू शकतील. त्यासाठीच आधी पालक, शिक्षक व समाजातील सर्व क्रियाशील घटकांमध्ये याविषयीची जागरूकता वाढायला हवी. शासन पातळीवरून तर यासाठी अधिकाधिक प्रयत्न व्हायलाच हवेत; पण समाज म्हणून आपण स्वतःसुद्धा याची जबाबदारी घेऊन आपल्या आजूबाजूच्या भागात आपापल्या शक्यतेप्रमाणे लैंगिकता शिक्षणासाठी पुढाकार घ्यायला हवा. एकंदरीतच लैंगिकता शिक्षणातून लैंगिकतेकडे निकोप दृष्टीने पाहू शकेल, असे समाजमन घडविता येईल. अर्थात, लैंगिकता विषयातील तज्ज्ञांच्या पुढाकाराने मार्गदर्शन होणे गरजेचे आहे.

**(पृष्ठ क्रमांक २१ वर)**



# देव शोधायचा आहे!

**तेजस्विनी देसाई ।** कोल्हापूर
९४२१२००६४४

माझा अगदी जळफळाट झाला होता. अंगाची नुसती लाही लाही झाली होती. कुणाची दृष्टी अंधुक झाली, तर कुणाला कानाचा त्रास.

'अगं, एवढं चिडायला काय झालं?' आशूनं विचारलं.

आशू, माझी सख्खी मैत्रीण. आम्ही दोघी मैत्रिणी म्हणजे दोन ध्रुवच जणू! आशू म्हणजे उत्साहाचा झरा. ती कशी, तर अगदी रसिक (म्हणजे तिला तसं वाटतं), आयुष्य भरभरून जगणारी, सगळ्या रंगांचा मनमुराद आस्वाद घेणारी! आणि मी तिच्या अगदी उलट, अगदी खडूस. तिच्या भाषेत चिंतातूर जंतू. कश्श्याचा म्हणून आनंद नाही. पण शास्त्र सांगतं ना, विजातीय आकर्षण! या शास्त्रानुसार आमच्यात मैत्रीचा आयॉनिक बॉण्ड तयार झाला. माझी तडतड आणि आशूचं त्याच्यावर शीतल शिंपण, ही आमची जुगलबंदी कायम सुरूच. असो, नमनाला घडाभर तेल झालं.

तर, काय सांगत होते. हां, माझा जळफळाट झाला होता. आशूनं अगदी काहीच झालं नाही, अशा थाटात विचारलं, 'काय झालं?'

'वाच ना पेपर. पेपरभरून सगळ्या बातम्या ह्याच. डोळ्याचे डॉक्टर नि कान, नाक, घसा तज्ज्ञ यांच्याकडे पेशंट वाढलेत. हा सगळा कालच्या मिरवणुकीचा परिणाम. अगं, देवाची भक्ती अशी करतात का? देवानं सांगितलं का, डीजे लावायला? का, लेझर शो करायला?'

'तुला चांगलं काही दिसतच नाही का?' असं म्हणत तिनं मला अरसिक, खडूस, निरुत्साही अशी शेलकी विशेषणं लावली.

'अगं ह्यात चांगलं काय?' तिच्या थंडपणानं माझ्या रागावर उकळतं तेलच ओतलं. 'हे बघ, मिरवणुकीत नाचत असताना एका तरुणाच्या डोळ्यांवर लेझर किरण पडला आणि त्याला चक्कर आली, आता त्याला काहीच दिसत नाही. हे बघ, इथं बघ, डीजेच्या धडाक्याने एका तरुणाला हार्ट अटॅक. काय चाललंय हे? जीवन इतकं स्वस्त झालंय का?' तिच्या डोळ्यांसमोर पेपर नाचवत मी ओरडले.

'एवढ्या सगळ्या बातम्यांमध्ये तुला या दोनच बातम्या दिसल्या? हे बघ, वाढदिवसाच्या शुभेच्छा. अगं, हे बघ, त्याच्या शेजारीच हिऱ्याच्या दागिन्यांची जाहिरात आहे. किती सुंदर नेकलेस आहे, नाही? हे तुला दिसतच नाही. त्यासाठी सौंदर्य दृष्टी असावी लागते. प्रत्येक गोष्टीत खोट काढायची तुला सवयच आहे. अगं, आपले सण आपण आनंदासाठी साजरे करतो. हे उत्सव साजरे करताना या तरुण मुलांचा उत्साह कसा ओसंडून वाहात असतो. तुला नाही आनंद होत?'

'दुसऱ्याचा आनंद कधी बघवणारच नाही. नतद्रष्ट मेली', तिनं उच्चारलं नाही तरी हे वाक्य तिच्या चेहऱ्यावर मला स्पष्ट वाचता आलं. म्हणतात ना, "Action speaks louder than words',..... की 'Word speaks' जाऊ दे, बापो! भावना पोहोचल्या. मी तिला समजावण्यासाठी म्हटलं, 'अगं, आपले सण, उत्सव आपण जरूर साजरे करावेत. पण आपल्या आनंदासाठी दुसऱ्याला का वेठीस धरायचं? अगं, हे लेझर किरण किती घातक असतात, तुला माहीत आहे का? या झगमगाटामुळे पशू-पक्षी बिथरतात. डीजेच्या दणदणाटामुळे आवाजाच्या तीव्रतेची मर्यादा ओलांडली जाते. त्याचा आपल्या ह्रदयावर परिणाम होतो. जुन्या इमारती कोसळतात. अगं, त्या बिचाऱ्या देवाचे कानसुद्धा बधिर होत असतील. देव भक्तीचा भुकेला. आणि ऊर्जा किती वाया जाते?' उत्सवाचं हे रूप पाहून प्रत्यक्ष टिळकांनाही वाईट वाटत असेल, म्हणून मी हताशपणे आकाशाकडे पाहिलं.

'सगळ्या जगाची काळजी तुलाच पडलीय का गं?' इति आशू.

'म्हणजे जे घडतंय त्याबद्दल तुला काहीच वाटत नाही?'

'तसं नव्हे गं, त्या मुलाला चक्कर आली, दुसऱ्याला हार्ट अटॅक आला, हे वाईटच. पण असं बघ, गणपती काय रोज येतो का? वर्षातून एकदाच तर येतो. गणपतीबाप्पाची किती आतुरतेनं वाट बघतात सगळे?' आशूच्या चेहऱ्यावर भक्तिभाव दाटून आला. 'आणि तो साजरा करण्यासाठी किती कष्ट घेतात सगळे? आधी महिनाभर सगळे तयारी करत असतात. सुरुवात वर्गणी मागण्यापासून होते.' वर्गणी शब्द ऐकल्याबरोबर माझा चेहरा आंबट झाला, आशूचं अर्थातच तिकडं लक्ष नव्हतं.

'मंडप उभा करा. अगं, त्या मंडपांनी रस्त्यांची दुर्दशा

होते, ट्रॅफिकचा खोळंबा होतो.' तिला मध्येच तोडत मी म्हटलं.

'डेकोरेशन, रोजची आरती, सगळा माहोल कसा भक्तिमय झालेला असतो',

माझे शब्द तिच्या कानांपर्यंत पोहोचलेच नाहीत. तिने आपली भक्तीची दिंडी पुढे नेत म्हटले, 'एवढे कष्ट उपसल्यावर शेवटी मिरवणुकीत जरा दंगा केला, तर बिघडलं कुठं? कशी आनंदानं बेभान होऊन नाचत असतात. त्यांना नाचताना बघून मलाही ठेका धरावासा वाटतो. अगं, आपल्या संतांनी म्हटलंच आहे ना, हरिनामाच्या गजरात देहभान हरपून जावं. तशीच ही मुलं डीजेच्या तालावर देहभान हरपून नाचत असतात. हरिनाम घेतलं काय किंवा डीजे हॅरी म्हटलं काय, एकूण एकच. हरिनाम घेण्याची त्यांची पद्धत वेगळी एवढंच. बदल हाच सृष्टीचा नियम नाही का? हा बदलसुद्धा आपण गोड मानून घेतला पाहिजे.'

तिचं हे अजब तर्कट ऐकून मी हतबुद्ध झाले. या महंतांनी देव माणसात शोधावा, असंही सांगितलंय, म्हणून मी या मिरवणुका बघायला जात असे आणि त्या गर्दीत देव कुठं दिसतो का ते शोधत असे. आशू म्हणते तसं देव दिसायलासुद्धा नजर असावी लागते. आमच्यासारख्या करंट्यांच्या भाळी हे भाग्य कुठलं?

'रस्त्यांची दुर्दशा आधीच झाली आहे, त्यात थोडी भर इतकंच. आणि अपघाताचं म्हणशील तर...' आशूची टकळी पुढं चालूच होती, 'अगं, असे अपघात रोज होतच असतात. रस्त्यावर किती अपघात होतात? तूच म्हणतेस ना, कोणत्याही निष्कर्षाला येण्यापूर्वी statistics (संख्याशास्त्रानुसार आकडेवारी) तपासून पाहावं. रोज रस्त्यावर होणाऱ्या अपघातांच्या तुलनेत या मिरवणुकीत होणारे अपघात अगदीच नगण्य आहेत. टक्केवारीच काढायची तर एक टक्कासुद्धा नाही.'

तिचं हे संख्याशास्त्र माझ्या आकलनापलीकडचं होतं. मी काहीच उत्तर दिलं नाही आणि तिनेही विषय वाढवला नाही. कितीही समजावलं तरी पाषाणाला पाझर फुटत नाही, हे तिला अनुभवानं माहीत होतं. मी विषय थांबवला तरी माझं मनात चरफडणं चालूच होतं.

'म्हणे, वर्षातून एकदाच तर गणपती येतो.' बरं, एक गल्ली एक गणपती नाही. एकाच गल्लीत तीन-तीन गणपती. एकच बसवला तर काही ठरावीक मंडळींनाच गणूदेवाच्या सेवेची संधी मिळणार. भक्तीचंसुद्धा विकेंद्रीकरण झालं पाहिजे. गणपती एकदाच येतो, पण असे उत्सव तर महिन्याला येतात.

अशीच एकदा दरवाजावरची बेल वाजली. दार उघडलं तर दहा-बारा तरुण दारात उभे, वर्गणी मागायला. काय तर म्हणे, महाप्रसाद करायचाय. तशी मी अगदी परखड आणि निर्भीड आहे हो! पण दारात दहा-बारा तरुणांची झुंड, मी एकटीच अबला. माझं अवसानच गळालं. माझ्यासमोर अगदी यक्षप्रश्न उभा राहिला. वर्गणी द्यावी तर, माझ्या निर्भीड वृत्तीचा फज्जा उडणार, नाही म्हणावं तर दारात ही झुंड. गळालेलं सगळं अवसान कसंबसं जिभेवर गोळा केलं आणि म्हटलं, 'न...नाही.' तेवढ्यानंही घशाला कोरड पडली. त्यातला एक समंजस तरुण पुढं आला आणि म्हणाला, 'का नाही काकी? अहो, आम्ही महाप्रसाद करतोय, हजार माणसांचं जेवण. आम्ही चांगलं जेवण देतो, काकी. गोरगरिबांना चांगलंचुंगलं खायला मिळतं, तुम्ही पण या. पण वर्गणी का नाही म्हणताय?' या 'का' चं उत्तर माझ्या जिभेवर गोळा झालं होतं, पण मी ते शब्द आतल्या आत गिळले आणि धीर गोळा करत म्हटलं, 'कारण काही नाही.' ते बिचारे तसेच निघून गेले. माझ्या डोक्यावरच्या चांदीकडं बघून कदाचित गप्प बसले असावेत.

'देवानं तुम्हाला कधी सांगितलं महाप्रसाद करायला? आता हे महाप्रसाद करणार, रस्ता अडवणार', मी मनातल्या मनात चिडले. तरी बरं, माणसाला मनातल्या मनात बोलता येतं, तेवढाच माझ्या रागाचा मनातच निचरा. मोठमोठे सायकियाट्रिस्ट म्हणतात ना, 'भावनांचं शमन झालं पाहिजे, दमन नाही'. मी माझ्या संतापाचं मनातल्या मनात शमन करून घेतलं.

मग येते, ती दहीहंडी. आपले सगळे उत्सव कसे भव्यदिव्य झाले पाहिजेत. या दहीहंडीच्यासुद्धा स्पर्धा भरतात. अगदी लाखांची बोली लागते. या दहीहंडीसाठी उदात्त भावनेने लाखो रुपये देऊन आयोजन करणारे प्रयोजक असतात. त्यामागे केवढे मोठे अर्थकारण दडले आहे. इतके उदार समाजसेवक असल्यावर तो समाज सुसंस्कृतच असणार, नाही का? अहो, आपली प्राचीन संस्कृती आपणच नको का जपायला?' 'अहो, पण त्या मानवी मनोऱ्यावर सगळ्यात वरच्या थरावर असणाऱ्या गोविंदाच्या सुरक्षेचं काय? याला संस्कृती म्हणतात का?' असले illogical (तर्कदुष्ट) प्रश्न आमच्यासारख्या चिंतातूर जंतूंनाच पडतात.

एका महाविद्यालयातील विद्यार्थी वसंतपंचमीला सरस्वतीदेवीचं पूजन करून महाप्रसाद करतात, असं मला समजलं. या महाप्रसादाच्या भक्तिरसात सगळे विद्यार्थी यथेच्छ डुंबत असतात तर, शिक्षकवृंद त्याचा आस्वाद

घेण्यात दंग. त्यादिवशी lectures ना सुट्टी. "Lectures ला सुट्टी देऊन शारदादेवी कशी प्रसन्न होणार', हा प्रश्न अगदीच फिजूल. एकदा विद्यादेवी प्रसन्न झाल्यावर गणित, विज्ञान या बागुलबुवांची काय बिशाद आहे, आमच्या निरागस पोरट्यांना घाबरवण्याची! महाप्रसादानं प्रसन्न होऊन विद्यादेवी या पोरांच्या डोक्यावर आपला हात ठेवून शुभाशीर्वाद देत आहे आणि त्या हातातून गणित, विज्ञानाच्या अवजड संकल्पना या पोरांच्या मेंदूत transfer (संक्रमित) होत आहेत, असं मंगलमय चित्र माझ्या डोळ्यांसमोर तरळलं. काही म्हणा, ही पिढीच हुशार! सरस्वतीदेवीचा असा आशीर्वाद घेण्याची कल्पना आम्हाला नाही सुचली. शाळेत असताना या विज्ञानाच्या बागुलबुवाने आम्हाला चांगलेच घाबरवले होते. कोणा एका शास्त्रज्ञाला बेंझिनची रचना स्वप्नात दिसली, अशी एक कथा आम्हाला होती. आता या शास्त्रज्ञाला जळी, स्थळी अगदी स्वप्नीसुद्धा बेंझिन दिसत होतं, म्हणून त्यानं आम्हा बिचाऱ्यांची झोप उडवली, अशी चर्चा आम्हा मैत्रिणींमध्ये झाल्याचे मला चांगलेच स्मरते.

परवाच नवरात्रोत्सव आपण साजरा केला. हा तर रंगांचा उत्सव. नऊ दिवस नऊ रंग. आज कोणता रंग हे कुणीतरी अतिउत्साही मैत्रीण whatsapp करणार, त्याप्रमाणं सगळेजण त्या रंगाची साडी किंवा ड्रेस परिधान करणार. मग चालते ते फोटो सेशन. हेही आमच्या अरसिक मनाला मानवत नाही. एक मैत्रीण म्हणाली, 'त्याचं काय मॅडम, तेवढीच enjoyment, नाहीतरी एरवी आपलं काहीतरी असतंच की!' वर्षभर जणू आपण ब्लॅक-व्हाईट सिनेमातल्या जमान्यातच वावरत असतो, असं केविलवाणं चित्र माझ्या डोळ्यांसमोर आलं. मी काही त्या फंदात पडत नाही, हाताला येईल तो ड्रेस घालायचा. असाच एक ड्रेस काढला, तर ओढणीवर काळ्या ठिपक्यांचं डिझाईन. बापरे! काळा रंग म्हणजे निषेधाचा. उगीच कुणाला मी नवरंगांचा निषेध करते, असं वाटायचं. फट् म्हणता ब्रह्महत्या, तसं माझ्या पदरावरच्या, सॉरी, ओढणीवरच्या काळ्या ठिपक्यांनी कुणाच्या तरी भावना दुखावल्या जायच्या. उत्सव काळात अशा भावना दुखावल्या तर,..... कल्पनेनंच माझा थरकाप उडाला. वैरी चिंती ते नाही, नाही. मन चिंती. जाऊ दे, बापो! या मराठी भाषेतल्या म्हणी आणि वाक्प्रचार पाठ असायला मी काही मराठीची प्राध्यापक नाही. वाचक मला माफ करतील ही माफक अपेक्षा. जाऊ दे. भावना दुखावल्या तर.... तशी मी निर्भीड आहे हो! पण समाजात शांतता राखण्याची काही जबाबदारी आहे की नाही? भित्रेपणा म्हणून नव्हे, तर जबाबदार नागरिक म्हणून मी ड्रेस बदलला. आजकालची पिढी फारच संवेदनशील आहे हो. त्यांच्या भावना तर फारच नाजूक, अगदी फुलापेक्षाही कोमल, बिचाऱ्या लगेच दुखावतात. आई-बाबांच्या आणि शिक्षकांच्या हातचा मार प्रसाद म्हणून खाल्ल्यामुळं दगड बनलेल्या आमच्या पिढीला काय हो कळणार यांच्या संवेदना? परवा एका पोरानं दुसऱ्याला 'तू या रंगाचा ड्रेस का घातलास', असं विचारलं अन् त्याच्या भावना दुखावल्या. उगाच विषाची परीक्षा नको. हो पण, म्हणून माझ्या निर्भीडपणावर शंका नको!

नवरात्रीतला आणखी एक आकर्षणबिंदू म्हणजे दांडिया. सगळ्या कार्यालयांमध्ये, मोठमोठ्या अपार्टमेंट्समध्ये याचा सोहळा आयोजित करतात. नवरात्र हा सण खरोखरच मोठा. आमच्या कोल्हापूरच्या नवरात्रोत्सवाचं माहात्म्य तर काय वर्णावं? 'पण, दहा-पंधरा वर्षांपूर्वी कुठं होतं असं सार्वजनिक स्वरूप?' माझा बावळट प्रश्न. उत्तर द्यायला आशू होतीच. 'अगं, शेजारधर्म पाळणं हीच तर आपली संस्कृती. गुजरात आपलं शेजारी राज्य. तुला माहीत नाही का, 'एक भारत श्रेष्ठ भारत!' हे सगळं आशूलाच सुचू शकतं. 'काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि राजस्थानपासून अरुणाचल प्रदेशापर्यंत सगळ्या राज्यातील स्त्री-पुरुष एकत्र फेर धरून दांडिया खेळत आहेत, असं मनोरम दृश्य मला दिसू लागलं. आता आपला महान देश आणखी महान व्हायला असा कितीसा वेळ लागणार?'

नवरात्रीचा शेवटचा दिवस. भव्य मिरवणूक निघाली आणि सगळं ट्रॅफिक जॅम झालं. त्या ट्रॅफिकमध्ये अस्मादिकही अडकलो होतो. जीव मुठीत घेऊन मी मुंगीच्या पावलांनी गाडी चालवत होते. गाडी चालवताना मला अगदी घाम फुटला होता. चालत गेले असते तर एव्हाना घरी पोहोचून चहा झाला असता. चहाच्या आठवणीनं जीव कासावीस झाला. माझी चहाची वेळ टळून चालली होती. कशीबशी गर्दीतून सुटून दुसऱ्या रस्त्याला लागले, तर दुसरी देवी स्वागताला हजर. त्या देवीसमोर कर्णकर्कश्श्श्श आवाजातल्या गाण्यांवर थिरकणारी तरुणाई. 'मला कर्णकर्कश्श्श्श वाटणारं संगीत या तरुणांना मधुर वाटत असेल का?' मनात विचार आला. आईन्स्टाईनचा सापेक्षतावाद इथंही आहेच. घरी पोहोचले तेव्हा वैतागलेच होते (स्वभावाला औषध नाही). माझा वैताग पाहून मुलगा माझ्यावरच उखडला, 'अनायासे देवीचं दर्शन झालं, त्यात समाधान मान.' 'एवढ्या गोंधळात देवी कुठं होती?' मी परत देवीच्या शोधाच्या विचारात गुरफटले.

●



# मृत्यू : एक चिंतन

**जगदीश काबरे** । सांगली
९९२०१९७६८०

आपण सारे कुठल्या तरी अज्ञाताचे प्रवासी आहोत. जन्माला आल्यापासून हा प्रवास सुरू होतो. तो कुठे संपणार आहे, हे आपल्याला सर्वांनाच माहीतही असते, पण त्याचे अंतर मात्र कुणालाच माहीत नसते. तरीही त्या प्रवासात सारेच उतरतात, नव्हे अपघाताने उतरावे लागतेच. या प्रवासात वेडीवाकडी वळणे लागतात, चढउतार लागतात, कधीकधी दमछाकही होते. वाटेत एखादा लांबलचक अंधारा बोगदाही लागतो. तरीही पावले पुढे पडतच असतात. बोगदा संपला की अंधारही संपणार आहे; आणि पुन्हा उजेडाची तिरीप पाहायला मिळणार आहे, या आशेवर अंधारवाटेवरदेखील पावले मागे हटत नाहीत. किंबहुना या प्रवासात मागे वळायची संधीच नसते. मागे पाहाण्याची इच्छा झाली, तरी मागे वळणे शक्य नसते. म्हणून प्रत्येक पाऊल पुढेच टाकावे लागते. जन्म आणि मरण या दोन टोकांमधील सजीवांचा हा प्रवास त्यांच्यातील जीन्सच्या जडणघडणीचा प्रवास असतो. त्यालाच आपण जीवन म्हणतो. हे जीवन जगायचे कसे हे मात्र सर्वस्वी त्या त्या व्यक्तीच्या विचारसरणीवर अवलंबून असते. प्रत्येक माणसाचा पृथ्वीवरील हा प्रवास कधी ना कधी तरी संपणार असतोच. त्यानंतर एकच सत्य उरते... ते म्हणजे सजीवाचा मृत्यू!

मृत्यू ही एक भौतिक क्रिया आहे. मनुष्य मरण पावतो यालाच त्याचा जीव जाणे असे म्हणतात. मग असा प्रश्न पडतो की, आपल्या शरीरात जीव असतो तरी कोठे? सर्वसामान्यपणे असे समजले जाते की, मनुष्याचा जीव त्याच्या हृदयात असतो... तर काहींच्या मते तो मेंदूत असतो. जीवशास्त्रीयदृष्ट्या माणसाचा जीव हा शरीरातील कोण्या एका अवयवात केंद्रित झालेला नसून मनुष्याच्या शरीरात असलेल्या अब्जावधी पेशींच्या स्वरूपात तो सर्व शरीरभर पसरलेला असतो. जीवन म्हणजे या सर्व पेशींमध्ये असलेल्या हजारो वेगवेगळ्या प्रथिनांच्या मार्फत होणाऱ्या रासायनिक क्रियांचा परिपाक असतो. या रासायनिक क्रिया होण्यासाठी शरीराबाहेरून त्या पेशींना ऑक्सिजन आणि ग्लुकोज यासारखी रसायने लागतात. हा पुरवठा जोपर्यंत सुरू असतो तोपर्यंत पेशींचे कार्य सुरू असते म्हणजे त्या जिवंत असतात. शरीरात चालणाऱ्या श्वासोच्छवास आणि हृदयामार्फत होणारे रक्ताभिसरण यासारख्या प्रक्रियेद्वारे या पेशींना ऊर्जा पुरवठा सुरू असतो. ज्यावेळी या दोन गोष्टी म्हणजेच श्वासोच्छवास आणि हृदयक्रिया काही कारणामुळे बंद पडतात तेव्हा त्या पेशींचे कार्य बंद पडते. त्यांच्यात होणाऱ्या रासायनिक क्रिया थांबतात, म्हणजेच त्यांचे जीवन संपते आणि माणसाचा मृत्यू होतो. जसे गाडीतील पेट्रोल संपले की गाडी बंद पडते किंवा समईतील तेल संपले वा तिच्यावर झाकण टाकून तिला होणारा हवेतील ऑक्सिजनचा पुरवठा बंद केला की समई विझते. त्याचप्रमाणे ग्लुकोज आणि ऑक्सिजनचा पुरवठा संपला की, जीवाचा मृत्यू होतो. म्हणूनच ज्याचा जन्म होतो त्याचा मृत्यू अटळ असतो. माणसाचा देह हा या निसर्गातील अचेतन पंचमहाभूतांमधील अंदाजे २० प्रकारच्या अमीनो आम्लांच्या रासायनिक प्रक्रियांमुळे सचेतन झाला आहे. ह्या देहात सतत रासायनिक अभिक्रिया चालू असतात. अकाली मृत्यू सोडल्यास सर्वसाधारणपणे सुमारे ६० ते १०० वर्षांच्या दरम्यान कधीतरी ही रासायनिक अभिक्रियांची सखळी तुटते. परिणामी, सचेतन देह अचेतन होतो. हळूहळू त्याच्या विघटनाच्या रासायनिक क्रिया सुरू होतात.

जिवंत म्हणजे श्वसन करणारा व जिवंतपणाची इतर लक्षणे दाखवणारा प्राणी म्हणजे सजीव. ही व्याख्या सर्व सजीवांना लागू आहे. सजीवसृष्टीमधील सर्वात लहान घटक म्हणजे पेशी. एकदा पेशी नष्ट झाली म्हणजे सजीवाचे आस्तित्व संपते. पेशीअंतर्गत चयापचय श्वसन, अन्नग्रहण, उत्सर्जन अशा क्रिया चालू असतात. पेशीची वाढ होते, पेशी विभाजन होते. पेशी विघटन म्हणजे पेशीचा मृत्यू होतो. म्हणून सर्व सजीवांना मृत्यू आहे. कारण प्रत्येक सजीवातील पेशींची उत्पत्ती झाल्यावर सुरुवातीला त्यांच्यात जशी वाढ व्हायला लागते तसेच अनेक रासायनिक क्रियांमुळे पेशींची झीजही होत असते आणि कालांतराने पेशी मरतात. म्हणूनच सजीवांचा मृत्यू होतो. हेच ते उत्पत्ती, वाढ आणि लय चक्र. ते कुणीही – अगदी

धर्मांधांचा देवसुद्धा थांबवू शकत नाही.

आपल्या शरीरातील पेशी सतत विभाजित होत असतात, मरत असतात, आणि पुनरुत्पादितही होत असतात. परंतु प्रत्येक पेशीचे जीवनचक्र वेगळे असते. पोटाचा अस्तर असलेल्या पेशी, ॲसिडच्या संपर्कात असतात, त्या दर पाच दिवसांनी स्वतःला बदलतात. एपिडर्मिस म्हणजे त्वचेचा सर्वात पातळ थर -त्यामधील पेशी सुमारे एक आठवडा टिकतात. लाल रक्तपेशी शरीरात सुमारे चार महिने जगतात, तर यकृत पेशी सुमारे पाच महिने जगतात. काही पेशी पुन्हा निर्माण होण्यासाठी सात वर्षांपेक्षा जास्त वेळ घेतात. एक हाड स्वतःला पूर्णपणे पुनर्निर्मित करते आणि दर दहा वर्षांनी त्याच्या सर्व पेशी बदलते. आतड्यांतील पेशी (पोटाच्या अस्तरांव्यतिरिक्त) सुमारे पंधरा वर्षे टिकतात. बालपणी एकदा दुधाचे दात पडून गेल्यानंतर जे दात येतात ते दात पुन्हा निर्माण होत नाहीत. हृदयाच्या ऊती आणि न्युरॉन्स, जरी एकेकाळी अपरिवर्तनीय असल्याचे मानले जात होते तरी आता अत्यंत मंदगतीने त्या पुनरुत्पादन करण्यास सक्षम असल्याचे शास्त्रज्ञांना दिसून आलेले आहे.

एका अभ्यासानुसार, स्वीडनमधील कॅरोलिंस्का इन्स्टिट्यूटमधील संशोधकांनी असे सिद्ध केले की, कार्डिओमायोसाइट्ससाठी पेशी बदलाचा वार्षिक दर जन्मापासून सुरू होणारा सुमारे एक टक्का आहे आणि वयानुसार हा दर हळूहळू कमी होत आहे. त्यांनी असाही अंदाज लावला की, पंचाहत्तरीपर्यंत जगलेल्या व्यक्तीमध्ये त्याच्या हृदयाच्या मूळ पेशींपैकी निम्म्याही बदललेल्या नसतात. याव्यतिरिक्त, शास्त्रज्ञांनी असेही शोधून काढले आहे की, मेंदूचे काही भाग खरोखरच न्यूरोजेनेसिस म्हणजे मज्जासंस्थेच्या पेशी, न्यूरॉन्स, न्यूरल स्टेम सेल्सद्वारे तयार करण्यास सक्षम असले तरी, सेरेब्रल कॉर्टेक्स आणि व्हिज्युअल कॉर्टेक्ससारखी इतर क्षेत्रे आणि त्या भागातील न्यूरॉन्स जन्मापासून त्यांच्यासोबत असतात. तुमच्या शरीरातील काही सर्वात महत्त्वाच्या पेशी - तुमची हाडे, तुमचा मेंदू आणि तुमचे हृदय - अजिबात पुनरुत्पादित होत नाहीत. अशाप्रकारे आपले शरीर सतत बदलत असते आणि तरीही अखंड असते.

पण निसर्ग हा पूर्णतया उदासीन आहे. भूकंप, वणवे, महापूर, वादळे, अशा घटना निसर्गनियमांनुसार घडतात. त्यामागे कुणाचा कसलाही हेतू नसतो. कोणतीही नैसर्गिक घटना माणसांच्या, पशुपक्षांच्या, अन्य प्राण्यांच्या, वनस्पतिसृष्टीच्या हितासाठी अथवा हानीसाठी घडत नाही. पाऊस पडतो तो प्राणिमात्रांना, वृक्षवेलींना पाणी मिळावे म्हणून नव्हे; तर तो निसर्गाच्या भौतिक नियमानुसार पडतो. त्यामागे कार्यकारणभाव असतो तो केवळ निसर्ग या नियमांचा. अन्य कशाचाही नाही. म्हणूनच निसर्गातही अचेतन ग्रह, तारे, धूमकेतू यांनाही सचेतन जीवांप्रमाणे जन्म आणि मृत्यू असतो. अशा प्रकारे संपूर्ण निसर्गात जन्म, वाढ, झीज आणि मृत्यू अशी साखळी अनादी काळापासून सुरू आहे आणि यापुढेही अनंतकाळापर्यंत सुरू राहाणार आहे.

मृत्यूनंतर त्या शरीरातून आत्म्यासारखी एखादी शक्ती बाहेर गेली असे होत नाही! कारण ह्या सगळ्या भौतिक आणि रासायनिक क्रिया असतात. तेव्हा जन्म आणि मरण हे एकंदरीतच भौतिक-रासायनिक क्रियांनी नियंत्रित केली जाणारी गोष्ट आहे, हे स्पष्ट आहे. आपण सर्वांनी हे सत्य समजून घेतले पाहिजे की, मृत्यूपश्चात जीवन नाही. इहलोकी आपणा सर्वांचा हा पहिला आणि शेवटचा जन्म आहे. म्हणून पूर्वजन्म आणि पुनर्जन्मही असणार नाही... कुणाचाच नसतो. पुनर्जन्म ही भ्रामक कल्पना आहे. 'जातस्य हि ध्रुवो मृत्यु:।' हे गीतावचन सत्य आहे. मृत्यू अटळ आहे. मृत्यू झाल्यावर प्रत्येक सजीवाचे जीवन संपुष्टात येते. तेव्हा जे काही कर्तृत्व गाजवायाचे ते याच जन्मात. पुढचा जन्मही अध्यात्मवाद्यांनी सामान्य माणसाला फसवा आधार देण्यासाठी देव, दैववाद आणि अंधश्रद्धेच्या माध्यमातून तसेच सामान्यांचे शोषण बिनभोभाटपणे करता यावे म्हणून धर्म, रूढी, संस्कृती, परंपरा या नावाखाली धर्ममार्तंडांनी निर्मिलेली एक चाल आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. या विश्वात एक अलौकिक, अद्‌भुत शक्ती आहे. ती विश्वाचे संचलन करते. विश्वातील यच्चयावत् सर्व घटना ती शक्ती घडवते. हे पूर्णतया तथ्यहीन आहे. अशी अलौकिक शक्ती कुठेही अस्तित्वात नाही. माणसाच्या स्मृती, भाव-भावना, विचारसरणी या सर्वांची नोंद मेंदूत असते. मी कोण? या प्रश्नाचे उत्तर मी म्हणजे माझा मेंदू, असे देता येईल. मेंदूतील या नोंदी पुसल्या तर माझे स्वत्व संपले. केवळ शरीर म्हणजे मी नव्हे. मात्र अस्तित्वासाठी शरीर हवे. ते नसेल तर मेंदू नाही म्हणजे मी नाही. मेंदूतील चेतापेशींकडून येणाऱ्या संदेशांमुळे शरीराच्या विविध अवयवांचे वर्तन होते. अनेक अवयवांचे एकाच वेळी होणारे वर्तन म्हणजे चैतन्य. शरीरभर पसरलेल्या अब्जावधी

जिवंत पेशी देहात सतत प्राण ओतत असतात. त्यासाठी वेगळ्या आत्म्याची आवश्यकता नाही.

विश्वातील सर्व घटना निसर्गनियमांनुसार घडणाऱ्या भौतिक घटना आहेत. म्हणून आत्मा, पुनर्जन्म, परमात्मा, मोक्ष या सर्व भ्रामक संकल्पना आहेत. त्या उपनिषदांत आहेत, गीतेत प्रत्यक्ष भगवंतांच्या मुखी आहेत, शांकरभाष्यात आहेत, संतसाहित्यात आहेत, असे असले तरी त्या सत्य मानता येत नाहीत. कारण त्या प्रत्यक्ष प्रमाणाने सिद्ध होत नाहीत. तार्किक युक्तिवादाने तसेच मानवाच्या अधिकृत ज्ञानसंग्रहातील तत्त्वांच्याआधारे वरील संकल्पनांची सत्यता प्रस्थापित करता येत नाही. त्या संकल्पना केवळ श्रद्धेने खऱ्या मानायच्या. श्रद्धेला तर विज्ञानात तसेच तर्कशास्त्रात मुळीच स्थान नाही. डार्विनचा सिद्धान्त १८५९ साली प्रसिद्ध झाला. वैज्ञानिक तत्त्व म्हणून त्याची प्रतिष्ठापना झाली. सृष्टिनिर्मितीच्या स्पष्टीकरणासाठी ईश्वराचे अस्तित्व मानण्याची आवश्यकता उरली नाही. पुढे १९५३ साली फ्रान्सिस क्रीक आणि जेम्स वॉटसन यांनी डी.एन.ए.चा शोध लावला. जीवसृष्टीचे रहस्य उलगडले. डी.एन.ए.मधील आज्ञावलीअनुसार आपले शरीर बनते, चालते हे आता सर्वमान्य आहे. त्यामुळे आत्मा, पुनर्जन्म, मोक्ष या संकल्पनांची हद्दपारी अधोरेखित झाली आहे.

विश्वाच्या पसाऱ्यात आयुष्य अर्थहीन आहे हे खरेच आहे. मृत्यू येणारच असेल तर जन्म कशाला मिळतो हा प्रश्नही साहजिक आहे. या जगण्याचा अंतिमत: उपयोग नसतो, हेही वास्तव आहे. तरीही जगण्यात अर्थ भरता आला पाहिजे. मिळालेल्या श्वासांचा उपयोग करता आला पाहिजे. आपल्या मृत्यूच्या दु:खद विचारातसुद्धा भोवतीच्या लोकांचे आयुष्य आनंदी करता आले पाहिजे. दुसऱ्यांना आनंदी केले की, आपल्यालाही आपोआप आनंदी होता येते. आनंद ही आपल्या मनात उद्‌भवणारी बाब असली तरी ती माणसांच्या नातेसंबंधातूनच निर्माण होते. आनंद आभाळातून कधीच पडत नाही, तर तो माणसामाणसांच्या आपापसांतल्या व्यवहारातून आकार घेतो. आपले जगणे आनंदी, अर्थपूर्ण करायचे तर अहंकार बाजूला ठेवून दुसऱ्यांना आनंदी करता आले पाहिजे. जगण्यातली दु:खे टाळण्याचा तो एकमेव मार्ग आहे. हे तत्त्वज्ञान भाबडे वाटले तरी त्याला दुसरा काहीच पर्याय नाही, हे सत्य आहे.

अशाप्रकारे मृत्यूमागील विज्ञान समजून घेतले तर माणूस जसा जगण्याचा आनंदाने स्वीकार करतो तसाच मरणाचाही आनंदाने स्वीकार करायला तो घाबरणार नाही. कारण मृत्यू हेच अंतिम सत्य आहे. म्हणूनच म्हणतात, 'माती असशी, मातीत मिळशी.' हे जेवढ्या लवकर तो स्वीकारेल तेवढ्या लवकर त्याचे जगणे सुसह्य होईल.

●

---

**(पृष्ठ क्रमांक १५ वरून)**

समाजात लैंगिक विकृती निर्माण होणार नाहीत किंवा त्याविषयी विकृत समाजमन घडणार नाही यासाठी आणि ज्या विकृती समाजात दिसून येतात त्या कमी करण्यासाठी लैंगिकता शिक्षण हा एक महत्त्वाचा भाग आहे. या विकृती कमी करता येतील असे काही सामाजिक उपक्रमही राबवता येतील. महाराष्ट्र अंनिस त्यादृष्टीने अनेक वर्षांपासून काही उपक्रम राबवते आहे. जोडीदाराची विवेकी निवड, महिला सहभाग विभाग, मिश्रविवाह विभाग, युवा विभाग, विवेक वाहिनी अशा विभागांच्या माध्यमातून होणाऱ्या उपक्रम व कार्यक्रमांतून स्त्री-पुरुष समानतेचे, लैंगिकतेचे विषय प्राधान्याने मांडले जातात. त्यात युवा वर्गाचा सहभाग असेल असे प्राथम्याने पाहिले जाते; त्याबाबत सतत प्रबोधन केले जाते. मासिक पाळीविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी 'गोष्ट पिंकीच्या पाळीची' या नाटिकेचे महाराष्ट्र अंनिसच्या शहादा शाखेतर्फे जानेवारी २०२४ ते सप्टेंबर २०२४ दरम्यान ५ प्रयोग सादर केले गेले. युवा विभागामार्फत 'लैंगिकतेचे पदर उलगडताना' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महिला विभागातर्फे सप्टेंबर २०२४ मध्ये 'स्त्री-सन्मानासाठी पुरुषभान संवादयात्रे'चे व्यापक पातळीवर आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र अंनिसच्या अशा सर्व उपक्रमांमधून जे प्रबोधन होते ते समाजात लैंगिकताभान निर्माण करण्यासाठी निश्चितपणे परिणामकारक ठरते. अधिकाधिक समाजघटकांपर्यंत पोहोचण्यासाठी अनेक समाजसेवी संस्थांनी अशा प्रकारचे उपक्रम राबविले पाहिजेत व शासनानेही अशा प्रयत्नांना पाठबळ दिले पाहिजे.

**(लेखक महाराष्ट्र अंनिसचे राज्य सरचिटणीस असून त्यांनी 'अग्गंबाई! अरेच्या!' हे लैंगिकताविषयक पुस्तक लिहिले आहे.)**

●

## जय विज्ञान, जय विज्ञान

**प्रदीप कासुर्डे** । नवी मुंबई
७७३८४३६४४९



अंधश्रद्धेच्या फेऱ्यामध्ये,
अडकू नको तू माणसा
विज्ञानाची साथ घेऊन,
प्रगती कर तू माणसा
जय विज्ञान, जय विज्ञान ।।१।।

पंचांग, ज्योतिष, हस्तरेषा,
भविष्य तुझे सांगती
ग्रहगोलाचा आधार घेऊन
उगाच तुला फसवत
जय विज्ञान, जय विज्ञान ।।२।।

भूत, पिशाच्च, करणी, बाधा
खूळ सोडती डोक्यात
पैसा अडका कमवून बसती
बुवा बाबा झोक्यात ।
जय विज्ञान, जय विज्ञान ।।३।।

निसर्गनियमानुसार चाले
चक्र आपल्या सृष्टीचे
विज्ञानाचे शस्त्र हाती
मानवाच्या प्रगतीचे
जय विज्ञान, जय विज्ञान ।।४।।

विज्ञानाने दिला आम्हाला
प्रगतीचा हा मार्ग भला
वैज्ञानिक दृष्टी ठेवून
प्रत्येक घटना पाहू चला
जय विज्ञान, जय विज्ञान ।।५।

**अभिवादन**

**होमी भाभा जयंती**

होमी भाभा हे अणुभौतिकशास्त्रज्ञ, समर्पित वास्तुविशारद आणि परोपकारी व्यक्ति होते. ते टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च (TIFR) चे संस्थापक संचालक आणि भौतिकशास्त्राचे प्राध्यापकदेखील होते. त्यांना भारतीय अणुकार्यक्रमाचे जनक म्हणूनही ओळखले जाते.

## कीव

**कुसुमताई अलाम** । गडचिरोली
७२१८७१२१२६



इथल्या मातीचा कण न कण
सिमेंट-कॉंक्रिटचा करणारी
विकासधारा
करते निसरड्या
रुळलेल्या माणुसकीच्या वाटा
तेव्हा
चिखल मातीची नाती
पोहोचतात मरणाच्या दारात
येथूनच
बुवाबाजीला येतो अधिक ऊत
राहतात उभे दंभाचे निर्दयी खांब
वाढतात निर्लज्ज समर्थने
उन्मत्त भक्तांद्वारे
मनामनांत होते पेरणी विषाची
हितसंबंधींच्या भक्कम साथीने
नवनवे उन्माद उफाळून येतात
नि दुबळी होत जाते माणुसकी
लिलाव होतात सुखदुःखांचे
मानवी संवेदना
सामाजिक भान
होत जातात बोथट आपोआप
भावनांच्या भांडवलावर
सुरळीत चालतात दुकाने
बाबा-बुवांच्या अंगाखाली
कितीतरी बायकापोरींची होते घुसळण
धर्माच्या ठेकेदारांनी दिलेली चिमूटभर राख
त्या अब्रूसह
घोळून पितात घटाघटा
धर्म-संस्कृतीच्या गाभाऱ्यातील
ते श्वास
गुदमरत जातात तेव्हा
सावित्री माय,
तुझ्या लेकींची
कीव येते

पुस्तक परिचय


# विवेकनिष्ठ समाजनिर्मितीसाठी 'अंधश्रद्धेची वावटळ'



**डॉ. सुनीलकुमार सरनाईक ।** कोल्हापूर
९४२०३५१३५२

ज्येष्ठ साहित्यिक व प्रखर पुरोगामी विचारांचे सामाजिक कार्यकर्ते चंद्रसेन टिळेकर यांनी 'अंधश्रद्धेची वावटळ' या छोटेखानी पुस्तकात ग्रामीण व शहरी समाजजीवनातील अंधश्रद्धा, कर्मकांडे, प्रतिगामी रूढी आणि परंपरा यांवर जोरदार प्रहार करीत त्यांचे खंडन केले आहे. टिळेकर यांनी आजवर वैज्ञानिक, वैचारिक, ललित अशा साहित्य प्रकारांत एकूण २२ पुस्तके लिहिली आहेत. यातील बहुसंख्य पुस्तके समाजातील अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्मिती या विषयांवरच आहेत.

टिळेकर यांनी १९९६ पासून विवेकवादी, पुरोगामी व अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले आहे. समाजसुधारणा आणि समाजपरिवर्तन यासाठी त्यांनी आपली लेखणी व वाणी खर्ची घातली आहे.




आपल्या अनुभवातून लिहिलेल्या 'अंधश्रद्धेची वावटळ' या पुस्तिकेत एकेका प्रकारच्या अंधश्रद्धेचा मोजक्या २५० ते ३०० शब्दांत तर्कशुद्ध व युक्तिपूर्ण पद्धतीने समाचार घेतला आहे. अंधश्रद्धेच्या कराल विळख्यात अडकलेल्या बहुजन समाजाला बाहेर काढण्यासाठी सहज सोप्या व आकलन होईल, अशा प्रवाही भाषेत आटोपशीर अशी ही मांडणी झाली आहे. त्यामुळे एक प्रकरण वाचायला सुरुवात केली की वाचक ते पूर्ण वाचतोच. या पुस्तकात त्यांनी मार्मिकपणे सामाजिक दंभावर व अनिष्ट चालीरीतींवर आसूड ओढले आहेत.

यातील एकूण ४० लेखांची केवळ शीर्षके वाचली तरी समाज प्रबोधन आणि समाजसुधारणा यासाठी या पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित होते. नवस, कालसर्पयोग व नारायण नागबली, जागृत देवस्थान, स्वयंभू मूर्ती, दैवीशक्ती, अवतार, विभूती पूजा, अंगात येणे, आक्रस्ताळी भक्ती या प्रकरणांतून हे प्रकार कसे अशास्त्रीय आहेत याची लेखकाने चिकित्सा केली आहे. सर्प हा शेतकऱ्यांचा मित्र आहे, मात्र सापाबद्दल समाजात अनेक गैरसमज व अंधश्रद्धा आहेत. त्यांचे सविस्तर परिमार्जन पुस्तकातून केले आहे. श्राद्ध, मंत्र, यज्ञ, मुहूर्त, अपशकून, कौल, कुंडली-पत्रिका, गृहशांती-ज्योतिष, पूर्वजन्म-पुनर्जन्म, दृष्ट, ग्रहण, करणी, रुद्राक्ष, सुरक्षा कवच, हनुमान चालीसा, अंकशास्त्र, प्लँचेट, चुंबक चिकित्सा, गर्भसंस्कार या गोष्टींतील फोलपणा सामान्य माणसाच्या सहज लक्षात येईल, अशा शास्त्रीयदृष्ट्या व तर्कसंगत पद्धतीने लेखकाने मांडला आहे. देवाचा कोप, भूत, गुप्तधन, चमत्कार या भ्रामक कल्पना असून त्यामुळे ढोंगी बाबा, भोंदू साधू, महाराज यांचा बाजार कसा तेजीत आहे व सर्वसामान्यांची फसवणूक कशी होते आहे, हे लक्षात येते. जातपात, स्त्री, स्त्री धर्माची अपवित्रता, मुलगा... वंशाचा दिवा, आंतरजातीय विवाह या प्रकरणांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार मांडले आहेत. शेवटी पु. ल. म्हणतात, या लेखात... 'अंधश्रद्धा म्हणजे विकासाच्या गाडग्याला पडलेले मोठे भोक आहे. तुम्ही त्या गाडग्यात विकासाचे पाणी कितीही ओता, ते कधीच भरले जाणार नाही. पण सुशिक्षित माणसेही हे लक्षात घेत नाहीत याचे वैषम्य वाटते.' पु.ल. यांच्या या विज्ञानवादी विचारांचे अनन्यसाधारण महत्त्व पुस्तकात सांगितले आहे. विज्ञान तंत्रज्ञानामुळे भौतिक विकास प्रत्येकाच्या दारी पोहोचला असला तरी अंधश्रद्धांमुळे माणसाच्या जीवनातला माणूसपणाचा दर्जा मात्र खालावलेलाच दिसून येतो.

आजच्या संगणक युगात जेवढ्या अंधश्रद्धा बोकाळल्यात आणि ज्या वेगाने त्यांच्या लाटा पसरत असतात तेवढ्या यापूर्वी कधीच बोकाळलेल्या नव्हत्या. त्यामुळे 'अंधश्रद्धेची वावटळ'सारख्या प्रबोधनात्मक पुस्तकांची गरज आज प्रकर्षाने दिसून येते.

पुस्तकाचे नाव : **अंधश्रद्धेची वावटळ**
लेखक : **प्रा.चंद्रसेन टिळेकर**
प्रकाशक : **सनय प्रकाशन**
पृष्ठसंख्या : ४८ । स्वागतमूल्य : ५०/-

**(ज्येष्ठ पत्रकार व लेखक, लोकसाहित्याचे अभ्यासक)**

●



# चला, डोळस होऊ या (अविवेकी घटनांचा वेध)

**उत्तम जोगदंड** । कल्याण
९९२०१२८६२८

देशभरात 'श्रद्धे'च्या नावाने नवनवीन बुवा, बाबा, बापू यांच्याकडून भाविकांच्या विवेकाचे अपहरण करून त्यांचे शारीरिक, आर्थिक, मानसिक, लैंगिक शोषण केले जाण्याच्या घटनांमध्ये खंड पडता पडत नाही, असे विविध माध्यमांमधून प्रसृत झालेल्या बातम्यांमधून दिसून येते. गेल्या दशकभरात राजकीय समीकरणे बदलल्याने आणि राजकारणाभोवती धर्माचा विळखा पडल्याने या बुवा, बाबा, बापूंना सुगीचे दिवस आले आहेत. या बुवा-बाबांची वक्तव्ये, उपदेश, सल्ले ऐकून त्यांनी विवेकास खोलवर गाडले आहे की काय असे वाटू लागते. परिस्थिती एवढी हाताबाहेर गेली आहे की, आपल्या धर्मावरील श्रद्धेपोटी एकीकडे अन्य धर्मियांचा जीव घ्यायला देखील मागेपुढे पाहात नाहीत, तर दुसरीकडे त्याच श्रद्धेपोटी स्वतःच्या जिवाचीदेखील पर्वा करीत नाहीत. यात आर्थिक, मानसिक, शारीरिक शोषण तर होतेच; महिलांचेही मोठ्या प्रमाणात लैंगिक शोषण होते. असा कसा हा अविवेकाचा विळखा आहे की आपल्या स्वतःच्या जीवापेक्षा श्रद्धा मूल्यवान वाटते? अशा घटनांचा थोडक्यात वेध घेणारे, त्यावर भाष्य करणारे सदर 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका'मध्ये सुरू करीत आहोत.

**हाथरस जवळील रती भानपूर येथे चेंगराचेंगरीत १२१ श्रद्धाळू ठार**

दि. २ जुलै, २०२४ रोजी हाथरसजवळ भोलेबाबा नावाच्या एका बाबाच्या प्रवचनानंतर तो बाबा जिथून चालत गेला त्या ठिकाणची त्याच्या पावलाखालील धूळ मिळवण्यासाठी एकच झुंबड उडाली. त्यात एकूण १२१ श्रद्धाळू ठार झाले तर अनेक जखमी झाले. सूरज पाल उर्फ नारायण साकार हरी उर्फ भोलेबाबा याच्या कार्यक्रमास लाखावर लोक उपस्थित होते.

**गुप्तधनापोटी दिले जाणारे दोन संभाव्य नरबळी टळले**

दि. २ जुलै, २०२४ रोजी महा. अंनिसचे राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती यांना एक निनावी फोन आला. कौलव, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर या गावात गुप्तधनापोटी दोन बालकांचा नरबळी दिला जाणार असल्याची माहिती त्या अज्ञात व्यक्तीने दिली. त्यांनी आपले पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांना सोबत घेऊन घटनास्थळी धाव घेतली. ते तिथे पोहोचण्यापूर्वीच गावचे सरपंच आणि पोलीस पाटील यांनी पुढाकार घेऊन संबंधित व्यक्तीला विचारणा केली होती आणि त्यांची उत्तरे परस्परविसंगत वाटल्याने थेट जिल्हा पोलिस अधीक्षकांना कळवले होते. पोलिसांनी तत्काळ कारवाई करून पाच भोंदू बुवा आणि कुटुंबातील व्यक्तीस ताब्यात घेऊन घटनास्थळाचा पंचनामा केला होता. तिथे खणलेला मोठा खड्डा, पूजाविधीच्या वस्तू दिसून आल्या होत्या आणि त्या ग्रामस्थाने आपण नरबळी देणार होतो, अशी कबुली दिल्याचीही माहिती मिळाली.

अशा प्रसंगी लोकांना मदतीसाठी महा. अंनिसकडे धाव घ्यावीशी वाटणे; तसेच सरपंच, पोलीस पाटील यांनी घटनेची शहानिशा करून पोलिसांकडे धाव घेणे हे शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्रात रुजविलेल्या विवेकाच्या बीजाचे फलित आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**भोंदूबाबाचा विवाहित तरुणीवर लैंगिक अत्याचार**

लग्न होऊन चार वर्षे झाली तरी मूलबाळ होत नाही म्हणून गोंडखैरी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर येथील एक पती आपल्या पत्नीला दिनांक १३ जून, २०२४ रोजी चंद्रशेखर सोमकुवर या मध्यप्रदेशातील (पालसपाणी, ता. सौंसर, जि. छिंदवाडा) भोंदूबाबाकडे उपचारासाठी घेऊन गेला. सोबत त्याने आपल्या आईलादेखील घेतले होते. त्या महिलेला (पत्नीला) आत घेऊन त्या भोंदूबाबाने तिला काही जडीबुटी खायला घातली आणि पाच गुरुवार येण्याची सूचना करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तिने आरडाओरडा केल्यावर आपल्यामुळेच मूल होईल अशा भूलथापा मारल्या, पुन्हा लैंगिक अत्याचार करण्याची धमकी दिली. ही बाब त्या पीडित महिलेने आपल्या पती आणि सासूच्या निदर्शनास आणली असता त्यांनी तिच्या सांगण्याकडे दुर्लक्ष केले. तसेच ही बाब बाहेर कुठेही न बोलण्याची समज देऊन त्या भोंदूबाबाला औषधे परत करून दिलेले पैसे वसूल करू असे सांगितले. परंतु पीडित महिलेने निर्भयपणे पोलिसांकडे धाव घेतली. त्यांनी गुन्हा नोंदवून त्या भोंदूबाबास मध्यप्रदेशात जाऊन अटक केली.

या घटनेत त्या अत्याचार-पीडित, दुःखी महिलेने पती

आणि सासूचे दडपण झुगारून पोलिसांत धाव घेऊन आपल्यावरील अन्यायाविरुद्ध दाद मागितली, यासाठी तिथे कौतुक करावे लागेल.

**मनःशांतीसाठी मंदिरात आलेल्या महिलेवर पुजाऱ्यांचा मंदिरात बलात्कार**

ठाणे जिल्ह्यातील, डायघर जवळील शीळफाटा गणेश घोळ या मंदिरात ६ जुलै, २०२४ रोजी घरगुती भांडण झाल्याने बेलपूर येथे राहाणारी एक विवाहित मनःशांतीसाठी आली आणि ती दिवसभर तेथेच थांबली. तिथल्या पुजाऱ्यांनी तिला दुपारचे जेवण दिले. सायंकाळी चहा देताना त्यांनी त्यात भांगेची गोळी घातली. त्यामुळे त्या महिलेची शुद्ध हरपली. त्यानंतर त्या तीन पुजाऱ्यांनी ती शुद्धीवर नसताना तिच्यावर रात्री आळीपाळीने बलात्कार केला. पहाटे शुद्धीवर आल्यावर तिच्या हे लक्षात आले आणि तिने आरडाओरडा सुरू केला. आता आपले बिंग फुटणार या भीतीने तिला मारहाण करत पुजाऱ्यांनी जमिनीवर जोरात आपटले. त्यात तिचा मृत्यू झाला. तिचे प्रेत त्यांनी जवळच्या जंगलात फेकून दिले. दोन दिवसांनी एका भाविकाला ते प्रेत दिसल्यावर पोलिसांत खबर दिली. पोलिसांना सीसीटीव्हीच्या निरीक्षणानंतर पुजाऱ्यांचा संशय आला. मंदिर सांभाळण्यासाठी तात्पुरते नेमलेल्या, गोरक्षक असलेल्या श्यामसुंदर शर्मा, संतोषकुमार मिश्रा आणि राजकुमार पांडे या पुजाऱ्यांनी त्या महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. त्यापैकी संतोषकुमार मिश्रा आणि राजकुमार पांडे या दोघांना अटक केली. तिसरा आरोपी श्यामसुंदर शर्मा हा तिथून फरार झाला होता. पण पोलिसांनी आपली सूत्रे हलवत शर्मा याला ट्रॉम्बे इथल्या चिता कॅम्प परिसरातून अटक केली.

मंदिरासारख्या श्रद्धाळूंना पवित्र असणाऱ्या ठिकाणी पुजाऱ्यांनीच बलात्कार करून आणि हत्या करून ते लोक पुजारी नसून नराधम आहेत, गोरक्षक नसून भक्षक आहेत हे सिद्ध केले. मंदिरे आणि मंदिरातील पुजारी यांच्यापासून आपण सुरक्षित नाहीत असे श्रद्धाळू महिलांना वाटल्यास त्यांना दोष देता येणार नाही.

बुवाबाजीची ठाणे जिल्ह्यातील प्रकरणांचा नेहमी पाठपुरावा करणाऱ्यास महा. अंनिसच्या कायदा विभाग सहकार्यवाह ॲड. तृप्ती पाटील आणि तेथील आगरी समाज यांनी या प्रकरणात लक्ष घातले आहे आणि वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन पोलिसांत निवेदन दिले आहे.

**गुप्तधनाच्या लालसेपोटी खोदले जाताहेत खड्डे, नरबळीच्या शंकेची चर्चा**

औसा तालुक्यातील लामजना येथे गुप्तधनाच्या लालसेपोटी अनेक मोठे खड्डे खोदले जात आहेत आणि नंतर बुजवले जात आहेत. तसेच या ठिकाणी नरबळी दिला गेला असावा काय अशा शंकेने परिसरात चर्चा सुरू आहे, अशी माहिती महा. अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी दिली आहे. १९९३ साली लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे झालेल्या प्रलयंकारी भूकंपाचा फटका या गावालादेखील बसला होता आणि इथली अनेक घरे भुईसपाट झाली होती. गावाचे पुनर्वसन अन्यत्र झाल्याने भुईसपाट झालेल्या घरांखाली गाडली गेलेली संपत्ती मिळावी, या लालसेने लोक हे खड्डे खोदत असावेत. तसेच त्यासाठी जादूटोणा, नरबळी असे प्रकार होण्याची भीतीसुद्धा व्यक्त करण्यात येत आहे. गावकऱ्यांनी अशी प्रकरणे महा. अंनिसच्या तसेच गावचे सरपंच, पोलीस पाटील, पोलीस अधिकारी यांच्या निदर्शनास आणावीत आणि पोलिसांनी यात लक्ष घालावे, असे आवाहन माधव बावगे यांनी केले आहे.

**बिहारमधील शिवमंदिरातल्या चेंगराचेंगरीत ७ भाविकांचा कावडीयांसह मृत्यू**

जेहानाबाद जिल्ह्यातील बाबा सिद्धनाथ (शिव) मंदिरात दिनांक १२ ऑगस्ट २०२४ रोजी चेंगचेंगरीत ७ भाविकांचा मृत्यू झाला आहे. मृतांत अनेक कावडीयांचा समावेश आहे. श्रावण महिन्याचा चौथा सोमवार (उत्तरेकडे श्रावण महाराष्ट्रातल्या श्रावणाच्या एक पंधरवडा आधीच सुरू होतो) असल्याने भाविकांची दर्शनासाठी प्रचंड गर्दी जमली होती. त्यांमध्ये अनेक कावडीये जलअर्पण करण्यासाठी उपस्थित होते. चेंगराचेंगरीच्या कारणांबाबत वेगवेगळी माहिती समोर येत आहे. पण दरम्यान सात जणांचा मृत्यू झाला, सात कुटुंबे उद्ध्वस्त झाली. सरकारने तातडीने मदत घोषित केलेली असली तरी ती त्या कुटुंबीयांना उभे राहाण्यास पुरेशी आहे की नाही ते काळच सांगेल. परंतु प्रश्न असे पडतात की:

१) श्रद्धेपोटी आपला जीव जाऊ नये एवढी काळजी घेण्याचा विवेक श्रद्धाळू का दाखवीत नाहीत?
२) वेळोवेळी असे चेंगराचेंगरीत श्रद्धेच्या नावाने बळी जात असताना धर्ममार्तंड यास आळा बसेल असे काही का करीत नाहीत?
३) अशा ठिकाणी धार्मिक महत्त्वाच्या दिवशी हजारो लोक येणार, गर्दी होणार तेव्हा त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासन काहीही पावले का उचलत नाही.
४) आपल्या देशातील लोक डोळस कधी होणार?

●

# स्त्री सन्मानासाठी पुरुषभान संवाद

**रूपेश शोभा** (मुंबई), **पूजा पुहाल** (नांदेड)
९००४२८२६६३,

सामान्य भारतीय माणूस अलीकडे वारंवार घडणाऱ्या महिलांवरील अत्याचार व बलात्कारांच्या घटनांमुळे खूप अस्वस्थ, विचलित झालेला आहे. कोलकाता येथील इस्पितळात महिला डॉक्टरवर बलात्कार करून झालेल्या खुनापासून तर बदलापूर येथील चार-पाच वर्षांच्या मुलींवर झालेले लैंगिक अत्याचार असतील आणि त्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या बलात्काराच्या घटना असतील, यामुळे समाजामध्ये एक भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. महिलांवरील अत्याचाराच्या अशा घटनांनंतर मुलींना शाळेत पाठवायचे की नाही, मुलींना बाहेर पाठवताना भीती वाटते, असे अनेक प्रश्न पालकांच्या मनात येऊ लागले आहेत. अशा घटनांमुळे मुलींना स्वसंरक्षणाचे धडे द्या, तलवार चालवायला शिकवा, जवळ हत्यार बाळगण्याची परवानगी द्या, लैंगिक अत्याचार करणाऱ्यांचे लिंगविच्छेद करा, त्यांना भर चौकामध्ये फाशीची शिक्षा द्या, अशा अनेक प्रतिक्रिया समाजामधून येत आहेत. अत्याचार करणाऱ्या व्यक्तीस कठोर शासन व्हायलाच हवे यावर कोणाचे दुमत असता कामा नये. परंतु त्याचे लिंगविच्छेद करा किंवा भर चौकात फाशी द्या, अशा मध्ययुगीन अतिरेकी शिक्षेमुळे बलात्कार करणाऱ्या लोकांमध्ये भीतीचे वातावरण तयार होईल आणि शिक्षेच्या भीतीपोटी कोणी बलात्कार करणार नाही हा विचार मात्र चुकीचा आहे. कारण समाजात याबाबत भीती निर्माण होणे वेगळी गोष्ट आहे आणि त्याबाबत सामान्य नैतिकता समाजात निर्माण होणे ही एक वेगळी गोष्ट आहे.




वाढत्या बलात्कारांच्या घटनांमुळे मुलींवर, महिलांवर बंधने लादण्यात येत आहेत. मुलींनी कसे वागायला हवे, कसे कपडे घालायला हवेत, असे उपदेश मुलींना, महिलांना केले जात आहेत. 'गुड टच, बॅड टच' याची माहिती देणारे कार्यक्रम शाळांमध्ये व्हायला लागलेले आहेत. हे सगळं करून बलात्कार थांबणार आहेत का, असा प्रश्न पडतो. व्यापक समाजपरिवर्तनाचे उद्दिष्ट ठेवून कार्य करणारी महाराष्ट्र अंनिस या समस्येवरील समाधानकारक कृतिशील उपाय शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचा एक भाग म्हणून महिलांचे सबलीकरण करण्याबरोबरच पुरुषी मानसिकतेचे सबलीकरण करण्याच्या एका कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. कारण बलात्कारामागे तथाकथित पुरुषार्थच दडलेला असतो आणि नेमकी त्याविषयी जागरुकता निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य महिला सहभाग विभागाने 'स्त्रीसन्मानासाठी पुरुषभान' संवाद यात्रेचे नियोजन करण्याचे ठरवले. या संवादयात्रेतून युवकांशी, सामान्य पुरुषांशी संवाद साधून त्यांच्यामध्ये स्त्री-पुरुषसमतेचा विचार रुजवण्यासाठी व माणूसपण जागे करण्यासाठी ही संवादयात्रा आहे. यासाठी महिला विभागाच्या वतीने तीन दिवसीय ऑनलाईन संवादमाला आयोजित करण्यात आली होती. या तीन दिवसांसाठी वेगवेगळे वक्ते निमंत्रित करण्यात आले होते.

पहिल्या दिवसाच्या सत्रात 'लैंगिक हिंसाचाराचे समाज वास्तव' या विषयावर दर्शना सरला अरुण यांनी मांडणी केली. कुटुंबात मुलामुलींच्या लहानपणापासूनच त्यांच्या जोपासनेत होणाऱ्या भेदांबाबत त्यांनी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले. मुलांना मिळणारे अनिर्बंध स्वातंत्र्य आणि मुलींवर घातली जाणारी बंधने व निर्बंध यातूनच लहान मुलांच्या मनात लिंगविषमता वाढीस लागते. अशा प्रकारे मुलांमध्ये पुरुषी श्रेष्ठत्वाचा गंड निर्माण होऊन तो समाजात वावरताना अधिकाधिक

पोसला जातो. त्यातून पुरुषसत्ताक समाजव्यवस्था बळकट होत जाते.

दर्शना पुढे म्हणाल्या की, ''सिनेमात तसेच डिजिटल माध्यमांमध्ये जी स्त्रीप्रतिमा दाखवली जाते, त्यातून स्त्री ही एक उपभोग्य वस्तू आहे, असे चित्र समाजमनात सतत बिंबवले जाते. स्त्रियांवरील हास्यविनोदांतूनही तिला दुय्यमत्व देत तिची खिल्ली उडवली जाते. त्यामुळेच एखाद्या स्त्रीवरील बलात्कार तिचा, तिच्या कुटुंबाचा मानभंग करणारा असल्याची भावना निर्माण करतो. खरे तर, तो पुरुषाचा विवेकभंग म्हटला पाहिजे.'' अशा प्रकारे दर्शना यांनी आपल्या व्यक्तिगत व समाजजीवनात अवतीभवती येणाऱ्या अनुभवातून वेगवेगळे संदर्भ देत संवादाच्या विषयातील सामाजिक समस्येचे विश्लेषण केले. डॉ ठकसेन गोराणे, राज्य प्रधानसचिव, यांनी अध्यक्षीय भाषणाने पहिल्या सत्राचा समारोप केला.




दुसऱ्या दिवसाच्या सत्राचा विषय होता, 'स्त्री अत्याचारामागील मानसिकता'. या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी जळगाव येथील प्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ. प्रदीप जोशी निमंत्रित होते. पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे त्यांनी या सत्रात मांडणी केली. एखाद्या स्त्रीसोबत तिच्या मनमर्जीविरुद्ध जबरदस्तीने केलेला संभोग म्हणजे बलात्कार, तसेच कोणत्याही कारणाने भान हरपलेल्या स्त्रीचा होकार असला तरी तिच्यासोबत केलेला संभोग हा बलात्कारच म्हटला जातो. बलात्काराचे वेगवेगळे प्रसंग सांगून डॉ. जोशी यांनी भारतात होणाऱ्या बलात्काराच्या गुन्ह्यांची आकडेवारी दिली. बलात्कार करणाऱ्या व्यक्तीला मनोरुग्ण म्हणता येणार नाही. कारण कोणत्याच मानसिक आजारात बलात्काराची विकृती निर्माण होत नाही, असे डॉक्टरांनी स्पष्ट केले. अनेक बलात्कार स्त्रियांवरील पुरुषी वर्चस्व गाजवण्यासाठी होतात. अशा प्रकारचे बलात्कार दंगलींमध्ये जास्त प्रमाणात होत असतात.

डॉ. जोशी पुढे म्हणाले की, ''सिनेमा, जाहिराती यातून दाखवले जाणारे स्त्रियांचे बीभत्स चित्रीकरण, हिंसाचार यामुळे मुलांच्या लैंगिकता व हिंसाचाराविषयीच्या भावना बोथट होत जातात व त्यांच्या मनावर खोलवर परिणाम होतो. बलात्कार हे ओळखीच्या व्यक्तीकडून जास्त प्रमाणात होतात. अनोळखी व्यक्तीकडून होणारे बलात्कार तुलनेने कमी आहेत. गुन्हेगाराला शिक्षा ही लवकरात लवकर व्हायला हवी, तरच लोकांचा न्यायव्यवस्थेवर विश्वास बसेल व बलात्कार करणाऱ्यांना धाक निर्माण होईल. त्याचबरोबर बलात्काऱ्याला समाजामध्ये मिळणारे स्थान, याचाही परिणाम होत असतो. बलात्कारी तुरुंगातून बाहेर आल्यानंतर त्यांचे हार-फुले देऊन स्वागत केले जात असेल, त्यांना राजकारणामध्ये स्थान दिले जात असेल तर अशा परिस्थितीत बलात्काराच्या घटना कमी कशा होतील'', अशी चिंता डॉ. जोशी यांनी व्यक्त केली.

बाललैंगिक अत्याचाराच्या, स्त्रियांकडून केल्या जाणाऱ्या पुरुषांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांचादेखील उल्लेख डॉ. जोशी यांनी केला. बलात्कारमुक्त भारत करता येणे शक्य नसेल तर निदान लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रियांकडे सहानुभूतीने पाहाणे गरजेचे आहे. त्यांना योग्य ती मदत मिळणे गरजेचे आहे. त्यांना समाजात सामावून घेत बलात्काऱ्यांना योग्य जागा दाखवून दिली पाहिजे; तरच याबाबतीत काही प्रमाणात सामाजिक बदल होऊ शकेल, अशी मांडणी डॉ. जोशी यांनी केली. या सत्राचे अध्यक्षीय समारोपाचे संबोधन ॲड. रंजना गवांदे यांनी केले.

तिसऱ्या सत्राचा विषय होता 'लैंगिक अत्याचारामागील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विश्लेषण'. या विषयावर संवाद साधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते मिलिंद चव्हाण उपस्थित होते. मिलिंद यांनी लैंगिक अत्याचारामागील वेगवेगळी कारणे स्पष्ट केली. विकृत किंवा अतिरेकी राष्ट्रप्रेमातून, राष्ट्रवादातून दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान जपानी सैनिकांनी कित्येक देशातील महिलांवर सामूहिक बलात्कार केले. त्यांना लैंगिक गुलाम बनवून ठेवले. भारताची फाळणी झाली तेव्हा देखील सुमारे पंच्याहत्तर हजार ते एक लाख

महिलांवर बलात्कार झाले. म्हणजेच अतिरेकी राष्ट्रप्रेमाच्या, राष्ट्रवादाच्या बळीदेखील अधिकतर स्त्रियाच असतात. सामाजिक परिवर्तनासाठी व्यक्तिगत अथवा संघटनात्मक प्रयत्न करणाऱ्या पुरुषांवर हिंसक हल्ले केले जातात, प्रसंगी जीवे ठार मारले जाते. मात्र असे प्रयत्न करणाऱ्या स्त्रियांना त्यापासून प्रवृत्त करण्यासाठी त्यांच्यावर बलात्कार केले जातात; याची काही उदाहरणे देत त्यामागे जातीची उतरंड, धर्मांधता, सामाजिक प्रतिष्ठा इत्यादी घटकही असल्याचे मिलिंद यांनी नमूद केले.




गुजरात हत्याकांडादरम्यान झालेल्या बलात्काराची उदाहरणे चव्हाण यांनी दिली. त्यातल्या बिल्कीस बानोवरील बलात्कार प्रकरणातील आरोपींना २०२२ साली न्यायालयाची कोणतीही परवानगी न घेता सोडण्यात आले. लष्करातील सैनिकांकडून महिलांवर होणाऱ्या बलात्काराची उदाहरणे मिलिंद चव्हाण यांनी दिली. बलात्काऱ्यांना खासदारकीचे तिकीट मिळणे, लोकक्षोभानंतर त्यांना भारताबाहेर पळून जाण्यास केलेली मदत, त्यांना मिळणारा राजकीय आश्रय, अशी काही उदाहरणे मिलिंद चव्हाण यांनी दिली. त्यातून बलात्कारामागील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्था कशी काम करते हे स्पष्ट केले. बलात्काराच्या खटल्यातील न्यायदानाच्या प्रक्रियेत आरोपीलादेखील त्याची बाजू मांडण्याची संधी द्यायला हवी हे खरे असले, तरी न्यायदान लवकर व्हावे असा आशावाद त्यांनी सत्राच्या शेवटी व्यक्त केला. या सत्राच्या अध्यक्षा सुशीला मुंडे यांनी समारोपाचे संबोधन केले. प्रत्येक सत्रामध्ये वक्त्यांची मांडणी झाल्यानंतर प्रश्नोत्तराला वेळ दिला होता.

भारतीय संस्कृतीचे गोडवे गात असतानाच बलात्कार आणि महिलांवरील अत्याचार हे भारतीय समाजावरील कलंक आहेत याची जाणीव सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय पातळीवर व्हावी आणि ते दूर करण्यासाठी सामाजिक बांधिलकी स्वीकारत महाराष्ट्र अंनिससारख्या अनेक समाजसेवी संस्थांनी आपापल्या क्षेत्रात प्रयत्न करणे गरजेचे आहे. व्यापक समाजपरिवर्तनासाठी महाराष्ट्र अंनिस त्या दिशेने सतत प्रयत्नशील आहे व राहील. 'स्त्रीसन्मानासाठी पुरुषभान संवाद' ही संकल्पना व कृती त्याच प्रयत्नांतील एक भाग.

●

**अभिवादन**

### र. धों. कर्वे स्मृतिदिन


१९८२ साली जन्मलेले रघुनाथ धोंडो कर्वे हे महाराष्ट्रातील एक अग्रगण्य समाजसुधारक होते. ते महर्षी कर्वे यांचे ज्येष्ठ पुत्र होते. रघुनाथ कर्वे यांनी स्त्रीशिक्षण, विधवा विवाह या सामाजिक कार्याचा, आपल्या वडिलांचा वारसा पुढे चालवला. ते विलक्षण बुद्धिवादी आणि विज्ञाननिष्ठ होते. मुळात स्वतः गणिताचे प्राध्यापक असूनही नंतर त्यांनी संततिनियमन आणि कामशास्त्र या विषयांचा खोलवर अभ्यास केला, पुस्तके लिहिली. लोकांना या विषयाची शास्त्रशुद्ध माहिती व्हावी म्हणून त्यांनी 'संततिनियमन' आणि 'गुप्तरोगापासून बचाव' ही पुस्तके लिहिली. त्यानंतर लोकशिक्षण आणि प्रबोधन या हेतूने 'समाजस्वास्थ्य' नावाचे मासिक काढले. जुलै १९२७मध्ये 'समाजस्वास्थ्य'चा पहिला अंक निघाला. २६ वर्षे ४ महिने एवढा दीर्घकाळ चालून अखेर १९५३ साली त्यांच्या मृत्यूनंतर हे मासिक बंद पडले. त्यांचे स्पष्ट विचार त्या काळात लोकांना पचले नाहीत. प्रखर विरोधाचा सामना त्यांना करावा लागला आणि आणि अनेक खटल्यांना सामोरे जावे लागले.

# लेखक कार्यकर्ते घडावेत



**प्रल्हाद मिस्त्री** । नाशिक
९४२०२६१८२९

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अनेक कार्यकर्त्यांकडे गेल्या ३५ वर्षांच्या कार्यातून अनुभवाचा ठेवा संकलित झालेला आहे. त्यांच्याकडील तो ठेवा चमत्कार सादरीकरणापासून तर विविध निमित्तांनी होणाऱ्या व्याख्यानांतून, चर्चासत्रांतून, मुलाखतींमधून, प्रबोधन कार्यक्रमांमधून जनतेसाठी उपलब्ध होत असतो. परंतु दस्तऐवजाच्या स्वरूपात तो लेखनाच्या माध्यमातूनच प्रामुख्याने जपला जातो. म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेकडून कार्यकर्त्यांना 'लिहिते व्हा' असे आवाहन नेहमीच केले जाते. अशी लेखनाची कौशल्येही काही कार्यकर्त्यांकडे आहेत. परंतु अनेक कार्यकर्त्यांमध्ये ती कौशल्ये विकसित होऊन लेखक कार्यकर्ते घडावेत यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका विभागातर्फे पहिलीच लेखन कार्यशाळा ऑनलाईन स्वरूपात दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती.




वैचारिक लेखनापासून तर चरित्रपर लेख, कथा व कविता, ललित लेख, नाटक व नाटिका लेखन अशा विविध प्रकारच्या लेखनाबाबत लेखक कार्यकर्त्यांना मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. आयोजित केलेल्या ऑनलाईन कार्यशाळेसाठी प्राथमिक स्वरूपाचे पुढील तीन विषय निवडण्यात आले होते. १) उपक्रम, कार्यक्रम यांचे वृत्तांत लेखन आणि बैठकांचे इतिवृत्त लेखन, २) वैचारिक लेखन आणि ३) बुवाबाजी भांडाफोड – दस्तऐवज स्वरूपात मांडणी.

दि. ५ सप्टेंबर २०२४ या दिवशी शहीद पत्रकार गौरी लंकेश यांचा स्मृतिदिन होता. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून कार्यशाळेची सुरुवात झाली. या कार्यशाळेसाठी प्रा. एकनाथ पाटील, मा. सचिन परब आणि प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे हे व्याख्याते निमंत्रित होते. कार्यशाळेसाठी अध्यक्ष म्हणून राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांचे नामनिर्देशन करण्यात आले.

१) संघटनेचे कार्यकर्ते आपल्या उपक्रमांच्या आणि कार्यक्रमांच्या बातम्या वृत्तपत्रांना नेहमीच देत असतात. यासाठी 'उपक्रम, कार्यक्रम यांचे वृत्तांत लेखन आणि बैठकांचे इतिवृत्त लेखन' या विषयावर प्रा. एकनाथ पाटील यांनी मार्गदर्शन केले. वृत्तपत्रासाठी बातमीच्या स्वरूपात लेखन आणि संघटनेसाठी दस्तऐवज स्वरूपात वृत्तांत लेखन यात फरक असल्याचे प्रा. पाटील यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केले. वृत्तपत्रासाठी लेखन करताना त्या बातमीचे चार भाग असतात. जसे – शीर्षक, प्रस्तावना, गाभा आणि समारोप. शीर्षकात बातमीचे सार यावे. ते अर्थपूर्ण, लक्षवेधी, वृत्त वाचण्यासाठी वाचकाची उत्कंठा वाढविणारे असावे. तरीही शीर्षक गुळमुळीत, बोथट नसावे. बातमीतील लीड हीच प्रस्तावना असते. त्यातून वाचकाला का, कोणी, कुठे, केव्हा, कसे अशा प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. बातमीचा गाभा लिहिताना त्यातून सुरुवातीलाच त्या उपक्रमाची, कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट व्हायला पाहिजे. गाभ्यात कार्यक्रमाचा तपशील क्रमाने मांडावा. तरीही त्यात पाल्हाळ नसावा, ते आटोपशीर असावे. कार्यक्रमाचे फोटो बातमीसोबत अवश्य द्यावेत. अधिकची कोणतीही माहिती त्यात नसावी, ही विशेष काळजी या लेखनात घेतली पाहिजे. बातमीच्या समारोपात संक्षिप्त गोषवारा असावा.

संघटनेच्या नियतकालिकासाठी जेव्हा उपक्रमाचे किंवा कार्यक्रमाच्या वृत्तांताचे लेखन केले जाते तेव्हा ते दस्तऐवजाचे स्वरूप धारण करते. त्यामुळे त्याचे महत्त्व बातमीसारखे तत्कालिक स्वरूपाचे नसून तो संघटनेच्या वाटचालीतला ऐतिहासिक दस्तऐवज बनतो. असे वृत्तांत

लेखन करताना कार्यक्रमाच्या लहानसहान नोंदी लेखकाने घेतलेल्या असल्या पाहिजेत. वृत्तांत लेखनात वस्तुनिष्ठता असावी. त्यात लेखकाची भावनिक गुंतवणूक जशी नसावी तसा त्यात कोरडेपणादेखील नसावा. लेखकाची तटस्थता, त्याचा साक्षीभाव अशा दस्तऐवजातून दिसावा. कितीही काळानंतर अशा वृत्तान्ताचे वाचन केले तरी वाचकास तो कार्यक्रम, उपक्रम आपल्यासमोरच घडलेला आहे, अशी अनुभूती यावी. कार्यक्रमात अनेक व्यक्तींचा, वक्त्यांचा सहभाग असू शकतो. त्यांच्या बोलण्यातील, कथनातील अगदी महत्त्वाच्या काही विधानांच्या व्यतिरिक्त त्यांच्या संपूर्ण वक्तव्याचे शब्दांकन नसावे; गोषवारा असावा.

त्याचप्रमाणे बैठकांचे इतिवृत्त लेखनासाठी चर्चेतील बारीकसारीक मुद्द्यांचे टिपण घेतलेले असले पाहिजे. इतिवृत्तात मुख्य मुद्दे आणि त्यांना पूरक अशा सर्व मुद्द्यांचा परामर्श समाविष्ट केला जावा. संबंधित व्यक्तींनी असे इतिवृत्त नंतर केव्हाही वाचले तरी कोणत्याही मुद्द्याची अस्पष्टता त्यांना जाणवू नये, अशी एकूण मांडणी असावी. अशा प्रकारे बातमी लेखन, वृत्तांत लेखन आणि इतिवृत्त लेखन या विषयावर प्रा. पाटील यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

२) वैचारिक लेखन हा संघटनेसाठी महत्त्वाचा लेखन प्रकार आहे. संघटनेच्या वैचारिक भूमिकेची गरजेनुसार वेगवेगळ्या स्वरूपातील मांडणी, विविध सामाजिक समस्या, राजकीय भूमिका यांची मांडणी वैचारिक लेखनात येते. शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान, आरोग्य, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि अशा विविध क्षेत्रांतील समस्यांची मांडणी, त्यावरील उपाय आणि विविध दृष्टिकोनातून केलेले विचारमंथन यावरील लेखन वैचारिक स्वरूपात येते. कोणत्याही संस्थेची, संघटनेची मुख्य ओळख अशा वैचारिक लेखनातून होत असते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

या विषयावरील मार्गदर्शनासाठी 'रिंगण' या वार्षिक अंकाचे संपादक, पुढारी वृत्तसमूहातील संपादक सल्लागार मा. सचिन परब हे उपस्थित होते. 'वैचारिक लेखन हा माझ्या जगण्याचा भाग आहे', या विधानाने परब यांनी आपल्या विषयाच्या मांडणीस सुरुवात केली आणि तसाच तो कोणत्याही वैचारिक लेखन करणाऱ्या लेखकाच्या जीवनाशी संबंधित असतो. वैचारिक लेखन ही तत्कालिक बाब नाही. ती एखाद्या विषयाबाबत दीर्घकाळ केलेल्या चिंतन व मनन यातून, बहुश्रुततेतून साध्य होते. वैचारिक लेखन हे केवळ कोणत्या दुसऱ्या विचाराला दिलेली प्रतिक्रिया नसते तर ती एक समग्र, स्वतंत्र विचारांची मांडणी असते. अशा प्रकारे वैचारिक लेखनाची वैशिष्ट्ये परब यांनी स्पष्ट केली.

आधुनिक काळात वैचारिक लेखनाची सुरुवात सामान्य माणसाला विविध विषयांत 'शहाणे करून सोडावे, सकल जन' या उक्तीस अनुसरून झाली. ज्या काळात माहितीसाठी गुगल वगैरे सारखे स्रोत उपलब्ध नव्हते तेव्हा जीवनास उपयुक्त अशी माहिती सामान्य माणसापर्यंत पोहोचावी, नव्या जगातील विचार पोहोचावेत या हेतूने लेखन सुरू झाले. आज माहितीचे अनेक स्रोत उपलब्ध असल्याने केवळ अशी माहिती सामान्य माणसापर्यंत पोहोचावी हा हेतू दुय्यम झालेला आहे. माहितीच्या महापुराच्या या काळात माहितीचे विश्लेषण आता महत्त्वाचे झाले आहे. उपलब्ध माहितीच्या विश्लेषणातून त्या माहितीच्या पार्श्वभूमीत दडलेले वास्तव, वस्तुस्थिती वाचकासमोर त्याला तळहातावरील आवळ्याप्रमाणे टळटळीत, स्पष्ट दिसेल अशी मांडणी करणे, या स्वरूपाच्यासुद्धा वैचारिक लेखनाची आज नितांत गरज आहे. अशी वैचारिक लेखनाविषयीची मूलभूत मांडणी परब यांनी केली.

वृत्तपत्रे, सामान्य नियतकालिके, विशेष विषयाला वाहिलेली नियतकालिके यांचा वाचक वर्ग वेगवेगळा असतो. त्यामुळे आपला वाचक वर्ग डोळ्यांसमोर ठेवून लेखकाचे लेखन असावे. त्या त्या क्षेत्रातील पारिभाषिक शब्दांची, संज्ञांची योजना वाचक वर्गाला कळेल त्यानुसार करावी लागते. त्या त्या वाचक वर्गासाठी मांडणी असली तरीही ती सोप्या शब्दांत असावी. कठीण विषय सोपा करून लिहिणे हेच खरे कठीण असते आणि ते त्या विषयातील सूक्ष्म अभ्यास असला तरच साध्य होते.

वैचारिक लेखनातून जो एखादा विचार वाचकांपुढे मांडायचा असतो, तो लेखकाला आधीच स्पष्ट झालेला असला पाहिजे आणि लेखाच्या शेवटी तो ठळकपणे वाचकापर्यंत पोहोचला पाहिजे. त्यासाठी वाचकापुढे कोणती वैचारिक शृंखला मांडून त्याला कोणत्या विचारापर्यंत शेवटी न्यायचे याची रणनीती लेखकाने आधीच आखली पाहिजे. मुद्दे आणि उपमुद्दे यांच्या मांडणीसाठी स्वतंत्र परिच्छेद करावेत. वैचारिक लेखन हे

लेखकाचे स्वतःचे सृजन असते. अशी वैचारिक लेखनातील सूक्ष्म मांडणी सचिन परब यांनी केली.

३) बुवाबाजी भांडाफोड प्रकरणांशी प्रत्येक अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्त्याचा संबंध कधी ना कधी येतोच. त्याच्या बातम्यासुद्धा वर्तमानपत्रातून झळकतात. परंतु अशा बातम्या संघटनेच्या कामाचा दस्तऐवज होऊ शकत नाहीत. बुवाबाजी भांडाफोड प्रकरणांचे दस्तऐवज स्वरूपात लेखन झाले पाहिजे. असे दस्तऐवज स्वरूपातले लेखन सर्वांसाठी उपलब्ध करून करून देण्याचा मार्ग म्हणजे संघटनेच्या मुखपत्रातून त्याची प्रसिद्धी करणे. हे लेखन कसे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी संघटनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे यांना निमंत्रित करण्यात आले होते.

बुवाबाजी भांडाफोड प्रकरणांचा एक विशिष्ट क्रम असतो, त्या क्रमाने सहसा लेखनाची मांडणी असावी या सूत्राने प्रा. मुंडे यांनी मार्गदर्शनास सुरुवात केली. उदाहरणार्थ, भोंदू बुवा-बाबांविषयी प्राप्त होणाऱ्या फसवणुकीच्या अथवा शोषणाच्या तक्रारी, या तक्रारींची व्याप्ती, फसवणूक वा शोषण करण्यात गुंतलेल्या एका अथवा अनेक व्यक्तींची इत्थंभूत माहिती, त्यांची गुन्ह्याची पद्धती (Modus Operandi) अशा बाबींची माहिती गोळा करून त्यांच्या नोंदी वेळीच करून ठेवलेल्या असाव्यात; ज्यांचा तपशील लेखनात यायला हवा. आवश्यक व पुरेशी माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाईचे नियोजन करावे. त्यात ज्या संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केलेली असते त्यांच्या मदतीने अशा फसवणूक करणाऱ्यांना जाळ्यात पकडण्यासाठी सापळा रचणे हा महत्त्वाचा भाग असतो. त्याची रचना प्रत्येक प्रकरणात वेगवेगळी असते. त्यानुसार त्याचेही वर्णन दस्तऐवज स्वरूपाच्या लेखनात यायला हवे. अशा प्रकारे प्रकरणातील गुन्हेगारांना रंगेहाथ पकडल्याच्या घटनेचे नाट्यपूर्ण वर्णन लेखनात यावे. संघटनेच्या कोणकोणत्या कार्यकर्त्यांनी या कारवाईत कशा भूमिका बजावल्या त्यांचेही उल्लेख लेखनात समाविष्ट करावेत. पोलिसांनी गुन्हेगारांना ताब्यात घेतल्यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्त्यांची भांडाफोड कामगिरी संपते. अशा प्रकारे भांडाफोड प्रकरणाचे शब्दचित्र दस्तऐवज स्वरूपात कसे मांडले जावे, याबाबत प्रा. मुंडे यांनी मार्गदर्शन केले.

वरीलप्रमाणे तीनही विषयांवरील व्याख्यात्यांची व्याख्याने झाल्यानंतर प्रश्नोत्तरे झाली. त्यानंतर राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. वरीलप्रमाणे कार्यशाळा संपन्न करण्यात ज्यांनी महत्त्वाच्या भूमिका बजावल्या त्यांचे राजेंद्र फेगडे यांनी आभार व्यक्त केले.

●

### अभिनंदन



महा.अंनिसचे विज्ञानबोध वाहिनी विभागाचे राज्य कार्यवाह भास्कर सदाकळे तासगांव, जि.सांगली यांची मुलगी सोनाली आणि श्रीमती सोनाबाई वसंत इंजल याचा मुलगा गजानन या दोघांचा सत्यशोधक पद्धतीने विवाह संपन्न झाला. यावेळी आमदार सुमनताई पाटील उपस्थित होत्या. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने सदाकळे आणि इंजल परिवारांचे मनःपूर्वक अभिनंदन!

### अभिवादन

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मृतिदिन**

तुकडोजी महाराज (पूर्ण नाव - माणिक बंडोजी इंगळे) (१९०९-१९६८) यांना राष्ट्रसंत म्हणून ओळखले जाते. अंधश्रद्धा निर्मूलन व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी 'ग्रामगीता' या काव्यातून मांडले. त्यांनी मराठी व हिंदी भाषांमध्ये काव्यरचना केली आहे. तुकडोजी महाराजांनी इ.स. १९३५मध्ये मोझरी येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. खंजिरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे वैशिष्ट्य होते.



# राज्य कार्यकारिणी बैठक

**डॉ. टी. आर. गोराणे** । नाशिक
९४२०८२७९२४

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची राज्य कार्यकारिणीची बैठक दि. १४ व १५ सप्टेंबर २०२४ रोजी लातूर येथील हॉटेल अंजनी, छत्रपती शिवाजी चौक, लातूर येथे संपन्न झाली. बैठकीचे उद्घाटन सत्र माधव बावगे, राज्य कार्याध्यक्ष, यांच्या मनोगताने संपन्न झाले. नंतर जिल्हानिहाय अहवाल उपस्थित जिल्हा कार्याध्यक्ष, प्रधान सचिव किंवा त्या जिल्ह्यातील राज्य पदाधिकारी यांनी सादर केला.

पुढील चार महिन्यांमध्ये जिल्हा कार्याध्यक्ष, जिल्हा प्रधान सचिव तसेच त्या जिल्ह्यातील राज्य पदाधिकारी यांनी विशेषतः शाखा भेटी करणे, कार्यकर्त्यांच्या गृह भेटी, कार्यकर्त्यांचे अनुभव व अडीअडचणी समजावून घेऊन त्या सोडवण्यासाठी, त्यांचे निराकरण करण्यासाठी काय उपाययोजना करता येतील यासाठी संवाद साधणे, सर्व सहमतीने निर्णय घेणे आणि त्याप्रमाणे वेळोवेळी नियोजित कामांची पूर्तता होईल यासाठी सतत कृतिशील कसे राहता येईल हे पाहावे, असे मार्गदर्शन झाले. त्यानंतर संघटनात्मक विभागांच्या कामाचे अहवाल सादर केले गेले.

**१) वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभाग**

राज्य कार्यवाह डी. एस. कट्यारे यांनी मागील चार महिन्यांच्या झालेल्या कामकाजाचा अहवाल, शिल्लक व नवीन छपाई केलेल्या प्रश्नपत्रिका याबाबतची माहिती दिली शाखांना निधी उपलब्ध करून हा प्रकल्प शाखांनी यशस्वीरित्या कसा राबवायचा याची माहिती राज्य सहकार्यवाह विलास निंभोरकर यांनी दिली. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी काही महत्त्वाच्या सूचना केल्या.

**२) प्रशिक्षण विभाग**

राज्य कार्यवाह सुरेश बोरसे यांनी ऑनलाइन व ऑफलाइन प्रशिक्षण शिबिरांचा आढावा घेतला. त्यामध्ये विविध विषयांचे प्रशिक्षण देऊ शकतील असे ३५ नवीन कार्यकर्ते जोडले गेले, अशी माहिती त्यांनी दिली. कार्यकर्त्यांच्या मागणी नुसार आवश्यक विषय प्रशिक्षणात असावेत. चमत्कारांच्या प्रात्यक्षिकांमध्ये योग्य ते नाविन्यपूर्ण बदल करण्यात यावेत, अशा सूचना आल्यात व त्यास मान्यता देण्यात आली.

**३) महिला सहभाग विभाग**

राज्य कार्यवाह आरती नाईक यांनी मागील चार महिन्यात झालेले उपक्रम, अभियाने, ऑनलाइन बैठका याबद्दलची माहिती दिली. जून ते सप्टेंबर ह्या कालावधीत अशा सहा बैठकांना प्रत्येक वेळी नवीन पाहुण्यांना निमंत्रित करण्यात आले होते. 'स्त्री सन्मानासाठी पुरुष भान संवाद यात्रा' या राज्यात तीन ठिकाणांहून निघालेल्या आणि सप्टेंबर अखेर पर्यन्त चालणार्या  यात्रेची माहिती आरती यांनी दिली. आगामी नवरात्रात 'जागर स्त्री शक्तीचा' हे अभियान ३ ते १२ ऑक्टोबर २०२४ दरम्यान घेण्यात येईल असे पुढील नियोजन सांगितले.

**४) युवा सहभाग विभाग**

राज्य कार्यवाह प्रियंका खेडेकर यांनी या विभागामार्फत जी ऑनलाईन सत्रे घेतली त्याबद्दलची माहिती दिली. युवा महोत्सव तीन दिवसाचा घ्यावा असे ठरले. संघटनेच्या साडेतीन-दशकपूर्ती, राज्य अधिवेशनानिमित्त युवा विभागाने राज्यभर विचारांची घुसळण व्हावी असे काही नवीन अभियान राबवावे असे बैठकीत सुचवले गेले.

**५) विज्ञान बोध वाहिनी**

राज्य कार्यवाह भास्कर सदाकळे व बाबा हलकुडे यांनी सांगितले की, चालू शैक्षणिक सत्रात कोणीही मागणी न केल्याने या विभागाचे काम ठप्प झाले आह. या दोघांनी प्रत्येक जिल्ह्याचे कार्याध्यक्ष व प्रधान सचिव यांच्याशी स्वतः संपर्क करून, त्यांच्या संमतीने जिल्ह्यांचा दौरा करून, जिल्ह्यातील शाळांना भेटी देऊन वेळापत्रक तयार करावे असे सुचविण्यात आले. नोव्हेंबर २०२४ नंतर विदर्भात गडचिरोलीपासून विज्ञान बोधवाहिनीचे कार्यक्रम सुरू करावेत असे ठरले.

**६) सोशल मीडिया विभाग**

राज्य कार्यवाह कीर्तीवर्धन तायडे यांनी वेबसाइटवर आपलोड करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कार्यक्रम पाठवावेत असे आवाहन केले. माधव बावगे यांनी एक त्याबाबतचा काही सूचना केल्या सर्व कार्यकर्त्यांनी संघटनेचे हँडल्स नियमित फॉलो करावेत अशा सूचना देण्यात आल्या. याच अनुषंगाने मच्छिंद्र मुंडे सरांनी सूचना केली की, बुवाबाजीची आतापर्यंतची महाराष्ट्रभरातील कार्यकर्त्यांकडे जी प्रकरणं असतील ती सर्व पाठवावीत. कार्यकर्त्यांना

सोशल मीडिया व्हिडिओ एडिटिंगचे ट्रेनिंग लवकरात लवकर देण्याचे ठरले.

**७) संघटना बांधणी**

जिल्हयांचे कार्याध्यक्ष, प्रधान सचिव यांनी आपापले अनुभव, मते, सूचना, अपेक्षा व्यक्त केल्या. आपल्या शाखा, जिल्हा मजबूत करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांमधील परस्परविश्वास वाढून कामाला चालना मिळण्यासाठी शाखा भेटी करणे, कार्यकर्त्यांना भेटणे, त्यांच्याशी सतत संवाद साधणे, त्यांच्या समस्या समजावून घेणे, गृहभेटी करणे, हा क्रम चालू ठेवावा असे सुचविण्यात आले. कार्यकर्त्यांने स्वचिकित्सा करावी, स्वतःचे व शाखांचे स्वॉट मूल्यमापन करावे, स्वतःचे व्यक्तिमत्व प्रगल्भ होण्यासाठी वाचन, लेखन, संवाद वाढवावा, अशीही चर्चा झाली. काही जिल्ह्यात बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या जुन्या शाखा कार्यरत ठेवण्याचा प्रयत्न करावा. शाखा विस्तार करताना संख्येपेक्षा गुणात्मकतेवर भर द्यावा, असे सुचविण्यात आले. जिल्हा कार्याध्यक्ष यांनी शाखा निवड करणे, शाखा भेटी करणे, शाखांचे प्रशिक्षण लावणे, नव्या शाखांची निर्मिती करणे, जिल्हा बैठका घेणे आणि राज्याच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणे ही सहा कामे करण्याचे आवाहन करून त्यांच्या जबाबदर्यास सांगण्यात आल्या.

**८) अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**

पत्रिकेचे संपादक डॉ. नितीन शिंदे सरांनी पत्रिकेचा लेखाजोखा मांडला. पत्रिकेमध्ये कार्यकर्त्यांची मते आणि लेख कमी येतात, त्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड यांनी मागील वर्षाच्या देणगी, वर्गणी आणि जाहिरातींचा आढावा घेताना काही रक्कम वसूल न झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली. व्यवस्थापकीय संपादक अजय भालकर यांनी जमाखर्चाचा हिशेब सांगून देणगी, जाहिरात किंवा वर्गणीची रक्कम जमा झाल्याबरोबर विवेक जागर बँक अकाउंटला भरावी व त्याचा स्क्रीनशॉट, संपूर्ण माहितीसह पाठवावा असे निक्षून सांगितले. पत्रिकेत लेखन करणाऱ्या कार्यकर्ता लेखकांसाठी हितचिंतक जगदीश काबरे यांनी दर वर्षी तीन पुरस्कार देण्याचे (त्यातील एक युवा कार्यकर्ता असेल) प्रायोजकत्व स्वीकारले आहे याची माहिती दिली. संपादक मंडळाचे सदस्य प्रल्हाद मिस्त्री यांनी लेखन कसे असावे, त्याबद्दलच्या अपेक्षा व्यक्त करून ऑनलाईन लेखन कार्यशाळेबद्दल माहिती दिली. या विभागाच्या खुल्या चर्चेत संजय बनसोडे यांनी देणगी, वर्गणी बाबत सूचना दिल्या.

**९) निधी संकलन विभाग**

विभागाचे सहकार्यवाह सुधीर निंबाळकर यांनी ‘विवेक जागर संस्था’चे २०२३-२४ चे लेखा परीक्षण पूर्ण झाल्याचे सांगितले आणि कार्यवाह परेश भाई शहा यांनी पाठविलेले निवेदन वाचून दाखवले. त्याचबरोबर संघटनेसाठी महत्त्वाच्या अशा काही घडामोडींबद्दल माहिती दिली. संघटनेच्या सर्व कार्यक्रमांचे बॅनर, कार्यक्रमांच्या देण्यात येणाऱ्या बातम्या यामध्ये, खर्चाची बिले पावत्या, व्हौचार इत्यादीत संघटनेच्या नावासोबत विवेक जागर संस्थाचा उल्लेख आवश्यक असल्याचे सांगितले. सुधीर निंबाळकर यांची आगामी विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगातर्फे ‘सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी’ (ए. आर. ओ.) म्हणून नेमणूक झाल्याबद्दल संघटनेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

साडेतीनदशकपूर्ती निमित्त तीन दिवसांच्या अधिवेशनाचा संभाव्य सर्व खर्च तसेच संघटनेचा वर्षभराचा खर्च मोठा असल्याने कार्यकर्त्यांनी जिल्हा निहाय गतवर्षीपेक्षा दीडपट देणगी आणि जाहिराती मिळवून आपला निधी संकलनातील अधिकाधिक मोठा वाटा उचलावा, असे सर्वांना आवाहन केले. सर्व उपस्थित राज्य व जिल्हा पदाधिकारी यांना जाहिरात व देणगीची पत्रके वितरीत करण्यात आली.

**१०) अधिवेशन पूर्वतयारी आढावा**

संघटनेच्या साडेतीन-दशकपूर्ती निमित्त आणि भारतीय संविधान स्वीकृतीला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने राष्ट्रीय पातळीवरील एक दिवसीय ‘संविधान जागर परिषद’ आणि संघटनेचे दोन दिवसीय अधिवेशन दिनांक ८, ९, १० नोव्हेंबरला घेण्याचे जळगाव येथील राज्य कार्यकारिणी व इस्लामपूर येथील विस्तारित राज्य कार्यकारिणीमध्ये ठरले होते. मात्र दरम्यानच्या कालावधीत राज्य विधानसभा निवडणुका होण्याची शक्यता असल्याने सदर अधिवेशन आळंदी येथेच घेण्यासाठी २७, २८ व २९ डिसेंबर २०२४ या तारखा निश्चित करण्यात आल्या. त्या सर्वांना कळवाव्यात म्हणजे रिझर्वेशन करायला सोपे जाईल असे ठरले.

सायंकाळी लातूर येथील स्थानिक मान्यवर, देणगीदार, हितचिंतक, आधारस्तंभ, पाठीराखे यांच्याशी संवाद बैठक झाली. या बैठकीत ‘स्त्री- सन्मानासाठी पुरुषभान संवाद यात्रे’चा समारोप कार्यक्रम डॉ. सोमनाथ रोडे यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख पाहुणे डॉ. अरविंद भातांब्रे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. आरती नाईक यांनी यात्रेची मागील १५ दिवसात संपूर्ण जिल्ह्यातून झालेल्या कार्यक्रमांची माहिती, मिळालेला प्रतिसाद याची माहिती दिली.

स्थानिकांच्या स्वागत सत्कार कार्यक्रमांमध्ये संजय

बनसोडे यांनी अंनिसची भूमिका वाटचाल थोडक्यात कथन केली. ह्याच कार्यक्रमांमध्ये राज्य सरचिटणीस रुक्साना मुल्ला यांना 'केशव गोरे ट्रस्ट, मुंबई' यांच्याकडून प. बा. सामंत संघर्ष पुरस्कार जाहीर झाला म्हणून त्यांचाही सत्कार करण्यात आला.

संघटनेचे लातूर येथील आधारस्तंभ, हितचिंतक, देणगीदार, जाहिरातदार यामध्ये डॉ. अरविंद भातांब्रे, आदिनाथ सांगवे, डॉ. अजित जगताप, रमेश बिराजदार, बब्रुवाहन गोमसाळे, निर्भय कोरे, विजय औंढे, प्रकाश गायकवाड, शार्दुल शिंदे, डॉ. प्रा. अर्जुन जाधव, डॉ. गणेश गोमारे, संदीप उच्चेकर, प्रमोद दुधाळे इत्यादी हितचिंतक उपस्थित होते. अशा इतरही हितचिंतकांनी त्यांना वेळ मिळेल त्याप्रमाणे या बैठकी दरम्यान आपल्या उपस्थितीने सदिच्छा व्यक्त केल्या. त्यांचा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात सर्वांचा परिचय माधव बावगे यांनी करून दिला. राज्य पदाधिकारी यांचे मार्फत त्यांचा सत्कार करण्यात आला. रात्री या सर्वांसोबत कार्यकर्त्यांचे भोजन झाले.

रविवार दिनांक १५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी नऊ वाजता बैठकीच्या दुसऱ्या दिवसाचे कामकाज काही विभागांच्या अहवाल सादरीकरणाने सुरू झाले.

**११) बुवाबाजी विरोधी संघर्ष विभाग**

या विभागाचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे यांनी मागील चार महिन्यात या विभागात झालेल्या कामकाजाचा आढावा घेतला. महाराष्ट्र अंनिसमध्ये नवीन कार्यकर्ते जोडले जावेत आणि त्यांना प्रशिक्षण द्यावे, अशी अपेक्षा लोणारे यांनी व्यक्त केली. त्यांनी सर्व जिल्हा व राज्य पदाधिकारी यांना संपर्क करून हा विभाग कृतिशील करावा असे सुचवण्यात आले.

**१२) विविध उपक्रम विभाग**

विभागाचे राज्य कार्यवाह अनिल करवीर यांनी मागील चार महिन्यांत झालेल्या उपक्रमांचा अहवाल मांडला. पुढील चार महिन्याचे नियोजन मांडताना त्यांनी जेम्स रँडी यांच्या स्मृतिदिनानिमित्त २० ऑक्टोबर ते २६ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत, 'आधुनिक अंधश्रद्धा पोलखोल अभियान', राबवावे. फटाकेमुक्त दिवाळी अभियान, एक नोव्हेंबरला विवेक जागर दिन, संविधान बांधिलकी महोत्सव, व्यसनविरोधी पंधरवडा, नववर्षात फटाके फोडू नका, असे काही ठळक उपक्रम प्रत्येक शाखेत व्हावेत, असे त्यांनी सुचवले.

'खबरबात' या अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या सदरात उपक्रमांची माहिती देताना एखादा योग्य फोटो आणि चार ते पाच ओळीत माहिती दर महिन्याच्या पाच तारखेपर्यंत पाठवावी असे आवाहन केले. या कामी करवीर यांना हंसराज महाले मदत करतील असे ठरले.

पुढील राज्य कार्यकारिणीची बैठक १५ व १६ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबई विभागात तर पुढील विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठक ३०, ३१ मे व १ जून २०२५ ला शहादा, जिल्हा नंदुरबार येथे घेण्याचे बैठकीत ठरले.

उर्वरित वेळेत काही जिल्ह्यांचे अहवाल सादरीकरण झाले.

**१३) विवेक वाहिनी**

या विभागाचा अहवाल सादर करताना राज्य कार्यवाह डॉ. सविता शेटे व राज्य सहकार्यवाह डॉ. विठ्ठल घुले यांनी तसेच कृष्णात स्वाती यांनी आतापर्यंत ठिकठिकाणच्या महाविद्यालयात स्थापन झालेल्या विवेक वाहिनीचे युनिट तसेच सामंजस्य करार याबद्दलची माहिती दिली. पुढील काळातही हे काम पुढे चालू ठेवण्याचे सांगितले. आजपावेतो सुरू झालेल्या विवेकवाहिनींची माहिती दिली.

**१४) जोडीदाराची विवेकी निवड**

हर्षल जाधव यांनी या विभागाच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला.

**१५) कार्यालयीन व्यवस्थापन विभाग**

कार्यवाह उत्तरेश्वर बिराजदार यांनी कार्यालयीन व्यवस्थापन व दस्तऐवज संकलन या दोन्हीही विभागांची एकत्रित माहिती दिली.

सर्व जिल्ह्याचे कार्याध्यक्ष व प्रधान सचिव यांनी १० ऑक्टोबर २०२४ अखेर आपापल्या जिल्ह्यांच्या जिल्हा बैठका तातडीने घेऊन या राज्य कार्यकारिणी बैठकीत झालेल्या चर्चा, ठराव व निर्णयांची माहिती शाखा पातळीपर्यंत गांभीर्याने पोहोचवावी आणि त्याबद्दलचा अहवाल मध्यवर्तीला पाठवावा असे ठरले.

या राज्य कार्यकारिणी बैठकीला संपूर्ण राज्यातून २४ जिल्हयाचे ७५ कार्यकर्ते व स्थानिक १५ असे एकूण ९० पदाधिकारी उपस्थित होते. या राज्य कार्यकारिणी बैठकीला जे जिल्हे अनुपस्थित होते आणि ज्या विभागाचे राज्य कार्यवाह व सहकार्यवाह अनुपस्थित होते त्या सर्वांच्या या आठवड्यात राज्य कार्यकारी समितीच्या सोबत ऑनलाईन बैठका होतील, असेही ठरले.

लातूर मधील संघटनेचे हितचिंतक डॉ. अजित जगताप व कॉम्रेड राजेंद्र विहीरे, रमेश बिराजदार यांच्या उपस्थितीमध्ये बैठकीचा समारोप अतिशय उत्साहात पार पडला. हम होंगे कामयाब, या गीताचे सामुदायिक गायन करून बैठकीची सांगता झाली.

●



# महा. अंनिसची खबरबात

**अनिल शोभना वसंत** । पालघर
९८२३२८०३२७

**महाराष्ट्र अंनिस वर्धापन दिन**

**ऊर्जानगर (जि.चंद्रपूर):** शाखेच्या वतीने ०९ आगस्ट २०२४ रोजी वृक्षारोपण कार्यक्रम स्नेहबंध आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्हा कार्याध्यक्ष पी. एम. जाधव, जिल्हा प्रधान सचिव नारायण चव्हाण, जिल्हा महिला कार्यवाह कविता राजूरकर, जिल्हा युवा कार्यवाह किसन अरदळे, ऊर्जानगर शाखा अध्यक्ष मुर्लीधर राठोड, कार्याध्यक्ष देवराव कोंडेकर, उपाध्यक्ष दुर्रेंद्र गेडाम व शंकर दरेकर, संजय जुनारे, विजय राठोड, सुरेंद्र इंगळे, दिपक मडावी, वानखेडे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

**उदगीर :** विश्वनाथ मुडपे यांनी आपल्या नातवाच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पेन व चॉकलेटचे वाटप केले. शाळेची माजी विद्यार्थिनी मीरा सोमवंशी हिने एम.एस्सी.फिजिक्स ही पदवी यशस्वीरित्या संपादन केल्याबद्दल तिचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व आभार पाटील मॅडम यानी केले. शाखा व राधाकृष्ण प्राथमिक विद्यालयच्या वतीने सर्प विज्ञान प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी रोहित बिरादार यांनी सापासंबंधी प्रबोधन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य विजय पाटील होते. प्रमुख पाहुणे बाबूराव माशाळकर यानी तसेच शाखा सचिव बळीराम भुक्तरे यानी संवाद साधला. देविदास नादरगे यांनी शाळेतील विविध उपक्रमांची माहिती दिली.

**सानपाडा (नवी मुंबई):** शाखेच्या वतीने वर्धापन दिनानिमित्त माझे अंनिसशी नाते या विषयावर संवादसत्राचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी राज्य प्रधान सचिव नंदकिशोर तळाशिलकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला ज्योती क्षिरसागर, गजानंद जाधव, कुमार भिवगडे, प्रदीप कासुर्डे, राजेंद्र पंडित, महेंद्र राऊत, कॅप्टन सी.जे.लेपांडे, किरण वाळुंज, दिपरत्न सुरडकर, वसंत कोंडाळकर व अशोक निकम आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**लासूर स्टेशन:** शाखेच्या वतीने अंनिसने मला काय दिले या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. जिल्हा कार्याध्यक्ष भास्कर बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. उपस्थित सदस्य मच्छिंद्र पानकर, डॉ.विकास संगेकर, शाखा कार्याध्यक्ष जगजीवन सातदिवे, जावेद मन्सुरी, प्रशांत दाभाडे, ज्ञानेश्वर वाघचौरे, मारोती गोलांडे, राधाकृष्ण गुजर, सनी गायकवाड, गोविंद हिवाळे, प्रधान सचिव बाबासाहेब जाधव, सपना गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. पोपट बबन जाधव व सोनाली बाबुराव बल्लाळ यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पीएसआय पदी नवनियुक्ती तसेच प्रतीक्षा सनी गायकवाड यांची स्पर्धा परीक्षांमध्ये आरोग्यसेविका पदी नियुक्ती झाल्याबद्द्ल त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बाबुराव बल्लाळ, चंद्रकला बल्लाळ, विलास काळवणे, सुनील वाघचौरे हे कुटुंबीय उपस्थित होते.

**पालघर :** जिल्ह्यातर्फे वाणगाव येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात जिल्हा कार्याध्यक्ष आप्पा लोखंडे आणि राज्य कार्यवाह अनिल शोभना वसंत यांनी मार्गदर्शन केले. वार्षिक विशेषांकासाठी जास्तीत जास्त जाहिराती, देणग्या आणि वर्गणीदार मिळवण्याचे आवाहन केले. हा कार्यक्रम वाणगाव शाखा कार्याध्यक्ष मिनेश जाधव यांच्या नवीन घरात संपन्न झाला.

**पनवेल :** शाखेने स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते. सक्रीय कार्यकर्त्यांसोबत त्यांचे कुटुंबीय आणि संघटनेचे हितचिंतक या मेळाव्यास उपस्थित होते. आरती नाईक यांनी कार्यक्रमाचे बीज भाषण केले. तनुश्री आणि महेंद्र नाईक यांनी शाखेच्या वैशिष्ट्यपूर्ण कामाचा आढावा मांडला. शाखेच्या कामात सक्रिय असणाऱ्या आणि आपल्या कौशल्यांनी संघटनेच्या कामाची धुरा सांभाळणाऱ्या कार्यकर्त्यांना, तेजल आणि आनंद,यांना 'रायझिंग स्टार'या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच संघटनेचे काम करत असतानाच, आपल्या व्यावसायिक कामात देखील अव्वल असणारा कार्यकर्ता

वरदराज याचं ही कौतुक करण्यात आलं. 'विवेकाची काठी' जपत उपस्थितांनी खेळाचा ही आनंद लुटला. नंतर स्नेह भोजन झाले.

**अमरावती :** मातोश्री विमलबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती येथे ३५वा वर्धापन दिन केक कापून साजरा करण्यात आला. या वर्षी ९ ऑगस्टला आलेल्या नागपंचमीचे औचित्य साधून सापांबाबत गायत्री आडे यांनी मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच अध्यक्षा, प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख यांनी श्रद्धा व अंधश्रद्धा याविषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला शहर शाखा कार्याध्यक्ष प्रफुल कुकडे, जिल्हा प्रधान सचिव मंदा नांदूरकर, जिल्हा कार्याध्यक्षा गायत्री आडे, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**सर्पविज्ञान प्रबोधन सप्ताह**

**चंद्रपूर :** नागभीड तालुक्यातील संत हरदास विद्यालय मिंडाळा येथे प्राचार्य प्रभाकर फुकट, पर्यवेक्षक नानाजी चौके यांच्या प्रमुख उपस्थितीत चंद्रपूर जिल्हा कार्याध्यक्ष पी. एम. जाधव यांचा सर्प विज्ञान, चमत्कारामागिल विज्ञान व जादूटोणा विरोधी कायदा यावर प्रबोधनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुनिता जुनघरे यांनी केले.

**शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर बलिदान दिवस**

**गडचिरोली :** महाराष्ट्र अंनिस व झाडीबोली साहित्य मंडळ गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने गडचिरोली येथे अंधश्रद्धा निर्मूलन ही थीम घेऊन स्व-रचित काव्यमैफीलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ३४ व्या झाडीबोली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत लेनगुरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून झाडीबोली साहित्य मंडळ गडचिरोलीचे जिल्हाध्यक्ष विनायक धानोरकर, उपाध्यक्ष डॉ. प्रविण किरणांचे, गडचिरोली अंनिस शहर शाखा अध्यक्ष लहुजी रामटेके, राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर, जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे उपस्थित होते. या कार्यक्रमात कवी आनंदरावजी बावणे, खेमराजजी हस्ते माडे, तुकुम, वसंत चाफले, गोगांव, मिर्लीद खोब्रागडे, वर्षा राजगडे, नथ्थूजी चिमुरकर, किरणताई चौधरी, संजीव बोरकर, हरिदास कोटरंगे, कमलेश झाडे, प्रेमीलाताई अलोणे, मालती सेमले, प्रतिक्षा कोडापे, पुरुषोत्तम ठाकरे, डॉ. प्रविण किलणाके, उपेंद्र रोहनकर, जितेंद्र रायपुरे, आर्दीनी कविता सादर केल्या. संचलन उपेंद्र रोहनकर यांनी तर आभार जिल्हा प्रधान सचिव पुरुषोत्तम ठाकरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उद्धव बांगरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**चोपडा (जळगाव):** शहिद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या ११ व्या शहीद दिनानिमित्त सकाळी निर्भय मार्निंग वॉक तर दुपारी अभिवादन सभा आयोजित करण्यात आली होती. सभेच्या अध्यक्षस्थानी नामवंत शल्य चिकित्सक डॉ. विकास हरताळकर होते. डॉ. नरेंद्र सिरसाट, डॉ.अय्युब आर. पिंजारी, कॉ. अमृतराव महाजन, लखीचंद बाविस्कर, संजय पिरा अहिरे, प्रियदर्शन कोळी, नागेश साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**नवी मुंबई :** स्मृतिदिनानिमित्त नेरूळ रेल्वे स्टेशन पूर्व ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, सेक्टर ११, नेरूळ या मार्गावर निर्भय मार्निंग वॉक आयोजित करण्यात आला. निर्भय मार्निंग वॉक मध्ये साथी प्रा. अमोलकुमार वाघमारे, गजानंद जाधव, राजेंद्र पंडित, ज्योती क्षीरसागर, किरण वाळुंज, दीपरत्न सुरडकर व अशोक निकम आदीसह कार्यकर्ते सहभागी झाले.

**पनवेल :** विवेक जागर करंडक पथनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आली. नाट्यरूची कलामंच, चेंबूर प्रथम परितोषिक विजेते ठरले तर परिवर्तन नाट्य कला संस्था, खोपोली यांनी द्वितीय आणि कॉलेज ऑफ सोशल वर्क निर्मला निकेतन, चर्चगेट यांनी तृतीय परितोषिक मिळविले. प्रमुख अतिथि, पत्रकार प्रियांका तुपे यांनी तरुणाईशी संवाद साधला. स्पर्धेचे उद्घाटन, धुडगूस आणि येडा चित्रपटाचे निर्माते सतीश मोरे यांच्या, हाताची घडी सोडत अभिव्यक्ती वरची बंधने उठविण्याचा प्रतिकात्मक संदेश देणार्या कृतीद्वारे अभिनव पद्धतीने करण्यात आले. याप्रसंगी राज्य महिला कार्यवाह आरती नाईक तसेच राज्य युवा सहभाग कार्यवाह प्रियांका खेडेकर, एपीआय राजन ताटे, जिल्हा कार्याध्यक्ष संदीप गायकवाड हे उपस्थित होते.

**मुरगुड (कोल्हापूर) :** भडगाव येथे कार्यकर्ते व युवक मेळावा घेण्यात आला. प्रमुख वक्ते म्हणून कॉ. शिवाजी राऊत (सातारा), राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती, जिल्हा प्रधान सचिव रेश्मा खाडे उपस्थित होते. सुरुवातीला शहिद डॉ नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन करण्यात आले. कॉ. शिवाजी राऊत यांनी विस्ताराने संवाद साधला. तसेच महाराष्ट्र अंनिसच्या कामाबाबत कृष्णात स्वाती यांनी माहिती दिली. अशोक शिराळे करनुर

यांच्याकडून स्नेहभोजन देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भडगाव शाखेच्या सर्वच कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

**मुंबई जिल्हा :** स्मृतिदिनानिमित्त दादर शिवाजी पार्क ते चैत्यभूमी निर्भय वॉकचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुंबई जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

**वृक्षारोपण**

**लासुर :** लासुर स्टेशन व छत्रपती शाहू महाविद्यालय लासुर स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्रशाला शिरेगाव तालुका गंगापूर या ठिकाणी 'वृक्षारोपण' कार्यक्रमात ३०० रोपट्यांचे रोपण करण्यात आले. याप्रसंगी छत्रपती शाहू महाविद्यालयाचे प्रा .डॉ. कदम, प्रा. शिवप्रसाद घोडके, प्रा. श्रीम. सातदिवे, महा. अंनिस जिल्हा आणि शाखा पदाधिकारी तसेच जिल्हा परिषद शिरेगाव चे मुख्याध्यापक विठ्ठलराव नरोडे, बळीराम मेंडके, विजय वाघचौरे, निलेश कहाटे, श्रीम.खंदारे, श्रीम.शिन्गाडे , श्रीम.मिटकर, श्रीम. तत्तापुरे आणि २१० विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

**उमलत्या वयातील जाण आणि भान**

**शहादा (जि.नंदुरबार) :** २४ जुलै २०२४ रोजी शाखेच्या वतीने शहरातील क्रिएटिव इंग्लिश मीडियम स्कूल येथे उमलत्या वयातील जाण आणि भान हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात डॉ.मालविका कुलकर्णी, डॉक्टर विवेक पटेल व डॉ.अलकाताई कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना वरील विषय सविस्तरपणे समजावून सांगितला.

**सद्भावना रक्षाबंधन कार्यक्रम**

**शहादा (जि.नंदुरबार) :** रक्षाबंधन निमित्त शाखेच्या वतीने शहारातील दहा शाळांमध्ये सद्भावना रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये सर्वधर्म समभाव व राष्ट्रिय एकात्मतेची भावना निर्माण व्हावी यासाठी शहादा शाखेच्या वतीने दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असलेल्या

या कार्यक्रमात मुला-मुलींनी एकमेकांना राखी बांधून एकमेकांचे संरक्षण करण्याचा संकल्प केला. नंदुरबार जिल्हाध्यक्ष हैदर नुरानी, डॉ शशांक कुलकर्णी, जेष्ठ साहित्यिका अलका कुलकर्णी, डॉ. मालविका कुलकर्णी, रवींद्र पाटील, विनायक सावळे, दिनेश सुरळकर, आरिफ मण्यार, घनश्याम सोनवणे, प्रदीप केदारे, सविता बोड्रे उपस्थित होते.

**व्यसनमुक्ती अभियान**

**नागपूर :** नशामुक्त भारत अभियानांतर्गत वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर समाजशास्त्र विभागाच्या वतीने व नशाबंदी मंडळातर्फे संस्था संचालक प्रा.मनोहर कुंभारे यांनी विद्यार्थ्यांना संकल्प दिला. कार्यक्रमाला वक्ते म्हणून नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक तथा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे व जि. प्र. स. अशोक खोरगडे उपस्थित होते. संस्थेचे संचालक डॉ. कुंभारे यांच्या हस्ते व्यसनमुक्ती अभियानाच्या पोस्टर प्रदर्शनाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी गौरव आळणे यांनी संवाद साधला. कार्यक्रमाचे संचालन समाजशास्त्र विभागाच्या प्रा. प्रीती तभाने यांनी केले तर आभार प्रा. विजेंद्र मेंढे यांनी मानले.

**स्त्री सन्मानासाठी पुरुषभान अभियान**

**नवी मुंबई :** बेलापूर येथिल फार्मसी कॉलेज, भारती विद्यापीठात 'स्त्री सन्मानासाठी पुरुष भान' शिबिर घेण्यात आले. कार्यक्रम संवादक म्हणून तेजल खेडकर व तुषार शिंदे होते. अमोलकुमर वाघमारे, ए. एच. शाह, ज्योती क्षीरसागर, अरुण जाधव, गजानन जाधव, उत्तम रोकडे, राजेंद्र पंडित अशोक निकम, आणि अन्य कार्यकर्ते उपस्थित होते

**भंडारा :** शाखेच्या वतीने समितीचे कार्यालय भगतसिंग वाड नवीन टाकळी भंडारा येथे 'स्त्री सन्मानासाठी पुरुषभान' घेण्यात आलेल्या कार्यक्रमास त्रिवेणी वासनिक,कविता लोणारे, अवनी लोणारे, पुरुषोत्तम कांबळे, नितेश बोरकर, पुरुषोत्तम गायधने, दशरथ शहारे, विष्णुदास लोणारे उपस्थित होते. संपूर्ण भंडारा जिल्ह्यात हे अभियान राबविण्यात आले. चंद्रशेखर भिवगडे यांनी संवाद साधला.

**पनवेल :** आवरे च्या शाळेत 'स्त्री सन्मानासाठी पुरूषभान' संवाद कार्यक्रम ९ वी च्या विद्यार्थ्यांसोबत घेतला. वयात येताना, प्रेम आकर्षण आणि हिंसा, बलात्कार, पुरूषभान हे मुद्दे या सत्रात घेण्यात आले. मुख्याध्यापक, विज्ञान व इतर विषयांचे शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा खूप उत्तम प्रतिसाद लाभला. शेवटी त्यांच्या प्रश्नांचे निरसनही करण्यात आले.

**जादुटोणा विरोधी कायदा प्रशिक्षण**

**वाशीम :** पोलिस मुख्यालय वाशिम येथे जादुटोणा विरोधी कायदा प्रशिक्षण कार्यशाळा टप्पा क्रमांक दोन संपन्न झाली. वाशिम जिल्हा कार्याध्यक्ष शिवश्री विजय शिंदे पाटील, जादुटोणा विरोधी कायदा प्रचार व प्रसार

अंमलबजावणी समितीचे अशासकीय सदस्य व वाशीम शाखा कार्याध्यक्ष पी.एस. खंदारे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. वाशिम जिल्ह्यातील पोलीस स्टेशन चे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

**कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर**

**अमरावती :** जिल्ह्याच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलन विचार कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर दिनांक २५ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित करण्यात आले. प्रशिक्षणाला ४७ प्रशिक्षणार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते. राज्य सरचिटणीस विनायक सावळे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. राज्य प्रधान सचिव गजेंद्र सूरकार, माधुरी झाडे, हरीश पेटकर यांनी विचार व्यक्त केले. अमरावती अध्यक्ष प्राचर्या डॉ. स्मिता देशमुख यांनी अध्यक्षीय भाषण केले. उपाध्यक्ष सतिश तराळ यांनीही आपले विचार व्यक्त केले. गायत्री आडे, मंदा नांदूरकर, शंतनु पांडव, गौरखेडे काका तसेच एल.जी.आडे यांनी प्रशिक्षण यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

**चमत्कारा मागील विज्ञान कार्यक्रम**

**गडचिरोली** : मॉडेल स्कूल, मोहोली (ता. धानोरा) येथे शिक्षकांनी 'वैज्ञानिक दृष्टिकोन व चमत्कारा मागील विज्ञान' या विषयावर दिनांक ३१/०८/२०२४ रोजी कार्यक्रम आयोजित केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष कपिल कुमरे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठल कोठारे होते. शाखा कार्याध्यक्ष उपेंद्र रोहनकर यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे म्हणून मॉडेल स्कूल मोहोलीचे मुख्याध्यापक निलेश नैताम व एच डी वाघाडे होते. संचालन पी एन जिवतोडे यांनी केले तर आभार डी जे ठाकरे यांनी मांनले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी हजर होते.

**देहदान/अवयव दान प्रबोधन**

**कोराडी :** ४ सप्टेंबर रोजी कोराडी शाखेचे अध्यक्ष ताराचंद पखिड्डे यांच्या वाढदिवसानिमित्त शाखा, गुरूदेव सेवा मंडळ व जागृती महिला मंच यांचे संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अंनिस पत्रिका संपादक मंडळाचे सदस्य प्रा.डॉ. सुशील मेश्राम यांनी देहदान व अवयव दान या विषयावर उपस्थितांचे प्रबोधन केले.ताराचंद पखिड्डे यांनी जोपासलेले छंद व कबाड शोधुन उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना दिलेले दान हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते. कार्यक्रमाला विनोद उलिपवार, गौरव आळणे, बबनराव गायकवाड, विलास भालेराव, पांडुरंग चौधरी, डुमन राउत गुरूजी,प्र काश भालेराव, रत्नदीप रंगारि, चंद्रगुप्त रंगारि, मिलिंद बनसोड, रुखमाताई नानवटकर आणि तिन्ही संघटनांचे कार्यकर्ते व मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

**नंदोरी गावांतील भानामती प्रकरण सोडवण्यात यश**

**वर्धा :** हिंगणघाट तालुक्यातील नंदोरी गावातील कुटुंबात मार्च पासून वारंवार कपड्यांना आग लागणे, धान्य घरभर पसरणे, वस्तू गायब होणे, अंगावर पाणी, दगड, पीठ पडणे, घरातील मुलीच्या अंगात संचारणे अचानक मुलीला बांधून ड्रम मध्ये कोंडून ठेवणे, मुलीच्या कपड्यांना आग लागणे अशा विविध प्रकारच्या घटना घडणे सूरू होते. कुटुंबाच्या नातेवाईकांनी महा. अनिसचे राज्य प्रधान सचिव गजेन्द्र सुरकार यांच्याकडे तक्रार दिल्यानंतर पदाधिकारी अरूण भोसले, माधुरी झाडे, रजनी सुरकार यांनी गजेन्द्र सुरकार यांच्यासोबत घटनास्थळी भेट देउन तपासणी केली व कुटुंबातील सदस्याच्या सोबत चर्चा करून सत्य शोधून काढले. सर्व कुटुंबीयांचे समुपदेशन करून या घटनांना पूर्ण विराम दिला.

**नवीन शाखा गठित**

**गडचिरोली :** जिल्ह्याच्या वतीने चामोर्शी तालुक्यातील मुरमुरी येथे 'अंनिस' ची नवीन शाखा स्थापन करण्यासाठी जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे व बुवाबाजी संघर्ष विभाग कार्यवाह प्रशांत नैताम यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. निरीक्षक म्हणून गडचिरोली शहर शाखा प्रधान सचिव हरिदास कोटरंगे, चामोर्शी शाखा कार्याध्यक्ष भाऊराव खोब्रागडे चामोर्शी शाखा प्रधान सचिव शिवराम मोंगरकर यांनी काम पाहिले.

●

**अभिवादन**

**एस. चन्द्रशेखर जयंती**

सुब्रह्मण्यम् चन्द्रशेखर (१९१०-१९९५) हे एक भारतीय-अमेरिकन शास्त्रज्ञ होते. आधुनिक खगोलशास्त्रात त्यांचे काम मूलभूत आणि महत्त्वाचे मानले जाते. ताऱ्यांची उत्पत्ती कशी होते ते चंद्रशेखरांनी शोधून काढले. या कामासाठी त्यांना १९८३ चे नोबेल पारितोषिक मिळाले. शिवाय त्यांना पद्मविभूषण, ब्रूस पदक, व इतर अनेक पारितोषिके मिळाली.

# महा. अंनिसचे विविध उपक्रम



कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर (अमरावती)
विनायक सावळे, डॉ. माधुरी झाडे, गायत्री आडे व साथी



महाराष्ट्र अंनिस स्थापना दिवस सानपाडा (नवी मुंबई)
राजेंद्र पंडीत, किरण वाळुंज, अशोक निकम व साथी



महाराष्ट्र अंनिस स्थापना दिवस लासूर (छत्रपती संभाजीनगर)
भास्कर बनसोडे, डॉ. विकास संगेकर व साथी



महाराष्ट्र अंनिस स्थापना दिवस ऊर्जानगर (चंद्रपूर)
पी.एम.जाधव, देवराव कोंडेकर, दुरेंद्र गेडाम, मुरलीधर राठोड व साथी




शहिद डॉ. नरेंद्र दाभोलकर बलिदान दिवस (गडचिरोली)
विलास निंबोरकर, विठ्ठलराव कोठारे, लहूजी रामटेके व साथी



देहदान/अवयव दान प्रबोधन कोराडी (नागपूर)
डॉ. सुशील मेश्राम, ताराचंद पखिड्डे, विनोद उलिपवार व साथी



शहिद डॉ. नरेंद्र दाभोलकर बलिदान दिवस चोपडा (जळगाव)
डॉ. विकास हरताळकर, डॉ. नरेंद्र सिरसाट, डॉ. अय्युब पिंजारी, व साथी



महाराष्ट्र अंनिस स्थापना दिवस (पालघर)
अनिल करवीर, आप्पा लोखंडे, मिनेश जाधव व साथी

ISSN : 2584-0398 Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष तिसरे अंक दहावा, ५ ऑक्टोबर २०२४ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/-**
Andhshradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 3 Issue 10, 5th October 2024 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-


# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

## वार्षिक विशेषांक २०२४

**जाहिरात/ देणगी/ वर्गणीदार आवाहन**

प्रिय साथी,
सप्रेम नमस्कार,

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पस्तीस वर्षांच्या दमदार वाटचालीमध्ये आपणा सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे. सतत वेगवेगळ्या कामांमध्ये कार्यप्रवण असणे ही आता आपली गरज बनलेली आहे. दरवर्षीप्रमाणे अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचा वार्षिक विशेषांक-२०२४ आपण नोव्हेंबर-डिसेंबर जोड-अंक स्वरूपात प्रकाशित करीत आहोत. समितीच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी अंनिपच्या विशेषांकाचा महत्त्वाचा सहभाग राहिलेला आहे. त्यामुळे वार्षिक विशेषांक २०२४ साठी वाचक, हितचिंतक, जाहिरातदार, देणगीदार आणि कार्यकर्ते यांनी जास्तीत जास्त जाहिराती / देणगी देऊन संघटनेचे पाठबळ वाढवावे तसेच वर्गणीदार ही वाढवावेत ही नम्र विनंती.

### दरपत्रक

| आकार | रंगीत दर रु. | कृष्णधवल दर रु. |
|---|---|---|
| मुखपृष्ठ/मलपृष्ठ आतील बाजू पान नं.२/३ | ५०,०००/- | - |
| मलपृष्ठ पान नं. ४ | ६०,०००/- | - |
| पूर्ण पान (१५ सेंमी x २० सेंमी) | २०,०००/- | १२,०००/- |
| अर्धे पान (१५ सेंमी x १० सेंमी) | १०,०००/- | ६,०००/- |
| पाव पान (७.५ सेंमी x १० सेंमी) | ५,०००/- | ३,०००/- |
| पर्यावरणपूरक सदिच्छा चौकट (३ सेंमी x ५ सेंमी) | - | २,०००/- |

### बँक तपशील

जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट **'विवेक जागर संस्था'** या नावानेच काढावा.

खात्याचे नाव : **विवेक जागर संस्था**
बँकेचे नाव : ICICI Bank, धुळे
खाते क्र.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R

**सोबतचा QR कोड स्कॅन करुन वर्गणीदार/देणगीदार होऊ शकता**
Scan & Pay

**उत्तम जोगदंड**
कार्यकारी संपादक

**डॉ. नितीन शिंदे**
संपादक

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**माधव बावगे**
राज्य कार्याध्यक्ष

**अविनाश पाटील**
राज्य अध्यक्ष

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती


**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ______________________

______________________

______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.